
• पुणे, रविवार, १५ सप्टेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 277 • वर्ष ३ रे, अंक २७७ • किंमत ₹ ६ • पाने : १२


# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS




शांतता प्रस्थापित करण्यासाठी वचनबद्ध



निर्माल्य संकलन : स्वयंशिस्त P3



अविनाश साबळेची भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी P12

## At a Glance

### बारामुला येथे ३ दहशतवादी ठार!

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमध्ये दहशतवाद्यांनी काल अचानक हल्ला केला होता. या हल्ल्यामध्ये भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले होते. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराने अवघ्या २४ तासांच्या आत बारामुल्ला येथे शोधमोहिम राबवून ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला.

### तिघांवर खुनी हल्ला

**सांगवी :** पिंपरी-चिंचवडच्या सांगवीमध्ये गणपती विसर्जनादरम्यान कोयत्याने तिघांवर वार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे सांगवीमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पूर्ववैमनस्त्यातून खून करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती सांगवी पोलिसांनी दिली आहे. याप्रकरणी सांगवी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. या प्रकरणी लाला पाटील, शुभम नावळे या दोघांना बेड्या ठोकल्या आहेत.

### अयोध्येत तरुणीवर सामूहिक बलात्कार

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिर परिसरात स्वच्छता कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या एका दलित तरुणीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी या प्रकरणी नऊ जणांवर गुन्हा दाखल केला आहे आणि आत्तापर्यंत पाच जणांना या प्रकरणात अटक केली आहे.




• पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शासकीय निवासस्थानी एका गायीने वासराला जन्म दिला आहे. त्या वासराच्या कपाळावर प्रकाशाचे प्रतीक असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वासराचे नाव 'दीपज्योती' ठेवले आहे, अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी स्वत: आपल्या एक्स मीडिया प्लॅटफॉर्म वर शेअर करत दिली

### १३ जखमी, ९० जणांना वाचवण्यात यश

घाटकोपरमधील घटना

# मुंबईत आग्नितांडव!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबईतील घाटकोपर भागातील एका इमारतीला शनिवारी आग लागल्याची घटना घडली. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल होऊन ९० हून अधिक जणांना सुरक्षित बाहेर काढले. परंतु, या घटनेत १३ जण जखमी झाले असून त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. या आगीच्या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली.

'मुंबईतील घाटकोपर पूर्व येथील येथील रमाबाई आंबेडकर नगर येथील एका इमारतीला आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. ९० हून अधिक लोकांनान सुखरुप बाहेर काढण्यात आले. परंतु, १३ जणांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. रमाबाई आंबेडकर मगसवर्गीय गृहनिर्माण संस्थेत ही आगीची घटना घडली. हर्ष अनिल भिसे, स्वीटी संदीप कदम, जान्हवी मिलिंद रायगावकर, प्रियंका काळे, जसिम सलीम सय्यद, ज्योती मिलिंद रायगावकर, फिरोझा इक्बाल शेख, लक्ष्मी लक्ष्मण कदम, लक्ष्मण रामभाऊ कदम, मानसी श्रीवास्तव, अक्षरा सचिन दाते, आबिद शाह आणि अमीर इक्बाल अशी जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याआधी एक दिवसापूर्वी मुलुंड परिसरातील ओपल अपार्टमेंटच्या नवव्या मजल्यावर आग लागली. या आगीची माहिती देताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने सांगितले की, या घटनेत एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. मुलुंडमधील एलबीएस रोडवरील भांडुप सोनापूर सिग्नल येथे असलेल्या ओपल अपार्टमेंटमध्ये ही आग लागल्याचे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. अपार्टमेंटच्या 9व्या मजल्यावर आग लागली

### पुण्याच्या पहिल्या 'वंदे भारत'चे सोमवारी लोकार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याला मिळालेल्या पहिल्या वंदे-भारत एक्स्प्रेसचे लोकार्पण सोमवारी (उद्या) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हर्च्युअल पद्धतीने होणार असून पुणे-हुबळी या वंदे-भारत एक्स्प्रेसला केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ हे पुणे स्थानकावरुन झेंडा दाखवणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून पुणेकरांना प्रतिक्षित असणारी तसेच पुण्याहून सुटणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसमुळे सातारा, मिरज, सांगली आणि कोल्हापूरमधील रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोदी सरकारकडून महाराष्ट्राला ३ नव्या वंदे भारत एक्स्प्रेस मिळाल्या असून यात पुणे-हुबळी, नागपूर-सिकंदराबाद आणि कोल्हापूर-पुणे आदी मार्गाचा समावेश आहे. या तिन्ही वंदे भारतचे लोकार्पण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

# पैशांच्या वादातून दोन जणांवर केला गोळीबार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी काळभोर :** रिंग रोड जमिनीच्या व्यवहारातील पैशांच्या वादातून दोन जणांवर एका उद्योजकाकडून गोळीबार केल्याची घटना शनिवार सकाळी घडली आहे, जखमींवर लोणी काळभोर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.ही घटना कोरेगाव मुळ (ता.हवेली) येथील इमानदार वस्ती येथे घडली आहे.

» क्राईम

हवेली तालुक्यांतील ग्रामीण पोलीस दलातील ऊरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोरेगाव मुळ हद्दीतील इमानदार वस्ती येथील एका बड्या उद्योजकाच्या घरात रिंगरोडच्या जमिनीमध्ये गुंतवणूक केलेले पैसे मागण्यासाठी दोन तरुण गेले होते. त्यावेळी त्यांच्यात वाद होऊन त्याचे पर्यावसान गोळीबारात झाले. या वादात उद्योजकाने आपल्या पिस्तुलातून दोन राऊंड फायर केले असुन, पायावर व पाठीवर गोळी लागल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

# ३५२.४९ कोटीवर महापालिकेला सोडावे लागणार आता पाणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. ११ गावे महापालिका हद्दीत येऊन पाच वर्षे झाल्याने आता तेथून १०० टक्के कर आकारणीला सुरुवात झाली आहे. पण महापालिकेकडून अव्वाच्या सव्वा मिळकतकर घेतला जात असल्याची तक्रार करून फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे महापालिकेच्या हद्दीतून बाहेर पडली आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे झालेल्या बैठकीनंतर दोन वर्षांपासून ही प्रक्रिया सुरु आहे. राज्य सरकारने दिलेल्या या आदेशाच्या विरोधात न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. अखेर विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर



> मिळकतकराची वसुली, थकबाकीसंदर्भात राज्य सरकारकडून अद्याप अधिसूचना आलेली नाही. सरकारच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.
>
> — माधव जगताप, उपायुक्त, मिळकतकर विभाग

फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांची नगरपरिषद स्थापन करण्याची अधिसूचना राज्य सरकारने बुधवारी काढली.फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन्ही गावे पुणे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. पण या दोन्ही गावांची तब्बल ३५२.४९ कोटी रुपयांची मिळकतकराची थकबाकी आहे.त्यावर महापालिकेला पाणी सोडावे लागते की काय, अशी स्थिती निर्माण

» पान ४ वर



### झिकामुळे पाच जणांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरासाठी एक चिंता जाता पाप समोर आली आहे.शहरात झिकाच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच असून, एकूण रुग्णांची संख्या आता शंभरवर पोहोचली आहे. रुग्णांमध्ये गर्भवतींचे प्रमाण अधिक असून, शहरात आतापर्यंत झिकाच्या पाच रुग्णांचा मृत्यू झाला आहे. शहरातील डहाणूकर कॉलनी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत झिकाचे सर्वाधिक २० रुग्ण आहेत. त्या खालोखाल एरंडवणे क्षेत्रीय कार्यालयात १६ रुग्ण आहेत. खराडी १३, घोले

» पान ४ वर

# गजा मारणे याला रिल्स बनवणे पडले महागात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील कुख्यात गुंड गजानन मारणेला रील्स बनवणं चांगलंच महागात पडल आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेकडून गेल्या चार तासांपासून गजानन मारणेची गुन्हे शाखेच्या कार्यालयात झाडाझडती घेण्यात आली. गजानन मारणेच्या नावानं जीएम बॉईज नावाचं इन्स्टा अकाऊंट आहे. या अकाउंटवर गजानन मारणेचे साथीदार गजानन मारणेचा उल्लेख करताना डॉन, भाई अशा प्रकारे उल्लेख असलेले रील्स टाकत असतात. या रील्सचा परिणाम तरुण पिढीवर होऊन ती गुन्हेगारीकडे आकर्षित होत असल्याचं सांगत पोलिसांनी ही कारवाई केली आहे. काही दिवसांपूर्वी दहीहंडीच्या दिवशी मंत्री चंद्रकांत पाटील यांची गजानन मारणेने भेट घेतल्याचे रील्स असेच व्हायरल झाले होते. त्यानंतर पोलिसांनी गजानन मारणेला गुन्हे शाखेच्या कार्यालयात चौकशीसाठी बोलावलं. गजानन मारणे हा टीपू पठाण नावाच्या साथीदाराच्या माध्यमातून इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर करतो. तरुण पिढीवर या व्हिडिओजचा मोठा परिणाम होत असल्याचं पोलीसांच निरिक्षण आहे.

» क्राईम

त्यामुळे गजानन मारणेसह टीपू पठाणला देखील गुन्हे शाखेच्या कार्यालयात बोलवण्यात आलं आहे.

चक्क पुण्यातील गुंड गजा मारणेचा एका व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. त्या रिल्समुळे गजा मारणे चांगलाच अडचणीत आला असून पुणे पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली आहे. पुण्यातील गुन्हे शाखेच्या कार्यालयात गजा मारणेची झाडाझडती घेतली जात आहे

चर्चा तर होणार

# गावकऱ्यांनी घडविली मंत्र्याला चिखल सफर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जामनेर :** राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचा एक व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होतो आहे. या व्हिडिओत ग्रामविकास मंत्र्यांच्या जामनेर मतदार संघातील रस्त्यांची दुरवस्था दिसून येत आहेत. या निकृष्ट रस्त्यांबाबत गावातील तरुण त्यांना जाब विचारतांना दिसत आहेत. मात्र, गिरीश महाजन त्यांना उत्तर न देता दुचाकीवर बसून याच चिखल असलेल्या खराब रस्त्यातून जात असतांना दिसत आहेत.

या घटनेवरून गावातील तरुणांनी व नागरिकांनी मंत्र्यांच्या या वागणुकीवर रोष व्यक्त केला आहे. तसेच खराब रस्त्यांबाबत देखील नाराजी व्यक्त केली आहे. येथील रस्त्यांबाबत ठोस भूमिका



घेऊन निर्णय घेणे अपेक्षित असतांना ग्रामविकास मंत्री मात्र, दुचकीवर बसून निघून गेले असे तरुणांनी म्हटले आहे.

» रस्त्याची दुरवस्था

महाजन यांचा हा व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल होतो आहे. मंत्री गिरीश महाजन ही जामनेर मतदारसंघातील लिहा तांडा गावात दौऱ्यावर गेले होते. या गावात पोहोचल्यानंतर त्यांचे स्वागत खराब रस्त्यांनी झाले. रस्त्यावर मोठा चिखल

» पान ४ वर

### ईद-ए-मिलादची सुट्टी १६ ऐवजी १८ तारखेला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारने शुक्रवारी मुंबईत ईद-ए-मिलादची अधिकृत सुट्टी १६ सप्टेंबरऐवजी १८ सप्टेंबरला जाहीर केली. १७ सप्टेंबर रोजी येणाऱ्या गणेश उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच अनंत चतुर्दशीदरम्यान कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून स्थानिक मुस्लिम समाजाने १६ सप्टेंबरऐवजी १८ सप्टेंबर रोजी ईदची मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्र सरकारने हा निर्णय घेतला आहे. स्थानिक जिल्हाधिकारी परिस्थितीनुसार इतर जिल्ह्यांमध्ये ईदच्या सुट्टीचे वेळापत्रक बदलण्याबाबत निर्णय घेऊ शकतात, असे अधिकाऱ्यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. ईद-ए-मिलादला १६ सप्टेंबरऐवजी १८ सप्टेंबरला सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी नसीम खान यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली.

### जयाद्री खोऱ्यातून धावली वंदे भारत

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुरंदर:** भारत ट्रायल बेसवर धावली असुन ऐतिहासिक पुणे परिसरातील निसर्गरम्य अशा जयाद्री खोऱ्यातील दौंडज रेल्वे मार्गावरील राज्यातील सर्वात मोठ्या सी कॉर्नवरून डेमो वंन्दे भारत धावली गेल्याचे मनमोहक दृश्य पाहण्यास मिळाले.

### वर्दीला काळीमा, पोलिसाचे निलंबन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मित्राच्या पत्नीला परपुरुषासोबत शारिरिक संबंध ठेवणाचा आग्रह करणाऱ्या आणि जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या पुण्यातील महिला पोलिसाचे निलंबन करण्यात आले आहे. पुण्यातील वाहतूक पोलीस विभागात ही महिला पोलीस कार्यरत होती.अनघा ढवळ असे आरोपी महिला पोलिसाचे नाव आहे. इन्स्टा स्टार म्हणूनही तिची ओळख आहे. पीडित महिलेने याबाबत कोल्हापुरातील गडहिंग्लज पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर अनघा ढवळेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अधिकची माहिती अशी की, आरोपी अनघा सुनील ढवळे हिची कोथरुडच्या वाहतूक पोलीस विभागात नेमणूक करण्यात आली होती. ढवळे हिने तिच्या मित्राच्या पत्नीला तू परपुरुषासोबत शारिरिक

» पान ४ वर

### भाजपला पारंपरिक मतदारसंघ पवार गटासाठी सोडावा लागणार?

# खडकवासला महायुतीमध्ये कळीचा मतदारसंघ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आता विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपात भाजपला आपला पारंपरिक खडकवासला विधानसभा मतदारसंघ अजित पवार गटासाठी सोडावाल लागण्याची शक्यता आहे.

वडगाव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे आहेत. मागील निवडणुकीत टिंगरे यांनी भाजपचे तत्कालीन अध्यक्ष, माजी आमदार जगदीश मुळीक यांचा पराभव केला होता. तो पराभव त्यांच्या जिव्हारी लागला होता. आता राष्ट्रवादी काँग्रेसशी राज्यात मैत्री झाली असली,





तरी टिंगरे आणि मुळीक यांच्यात मतभेद आहेत. कल्याणीनगर अपघात प्रकरणात टिंगरे यांचे नाव आल्यानंतर मुळीक यांनी ही संधी सोडली नाही. आता मुळीक यांनी या मतदारसंघावर दावा केला आहे. मुळीक यांचा हट्ट पुरविला गेल्यास त्याबदल्यात भाजपला खडकवासला मतदारसंघ अजित पवार गटासाठी सोडावा लागेल, अशी चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे असलेल्या वडगाव शेरी मतदारसंघावर भाजपने दावा केला असताना, 'वडगाव शेरी' मिळाल्यास तडजोड म्हणून 'खडकवासला'ची मागणी 'राष्ट्रवादी'कडून होण्याची शक्यता असल्याने खडकवासला महायुतीमध्ये कळीचा मतदारसंघ झाला आहे. या मतदारसंघात भाजपचे विद्यमान आमदार भीमराव तापकीर आहेत. मागील निवडणुकीत त्यांनी 'हॅटट्रिक' साधली होती. आता

» पान ४ वर

#रा

### कोलकात्याच्या एसएन बॅनर्जी रोडवर स्फोट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील तलतल्ला परिसरात काल शनिवारी दुपारी एसएन बॅनर्जी रोडवर रस्त्याच्या कडेला ठेवलेल्या स्टीलच्या टिफिनचा अचानक स्फोट होऊन एक जण गंभीर जखमी झाला. बापी दास असे जखमीचे नाव असून त्याच्या हाताला स्फोटात गंभीर इजा झाली आहे. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे त्याच्यावर उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. स्फोटाची माहिती मिळताच पोलीस आणि बॉम्बशोधक पथक घटनास्थळी पोहोचले होते. शिवाय, घटनास्थळी फॉरेन्सिक तज्ञही तैनात करण्यात आले आहेत.

# गुजरातला जाणारी 'ती' क्रेन कंपनी राहणार पुण्यातच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुळशीतील क्रेन कंपनी काही कारणांमुळे गुजरातला जाणार होतो त्यामुळे पुण्यातील अनेक रोजगारा बुडणार होते. परंतु विभागीय आयुक्तांनी वेळेत मध्यस्थी करून हा प्रश्न मिटवला आहे. रस्ता नसल्याने पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील एक क्रेन कंपनी गुजरातला जाणार असल्याची बातमी नुकतीच आली होती. मात्र आता ही कंपनी गुजरातला जाणार नसून महाराष्ट्रामध्येच उद्योग करणार असल्याचे कंपनीच्या मालकाने आश्वासन दिले आहे.कंपनीला संबंधित ठिकाणी चांगला रस्ता बनवून मिळणार आहे. क्रेन कंपनी गुजरातला जाणार याची माहीती मिळताच विभागीय आयुक्त यांनी कंपनीचे मालक इथेन चोप्रेन यांना बोलवून घेतले त्यानंतर त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी रस्ता देण्याची तयारी प्रशासनाने दाखवली. कंपनी मालकानेही गुजरातमध्ये न जाण्याचा निर्णय घेतला आहे. धनवेवाडी जाण्यासाठी नवीन एकशे दहा मीटर पर्यंत रस्ता करण्यात येणार आहे. याची पाहणी एमआरडीच्या अधिकाऱ्यांनी केली.स्थानिक शेतकऱ्यांनी रस्ता करण्याला परवानगी दिली असून रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीच्या मोजणीला ही सुरुवात करण्यात आली आहे. रस्ता लवकर सिमेंट काँक्रीटचा होणार आहे.

## उच्चक्षमतेचे ध्वनीवर्धक वापरल्यास जप्त

# यंदा 'डीजे' चा आवाज थंडावणार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विसर्जन मिरवणुकीत उच्चक्षमतेचे ध्वनीवर्धक वापरल्यास ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला. ध्वनीवर्धक यंत्रणा पुरवठादार, तसेच ध्वनीवर्धक यंत्रणा हाताळणाऱ्यांविरुद्ध (डीजे) कारवाई करण्याचा इशाराही पोलीस आयुक्तांनी दिला आहे.

वैभवशाली परंपरा असलेल्या विसर्जन मिरवणुकीची तयारी अनेक मंडळांनी सुरू केली आहे. विसर्जन मिरवणुकीत उच्चक्षमतेची ध्वनीवर्धक यंत्रणा, तसेच डोळे दिपवणारे लेझर झोत वापरल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. ध्वनीवर्धक यंत्रणेत 'प्रेशर मोड'उपकरणाचा वापर केला जातो. कर्णकर्कश आवाजामुळे ध्वनीप्रदुषण होते. त्याचे मानवी शरीरावर घातक परिणाम होतात. ध्वनीप्रदुषणाबाबत सर्वोच्च न्यायालय, तसेच राष्ट्रीय हरित लवादाने निर्देश दिले आहेत. आदेशाचे उल्लंघन केल्यास विसर्जन मिरवणुकीत उच्च क्षमतेची ध्वनीवर्धक यंत्रणा वापरणारे डीजे, तसेच ध्वनीवर्धक पुरवठादारांविरुद्ध कारवाई करण्यात येतील. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करुन ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करण्यात येईल, असे विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त जी. श्रीधर यांनी आदेशात म्हटले आहे.

### घातक लेझर झोतांवर कारवाई

● गेल्या वर्षी विसर्जन मिरवणुकीत लेझर दिव्यांचा वापर करण्यात आला होता. घातक झोतांमुळे अनेकांना त्रास झाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. कोल्हापूरमध्ये लेझर झोतांमुळे तिघांच्या डोळ्यांना इजा पोहोचल्याची घटना नुकतीच घडली होती. विसर्जन मिरवणुकीत लेझर झोतांचा वापर करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यात लेझर दिव्यांचा वापर करणाऱ्यांविरुद्ध हडपसर पोलिसांकडून नुकतेच गुन्हे दाखल करण्यात आले.




## मनपा अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

# अमित ठाकरेंची मनपा वसतिगृहाला भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी शनिवारी मनपा वसतिगृहाला भेट दिली. पाहणीदरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी माजी नगरसेवक किशोर शिंदे, आशिष साबळे, प्रशांत कनोजिया आदी उपस्थित होते. ठाकरे यांनी विद्यार्थांना विविध प्रकारचे प्रश्न विचारले. तसेच महापालिका समाज विकास विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांना ही विविध प्रश्न विचारून धारेवर धरले.

वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू होतो कसा? महापालिका प्रशासन झोपले होते का? वसतिगृहात मोकळी हवा, सूर्यप्रकाश ही येत नाही? विद्यार्थ्यांना जेवण नाही?' अशा खास ठाकरे स्टाईलने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी शनिवारी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सुनावले खडे बोल. विद्यार्थी मृत्यू व वसतिगृहातील सोयी सुविधानाबाबत विद्यार्थ्यांना समवेत घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.



"डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहातील दोन विद्यार्थ्यांचा डेंगीमुळे मृत्यू होतो. महापालिका प्रशासन अजूनही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नाही. विद्यार्थी मृत्यू घटना व वसतिगृहातील संविधान बाबत विद्यार्थ्यांना घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत, त्यांच्यासमोर हा प्रश्न मांडणार आहोत.'

— अमित ठाकरे

### सैन्य दलातील अधिकाऱ्यांची धान्यतुला

**पुणे :** शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळाच्या वतीने कारगिल विजयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त 'कथा गौरव गाथा विजयाची' हा जिवंत देखावा सादर करण्यात आला आहे. गणेशोत्सव काळात मंडळातर्फे दहा दिवस दहा उपक्रम राबविण्यात येतात.

या अंतर्गत भारतीय सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सैन्य दलातील पाच अधिकाऱ्यांची धान्य तुला करण्यात आली. यावेळी राजेंद्र निंभोरकर आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांच्या हस्ते सैनिकांचा सन्मान करण्यात आला.



## Selected

### माझा बाप्पा...



**पुणे :** मुक्तांगण न्यू इंग्लिश स्कूल, पुणे मधील सिनियर केजी मध्ये शिकणारी कु. रिद्धी मोहन पवार हीने रेखाटलेले गणपतीचे सुंदर चित्र.

## समृद्धी हाईट्स सोसायटीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा



**कात्रज :** समृद्धी हाईट्स सोसायटीत यंदा पर्यावरण संवर्धनाच्या ध्येयाने प्रेरित गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यावरण पूरकतेचा विचार करून, शाडू मातीच्या गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. ज्याचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात आले. जलप्रदूषण टाळणे हा यामागील उद्देश होता. प्लास्टिकमुक्त उत्सवाचे आयोजन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला गेला. सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बायोडिग्रेडेबल वस्तूंचा वापर करण्यात आला. उत्सवाचे आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणी यासाठी मकरंद धुमाळ, आनंद पुजारी, शशिकांत साने, राहुल पाटील, अभिजीत भोसले यांच्यासह इतर सदस्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. या सर्वांनी उत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी अत्यंत कष्ट घेतले. त्यामुळे गणपती विसर्जन सोहळा शांततेत पार पडला.

## रसिकांना हसविण्याचे काम नाटकाद्वारे सदैव करू : संकर्षण कऱ्हाडे



**पुणे :** आयुष्यात घडणारी पहिली गोष्ट नेहमीच खास असते. मी लिहिलेल्या 'तू म्हणशील तसे' या व्यावसायिक नाटकाला रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला आहे. पुण्यात शनिवारी ३८८ वा प्रयोग सादर झाला. कोथरूड गणेश फेस्टिवल अनेक वर्षे सुरू रहावा अशी सदिच्छा देत या फेस्टिवलमध्ये सहभागी होता यावे अशी अपेक्षा प्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे यांनी व्यक्त केली. कोथरूडकरांना हसविणे अवघड आहे, पण नाटकाच्या माध्यमातून हसविण्याचे काम प्रामाणिकपणे करू अशी ग्वाहीही त्यांनी दिली. 'तू म्हणशील तसे' या नाटकाच्या प्रयोगाला रसिकांच्या उदंड प्रतिसाद मिळाला. संवाद, पुणे व प्रबोधन विचारधारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कोथरूड गणेश फेस्टिवलला 'तू म्हणशील तसे' या नाटकाच्या प्रयोगाने (दि. १४) सुरुवात झाली. फेस्टिवलचे उद्घाटन संकर्षण कऱ्हाडे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते रसिकांशी संवाद साधताना बोलत होते. कोथरूडचे प्रथम आमदार चंद्रकांत मोकाटे, लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप सोसायटीच्या पुणे शाखेचे संचालक सुशील जाधव, बढेकर ग्रुपचे चेअरमन प्रविण बढेकर, फेस्टिवलचे निमंत्रक, संवाद, पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन, निकिता मोघे, रवळनाथ को-ऑप फायनान्स सोसायटीचे ब्रँच मॅनेजर सुहास नाडगौडा, महेंद्र काळे, हर्षद झोडगे, पार्थ टाकळकर आदी मंचावर होते. सोमनाथ पाटील (दुबई) यांचा या वेळी सन्मान करण्यात आला. कोथरूड गणेश फेस्टिवलचे यंदाचे तिसरे वर्ष आहे.

## ऑटो रिक्षा मंडळाकडून नोंदणीचे आवाहन

**पुणे :** राज्य शासनाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत ऑटो रिक्षा आणि मीटर्ड टॅक्सी चालकांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात येणार असून संबंधितांनी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे. मंडळामार्फत जीवनविमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्यविषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसाहाय्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृद्धी योजना, ६५ वर्षांवरील ऑटो रिक्षा व मीटर्ड टॅक्सी परवानाधारकांना निवृती सन्मान योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान, नवीन ऑटो रिक्षा, मीटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी कर्ज आदी योजना राबविण्यात येणार आहेत. या योजनेंतर्गत नोंदणी प्रक्रिया परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. मंडळाच्या सभासदत्वासाठी अर्जदाराकडे राज्यामध्ये नोंदणी असलेल्या ऑटो रिक्षा, मीटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व बॅच असणे बंधनकारक राहील. नोंदणीकृत चालकांना मंडळाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाकडून ओळखपत्र देण्यात येणार आहेत.

राष्ट्रसंचार शैक्षणिक रा

## पेट परिक्षेत एकही विद्यार्थी पास नाही

# विद्यापीठाच्या मराठी विभागाचा भोंगळ कारभार

### विभागाकडून चुकीची उत्तरपत्रिका तपासणी

**पुणे :** पीएचडी प्रवेश प्रक्रिये संबंधित आवश्यक पेट परिक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी घेण्यात आली होती. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील १८ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली होती. यावेळी अनेक केंद्रांवर परीक्षा दिनी गोंधळ झाल्याच्या घटना घडल्या होत्या. अनेक केंद्रांवर पेपर उशीरा सुरू झाले होते. त्यामुळे विद्यार्थीनी संताप व्यक्त केला होता. काल दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ रोजी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडून निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या प्राप्त तक्रारीनुसार अशी माहिती समोर येत आहे की, विद्यापीठातील मराठी विभागातील बहुसंख्य सर्वच विद्यार्थी हे नापास झाले आहेत. सर्वांच्या निकालावर नॉट क्वालिफाईड. येत आले आहे. गोपनीय सुत्रांकडून आलेल्या माहितीनुसार मराठी विभागाकडून चुकीची उत्तरपत्रिका तपासणी विभागाकडे दिली गेली आहे. आमची माननीय कुलगुरू महोदय यांना विनंती आहे की त्यांनी या सर्व गैरप्रकारांची सखोल चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती गठीत करावी. व चौकशी अंती दोषी प्राध्यापकांवर कारवाई करून विद्यार्थींना न्याय द्यावा.


"आता झालेली पेट परिक्षा ही शेवटची परीक्षा आहे. यानंतर पीएचडी साठी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थींना नेट परिक्षा अनिवार्य करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची ही शेवटची संधी देखील विद्यापीठ प्रशासनाच्या व विभागाच्या चुकांमुळे वाया जाणार असेल तर ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. नवीन प्रभारी कुलसचिवांच्या कार्यकाळामध्येच अशा पद्धतीच्या घटना घडत आहेत.

- पँथर राहुल ससाणे, अध्यक्ष - विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती, महाराष्ट्र राज्य



## प्रदर्शन ..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पुणे :** पुणे फेस्टिवल २०२४ अंतर्गत 'आकृती ग्रुप' तर्फे 'कलाविष्कार', हे देशभरातील चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन, बालगंधर्व कलादालन येथे भरवण्यात आले आहे. शहरातील प्रख्यात चित्रकार व्ही एस कुलकर्णी, रवी देव, रावसाहेब गुरव, गोपाळ नंदुरकर, दिलीप पुराणिक, मिलिंद भांजी, संदीप यादव व इतर २५ हून अधिक चित्रकारांनी चित्रप्रदर्शनात चित्र प्रदर्शित केले.

## पुणे फेस्टिवल २०२४ अंतर्गत

# 'कलाविष्कार' पेंटिंगचे प्रदर्शनाचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे फेस्टिवल २०२४ अंतर्गत 'आकृती ग्रुप' तर्फे 'कलाविष्कार', हे देशभरातील चित्रकारांच्या चित्रांचे प्रदर्शन, बालगंधर्व कलादालन येथे भरवण्यात आले. यंदाच्या वर्षी हे 'नैशनल आर्ट फेअर' आहे. यासाठी भारतातून अहमदाबाद, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, दिल्ली, रत्नागिरी, ठाणे, बदलापूर, गोवा, झारखंड अशा बऱ्याच ठिकाणाहून पुरुष व महिला नामवंत चित्रकार सहभागी झाले आहेत. शनिवारी बालगंधर्व कलादालन येथे प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत उल्हास पवार, दिल्लीच्या ज्येष्ठ चित्रकार सुमित्रा अहलावत, पुणे फेस्टिवलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक ॲड. अभय छाजेड यांच्या हस्ते झाले. सोमवार १६ सप्टेंबरपर्यंत बालगंधर्व कलादालन येथे सकाळी १० ते ८ पर्यंत हे चित्रप्रदर्शन पुणेकरांना विनामुल्य आहे.

प्रदर्शनात राजस्थान येथील ज्येष्ठ चित्रकार हनुमंत सानी, उत्तर प्रदेश येथील ज्येष्ठ चित्रकार अजय रघुवंशी, झारखंड येथील ज्येष्ठ चित्रकार सरोज मिश्रा व दिल्ली येथील नामवंत चित्रकार कृष्ण कुंदरा, रत्नागिरी येथील चित्रकार विक्रम परांजपे, गोवा येथून वासुदेव शेटे व प्रवीण नाईक, अहमदाबाद येथून चित्रकार मृणाल दत्त, मध्यप्रदेश येथून चित्रकार शबनम शाह, जळगाव येथील चित्रकार श्याम कुमावत अशा चित्रकारांची १०० हून अधिक चित्रे ह्यामध्ये समाविष्ट आहेत.

सांस्कृतिक पुणे शहरांमध्ये, कलाकारांना मानाचे स्थान देण्यासाठी प्रथमच बाहेरील राज्यातून आलेल्या या चित्रकारांबरोबर पुणे शहरातील नावाजलेले चित्रकारांची ओळख व्हावी व या क्षेत्रात एकमेकांच्या सहाय्याने त्यांना पुढे काम करता यावे या उद्देशाने आकृती ग्रुपने हा उपक्रम हाती घेतला आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणुकीच्या रणधुमाळीसाठी सज्ज

# प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंच्या नेतृत्वात स्वाक्षरी मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी शनिवारी पुण्यात पक्षाच्या स्वाक्षरी मोहिमेत सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला राष्ट्रवादीच्या प्रदेश महिला मोर्चाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर उपस्थित होत्या. पुण्यात आयोजित स्वाक्षरी मोहिमेत हजारो लोकांनी सहभाग नोंदवला. एका पांढऱ्या कॅनव्हासवर स्वाक्षऱ्या करत माझी लाडकी बहीण योजनेला पाठिंबा देत पुढील ५ वर्षे ही योजना सुरू राहावी अशी इच्छा व्यक्त केली.

या प्रसंगी बोलताना सुनील तटकरे यांनी महायुती सरकारच्या महिला केंद्रीत कल्याणकारी योजनांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, "माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत शिक्षण आणि लेक लाडकी योजना यांसारख्या योजना या सरकारने राबवल्या आहेत. राज्यातील महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न हे सरकार करत आहे.

युवा नेते सूरज चव्हाण यांनी राज्यातील विविध मतदारसंघात स्वाक्षरी मोहीम राबवली आहे. शनिवारी त्यांनी वडगावशेरी मोहिमेचे नेतृत्व केले. यावेळी आमदार सुनील टिंगरे, पुणे शहर अध्यक्ष दीपक मानकर, पुणे युवक शहर अध्यक्ष समीर चांदेरे हे देखील सामील होते. लोकांनी स्वाक्षरी करत आपला पाठिंबा दिला आहे.







"अजित दादांनी देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आदिती तटकरे यांच्यासोबत या अभूतपूर्व योजना सुरू केल्या आहेत. एका मुलीला आपला जीव गमवावा लागला होता, कारण तिचे पालक तिच्या फी पैकी ५०% फी भरू शकत नव्हते. आता वार्षिक ८ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील मुलींच्या उच्च शिक्षणाचा खर्च राज्य सरकार मुलींना मोफत शिक्षण योजनेतून उचलणार आहे."

— सुनील तटकरे, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

# "पुण्याच्या विकासासाठी मविआचे सरकार येवू दे"

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहराचा विकास खऱ्या अर्थाने व्हायचा असेल, तर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे!, असे साकडे माजी आमदार आणि प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी दगडूशेठ गणपतीला घातले. दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेऊन मोहन जोशी यांनी सहकुटुंब श्रींची आरती केली.



याप्रसंगी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांनी त्यांना मानाचे महावस्त्र देऊन त्यांचे स्वागत केले. पुणे शहरात उत्सव शांततेत आणि गुण्यागोविंदाने साजरा होईल, असा विश्वास मोहन जोशी यांनी व्यक्त केला.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने आयोजन

# मोफत व्हेंटिलेटर व आयसीयू बेड सुविधा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जगभरातील गणेशभक्तांचे आराध्य दैवत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गणेशोत्सवात लाखो भाविक येतात. त्यांना ऐन गर्दीत उद्भविणा-या आरोग्य समस्यांचे निराकरण करण्याकरिता जय गणेश रुग्णसेवा अभियानांतर्गत आरोग्य तपासणी केंद्र, १० ठिकाणी मोफत रुग्णवाहिका सेवा आणि व्हेंटिलेटर व आयसीयू बेडची सुविधा २४ तास उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये तब्बल ३ हजार ८८१ जणांना वैद्यकीय मदत व ९८ जणांना आयसीयू सेवेचा लाभ झाला आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण यांनी दिली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने १३२ व्या वर्षी गणेशोत्सवात २४ तास मोफत वैद्यकीय मदत केंद्र गणपती मंदिर परिसरात आहे.

यामध्ये भारती हॉस्पिटल रिसर्च सेंटर धनकवडी, सूर्या सह्याद्री हॉस्पिटल, जहांगिर हॉस्पिटल, रुबी हॉल क्लिनिक, सिल्व्हर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, डॉ.डी.वाय. पाटील हॉस्पिटल पिंपरी, ससून सर्वोपचार रुग्णालय, संचेती हॉस्पिटल, सिंबायोसीस हॉस्पिटल, सद्गुरु शंकर महाराज मठ वैद्यकीय समिती यांचा सहभाग आहे.




### गणपती मंदिराशेजारी आयसीयू विभागाची मोफत सुविधा

● गर्दीच्या वेळी श्वसनाला त्रास होणे, छातीत दुखणे, उच्च रक्तदाब, चक्कर येणे यांसह अनेक अत्यावश्यक व तातडीच्या समस्या उदभवतात. त्यावेळी उपसंचालक आरोग्य सेवा पुणे, पुणे मनपा आरोग्य विभागाच्या सहयोगाने मोफत आयसीयू सेवा उपलब्ध करुन दिले जात आहे.

● तब्बल ३८८१ जणांना वैद्यकीय मदत

#रा



# समुद्री मासा; आयुर्मर्यादा पाच शतके!

पृथ्वी हा एकमेव ग्रह आहे, जिथे जीवसृष्टी आहे. येथे जैवविविधता पाहायला मिळते. प्राणी, पक्षी, मासे यांच्यातही भरपूर प्रमाणात जैवविविधता आढळून येते. पृथ्वीवरील सजीवांना विशिष्ट आयुर्मान दिलेले, पण कोणीच अमर नाही. मनुष्य प्राणी १०० वर्षांच्या आसपास जगतो. पण, असेही काही प्राणी आहेत, जे शंभर वर्षांपेक्षाही जास्त वर्षे जगतात. त्यात अनेक उभयचर आणि जलचर प्राणी आहेत. ग्रीनलँड नामक शार्क तर अगदी ५०० वर्षे जिवंत राहतो, अशाही नोंदी आहेत.

कासव हा १५०-२०० तसेच ३०० वर्षांपर्यंत अगदी सहज जगतो, अशा अनेक नोंदी आढळतात. यातही अनेक प्रजाती आहेत. व्हेल मासा देखील ३००-४०० वर्षांपर्यंत अगदी सहज जगतो. शार्क मासा हा अत्यंत जीवघेणा असा मासा आहे. हा मासा मांसाहरी असून, वेळप्रसंगी माणसावरही हल्ला करतो. शार्क हा मासा ५०० वर्षांपर्यंत जगू शकतो. यातील ग्रीनलैंड नामक शार्क तर ५०० वर्षांहूनही जास्त वर्ष जगतो. म्हणजे समजा एकदा मासा हा १६००-१७०० च्या काळात जन्मला आला असेल तर तो आजही जिवंत असेल, असा याचा अर्थ आहे. या माशांची मेटाबॉलिक प्रक्रिया ही फारच मंद असते. त्यामुळे हे मासे जास्त वर्ष जगतात, असे तज्ज्ञ मानतात. ग्रीनलँड शार्क या आर्क्टिक आणि अटलांटिका महासागरात राहतात. मेटाबॉलिक प्रक्रिया मंद असल्याने मादा शार्क १५० वर्षांनंतर पिल्लांना जन्म देते, असेही यावेळी सांगण्यात येते.

# मृत्यू सांगणारी चाचणी!

चं जन्म आणि मृत्यू या गोष्टी आपल्या हाती नसतात. या दोन टोकांमधील जे जीवन आपल्याला मिळालेले असते, ते कसे जगायचे तेच तेवढे आपल्या हाती असते. मात्र, ब्रिटनमधील वैज्ञानिकांनी चक्क मृत्यू चाचणी विकसित केलेली असून, त्यात तुमची अजून या पृथ्वीतलावर किती वर्षे उरली आहेत, हे सांगितले जाऊ शकेल. जगात अशी चाचणी विकसित केली जाण्याची बहुधा ही पहिलीच वेळ आहे. लँकेस्टर विद्यापीठाच्या ॲनेटा स्टेफनोव्हस्का व पीटर मॅकलिंटॉक यांनी या चाचणीचे पेटंटही घेतले आहे.



सामान्य लोकांसाठी वापरता येईल, अशा पद्धतीचे उपकरण या चाचणीसाठी विकसित केले जाणार असून, ते डॉक्टरांना उपलब्ध करून दिले जाणार आहे. स्टेफनोव्हस्का यांनी सांगितले, की आम्ही एक विशिष्ट प्रकारचा माहितीसंग्रह तयार करीत आहोत व प्रत्येक व्यक्तीच्या पेशींच्या दोलनांची तुलना त्याच्यातील आकड्यांशी करून त्या व्यक्तीचा मृत्यू कधी होईल हे सांगता येईल; किंबहुना त्यांच्या मृत्यूसमयी वयाचा नेमका आकडा सांगता येईल. कशी आहे 'मृत्यू चाचणी' या चाचणीत वेदनारहित अशी लेसर शलाका मनगटी घड्याळासारख्या यंत्राने त्वचेच्या पृष्ठभागावर सोडली जाते. यात आंतरस्तरीय पेशींचे विश्लेषण करून आपले शरीर वयपरत्वे किती दिवसांत उतरणीस लागेल किंवा त्याला वार्धक्य येईल, याचे मापन केले जाते. शरीरातील अतिशय गुतागुंतीच्या शारीरिक क्रियांना रक्तवाहिन्या, सूक्ष्म रक्तवाहिन्या प्रतिसाद देत असतात, त्याचाच वापर या मृत्यू चाचणीत करण्यात आला आहे. या आंतरस्तरीय पेशींमधील दोलनांचे मापन करून कर्करोग, विस्मृती यांसारख्या रोगांचा अंदाज घेतला जातो व मृत्यूपूर्वीचा किती काळ शिल्लक आहे ते समजते.

# आली पहिली सोलर कार



जीवाश्म इंधनांमुळे होणारे प्रदूषण तसेच त्यांचे गगनाला भिडलेले भाव यामुळे स्वच्छ ऊर्जेकडे जगाचे लक्ष वेधले गेले. विद्युतऊर्जा, सौरऊर्जा यांचा वाहनांसाठी वापर करणे सुरू झाले. सौरऊर्जेवर चालणारे विमानही बनवण्यात आलेले असून, त्याचे दीर्घ टप्प्याचे उड्डाणही झालेले आहे. सौरऊर्जेवर चालणारी जगातील पहिली कार बनवण्याचा मान नेदरलँडला मिळाला. विशेष म्हणजे तेथील विद्यार्थ्यांनी अशी कार बनवली होती.

नेदरलॅन्डच्या एन्धोवेन तांत्रिकी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी ही सौरऊर्जेवर चालणारी कार विकसित केली. विद्यार्थ्यांनी विकसित केलेली 'स्टेला' ही जगातील पहिली सौरऊर्जेवर चालणारी कार ठरली आहे. ही कार संपूर्णपणे सौरऊर्जेवर चालणारी असून, यात चार माणसे बसण्याची व्यवस्था आहे. सौरऊर्जेच्या माध्यमातून संपूर्णपणे बॅटरी प्रभारित झाल्यानंतर ही कार ६०० किलोमीटर अंतर पार करू शकते, असा अंदाज आहे. प्राथमिक तत्त्वावर स्टेला कारची चाचणीही करण्यात आली आहे. 'स्टेला'कारच्या वरच्या भागावर सौरऊर्जा ग्रहण करणाऱ्या धातूचे आवरण देण्यात आले आहे. यामार्फत ग्रहण केली जाणारी ऊर्जा कारच्या बॅटरीमध्ये साठविली जाते त्यातून कारला ऊर्जाप्राप्त होते. परंतु, यासर्व प्रक्रियेला भरपूर वेळ लागत असल्याने एखाद्या ठिकाणी त्वरित पोहोचायचे असल्यास स्टेलाचा वापर करता येण्याजोगा नाही.

# मानवी मूत्रापासून चार्जिंग?



मानवी मूत्राच्या मदतीने मोबाईल चार्ज करण्याची पद्धत जगात प्रथमच ब्रिटनच्या वैज्ञानिकांनी शोधून काढलेली आहे. ब्रिस्टॉल रोबोटिक लॅबोरेटरीत काम करणाऱ्या वैज्ञानिकांनी मानवी मूत्रापासून वीज निर्मिती करून नंतर त्यापासून मोबाईल चार्ज करण्यात हे यश मिळवले. ब्रिस्टॉल येथील वेस्ट ऑफ इंग्लंड विद्यापीठातील डॉ. लोआनिस लेरोपॉलस यांनी सांगितले की, मानवी मूत्रापासून मोबाईल चार्जिंगची पद्धत आम्ही जगात प्रथमच विकसित केली याचा आनंद आहे. शरीरातून बाहेर टाकल्या जाणाऱ्या त्याज्य पदार्थापासून अशा प्रकारे ऊर्जा निर्मिती करण्याचे काम कुणी केले नव्हते. त्यामुळे पर्यावरणालाही फायदा होणार आहे.

मानवी मूत्राचा पुरवठा अखंड मिळू शकतो. यात मानवी मूत्र हे अनेक मायक्रोबियल फ्युअल सेल्स म्हणजे सूक्ष्मजीव इंधन घटातून सोडले जाते. त्यातून वीज निर्मिती होते. या इंधनघटाचे वैशिष्ट? म्हणजे यातील स्रोत हा सूर्य किंवा वारा यासारखा नैसर्गिक नाही. त्यामुळे कधी सूर्यप्रकाश मिळाला कधी मिळाला नाही, कधी वारा आहे, कधी नाही या निसर्गाच्या लहरीपणावर काहीही अवलंबून नाही. आम्ही मानवी शरीरातून बाहेर टाकला गेलेला पदार्थच मोबाईल चार्जिंगसाठी वापरत आहोत. याच्या मदतीने चार्जिंग केलेल्या फोनवरून एसएमएस पाठवणे, वेब ब्राऊजिंग, छोटे फोन कॉल करता येतात. मोबाईलवरून आपण जेव्हा फोन करतो त्यावेळी जास्तीत जास्त ऊर्जा वापरली जात असते. परंतु, या बॅटरीच्या मदतीने मोबाईल जास्त काळ चार्जिंग टिकेल अशा पद्धतीने चार्ज करता येतो. वैज्ञानिकांचे असे म्हणणे आहे की, हे संशोधन भविष्यकाळात अधिक उपयोगी ठरू शकेल. घरातील स्नानगृहात जर ते लावले, तर मानवी मूत्र गोळा करून त्याच्यापासून वीज निर्मिती केली जाईल व त्यावर मोबाईल फोन, रेझर, शॉवर चालवता येऊ शकतात. केमेस्ट्री जर्नल ऑफ फिजिकल केमेस्ट्री केमिकल फिजिक्स या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे. मायक्रोबियस फ्युअल सेल (एमएफसी) हा सेंद्रिय पदार्थातील ऊर्जेचे रूपांतर हे विजेत करतो, त्यात सूक्ष्मजीवांच्या चयापचयाचा वापर केला जात असतो, असे संशोधकांचे म्हणणे आहे. विद्युत ऊर्जा हे यात सूक्ष्मजीवांच्या नैसर्गिक चक्रात निर्माण होणारे उपउत्पादन आहे. हे सूक्ष्मजीव मानवी मूत्र खातात व त्यामुळे जास्त ऊर्जा निर्मिती बराच काळ करीत राहतात. या इंधन घटातून मिळणारी वीज तुलनेने कमी प्रमाणात असली तरी ती संधारित्रात साठवून चार्जिंग करणे शक्य होते.

# स्पेलिंग चूक दाखवणारा पेन

इंग्रजी शाळांचे सगळीकडे पेव फुटले असले, तरी त्यामुळे इंग्रजी येतेच अशातला भाग नाही. ही भाषा शिकताना खरी भीती वाटते ती स्पेलिंग चुकण्याची. अनेक मुले घोकंपट्टी करून चक्क स्पेलिंग पाठ वगैरे करतात; पण आता तुम्ही समजा लिहिताना चुकलात अन् तुमचा पेन थरथरू लागला, त्यात स्पंदने निर्माण झाली तर आश्चर्य वाटून घेऊ नका. कारण, तसा पेन जर्मन संशोधकांनी तयार केलेला आहे. हा उच्च तंत्रज्ञानावर आधारित पेन तुमचे हस्ताक्षर खराब होऊ लागले किंवा तुमचे स्पेलिंग चुकले तरी त्याच्या संवेदकाच्या मदतीने संदेश घेतो व थरथरतो, त्यामुळे आपले स्पेलिंग चुकले आहे, असे खुशाल समजावे. लर्नस्टिफ्ट कंपनीचा हा चक्क शाईचा पेन असून, त्यात विशेष गतिकीय संवेदक आहेत व त्यात छोट्या बॅटरीवर चालणार लिनक्स संगणक वायफाय चिपसह बसवलेला आहे. हे सगळे भाग या पेनच्या विशिष्ट हालचाली ओळखतात, अक्षरांच्या आकाराचे ज्ञान त्यांना आहे. शब्दांचे ज्ञान आहे. जर तुमचे तुम्ही अक्षर नीट काढत नसाल, ते वाईट व गचाळ येत असेल तर हा पेन स्पंदन पावतो व थरथरतो. कॅलिग्राफी मोड किंवा ऑर्थोग्राफी मोड असे दोन पर्याय या पेनात आहेत.

त्यात कॅलिग्राफी मोडमध्ये अक्षरांचे वळण बघितले जाते, तर ऑर्थोग्राफी मोडमध्ये शब्द ओळखले जातात ते डेटाबेसमधील शब्दांशी जुळवून बघितले जातात. जर विशेष शब्द ओळखला गेला नाहीतर पेन थरथरतो, असे लर्नस्टिफ्ट या म्युनिच येथील कंपनीचे सहसंस्थापक डॅनियल काशमॅशर यांनी सांगितले. इतर संस्थापकांत फॉक वोल्स्की यांचा समावेश असून, त्यांचा दहा वर्षांचा मुलगा गृहपाठ करीत असताना ही स्पेलिंग चुकल्यास थरथरणाऱ्या पेनची कल्पना सुचली. स्पेलिंग चुकल्याच्या भीतीने त्यांच्या मुलाचे लक्ष सारखे तिकडेच विचलित होत असे, त्यामुळे स्पेलिंगच चुकणार नाही, असे काहीतरी केले पाहिजे म्हणून त्यांना हा पेन तयार करावासा वाटला.



# दृष्टीहीनांसाठी नवं उपकरण


तंत्रज्ञानाने गेल्या काही वर्षांच्या काळापासून थक्क करणारीच कामगिरी केलेली आहे. त्याचे एक उदाहरण इंग्लंडमध्ये पाहायला मिळते. आपण कानाने पाहू शकतो का? याचे उत्तर नक्कीच सर्वजण नाही असे देतील; पण वैज्ञानिकांनी मात्र हा नकार होकारात बदलला आहे. त्यांनी असे क्रांतिकारी नवे उपकरण शोधून काढलेले आहे, ज्याच्या मदतीने अंध लोक आवाजाच्या मदतीने त्यांच्या मनात आजूबाजूच्या वस्तूची प्रतिमा तयार करू शकतील.

या अनोख्या संवेदनशील उपकरणाचे नाव व्हॉईस असे असून, त्यात मेंदूला आवाजाचे रूपांतर प्रतिमांमध्ये करण्याचे प्रशिक्षण दिले जाते व त्याचा वापर अंध व अंशतः दृष्टी असलेल्या रुग्णांसाठी केला जाऊ शकतो. इंग्लंडमधील वाथ विद्यापीठातील डॉ. मायकेल प्रॉलक्स यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ज्यांच्या डोळ्यांवर पट्टी बांधली आहे, अशी दृष्टी असलेले लोक या उपकरणाच्या मदतीने केल्या जाणाऱ्या डोळ्यांच्या चाचणीला कसा प्रतिसाद देतात याचा अभ्यास त्यांनी केला. त्यांना प्रमाणित आय चार्ट टेस्टला सामोरे जाण्यास सांगण्यात आले, या चाचणीला स्नेलन टंबलिंग इ टेस्ट असे म्हटले जाते. त्यात संबंधित व्यक्तीला इ हे इंग्रजी अक्षर चार वेगवेगळ्या दिशांना फिरवलेल्या अवस्थेत वेगवेगळ्या आकारात दाखवले जाते. २०/२० या मापनास तुमची दृष्टी योग्य असल्याचे मानले जाते. यात डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या व्यक्तींनी ही चाचणी हे उपकरण वापरून चांगल्या पद्धतीने पार केली. मूलपेशी प्रत्यारोपण व रेटिनल प्रॉस्थेसिस या आधुनिक तंत्रापेक्षाही यात दृष्टी चांगली सुधारल्याचे दिसून आले. ही यशस्वी दृष्टी पातळी २०/४०० होती. मूलपेशींच्या वापराने ती २०/८०० इतकी वाढवता येते, असे प्रोलक्स यांचे मत आहे. त्यांच्या मते संवेदनशील पर्यायी उपकरणांचा वापर हा इतर तंत्रासमवेत केला तर मेंदूत संबंधित वस्तूंची प्रतिमा तयार करता येते. फ्रंटियर्स इन सायकॉलॉजी या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले होते. संशोधन पथकात व्हॉईस या संवेदन उपकरणाचे निमति डॉ. पीटर मेजर, ॲलेस्टर हाय, डेव्ह ब्राऊन यांचा समावेश होता.



# कहाणी शतकापूर्वीच्या रॉयल सफरचंदांची

प्रेम डोग्रा यांनी सांगितले की, या भागातील सफरचंदाची रॉयल विविधता त्याच्या चव आणि उत्कृष्ट शेल्फ लाईफसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. आजही या गावात १०० वर्षे जुनी रॉयल सफरचंद प्रकारची फळझाडे आहेत. रॉयलशिवाय सफरचंदांच्या ५० हून अधिक जातींचे येथे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतलं जातं. त्यांनी सांगितलं की सफरचंदाची खास रॉयल जाती वर्षभर नीट साठवून ठेवली तर ते खराब होत नाही आणि त्याची चव, रस आणि गोडपणात विशेष फरक पडत नाही. यामुळेच येथील सफरचंदांना देश-विदेशात मोठी मागणी आहे, त्यामुळे बागायतदारांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव आणि नफा मिळतो.



# बनली 'अपघातमुक्त' कार!

चालकरहित कार ही काही आता नवलाई राहिलेली नाही; मात्र भारतीय वंशाच्या एका वैज्ञानिकासह काही संशोधकांनी अशी 'अपघातमुक्त' मोटार तयार केली आहे. ही कार गर्दीच्या रस्त्यावरूनही चटकन मार्ग काढू शकते. ही चालकविरहित मोटार कार्नेगी मेलॉन विद्यापीठाने तयार केली असून ती रस्ता कोंडी व महामार्गावरील वाहतुकीतूनही सुरक्षित चालू शकते हे प्रात्यक्षिकात दाखवून देण्यात आले.



ही मोटार पॅसाडेनातील क्रॅनबेरी येथून पीटसबर्गपर्यंत ५३ कि.मी. धावली व त्यात कुठलीही अडचण आली नाही. ही मोटार इतर २०११- कॅडिलॅक एसआरएक्स मोटारीसारखी दिसते. चालकाच्या जागेवर माणूस बसलेला असतो, पण तो केवळ सुरक्षा काळजी म्हणून असतो.

प्रत्यक्षात गाडी आधुनिक सॉफ्टवेअरच्या मदतीने चालवली जाते. रडार, लिडार व इन्फ्रारेड कॅमेरे यांच्या मदतीने मिळालेल्या संदेशांच्या मदतीने या गाडीला दिशा मिळत असते किंवा सॉफ्टवेअर त्याआधारे निर्णय घेत असते कार्नेगी मेलॉन विद्यापीठाच्या वाहतूक संशोधन विभागाचे प्रमुख असलेले राजकुमार यांनी सांगितले, की स्वयंचलित पद्धतीने मोटार चालवण्याचे तंत्रज्ञान वेगाने विकसित होत आहे. ही गाडी चालकाविना लेन बदलू शकते, ट्रॅफिक लाईट बघून थांबू शकते-जाऊ शकते. या गाडीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात महागडे संवेदक वापरलेले नाहीत. त्यात रडार, लिडार यांचा वापर केलेला असून त्याचे संगणक हे कार्गोमध्ये ठेवलेले आहेत. कार्डिलॅक एसआरएक्स ही मोटार वायरलेस वाहनांशी संपर्कात राहू शकते. या गाडीचा मुख्य हेतू हा अपघात कमी करणे, परिणामी प्राणहानी टाळणे, वेळ वाचवणे हा आहे. दारू पिऊन गाडी चालवणे, मोबाईल चालू असताना गाडी चालवणे यामुळे होणारे अपघातही यामुळे टळू शकतील.

# बनतेय सर्वांत मोठी बॅटरी

अमेरिकेतील एक एनर्जी स्टार्टअप कंपनी जगातील सर्वात मोठी बॅटरी म्हणजेच ऊर्जा साठवणीची जागा बनवणार आहे. 'फॉर्म एनर्जी' नावाचे हे स्टार्टअप मेन राज्याच्या लिंकनमध्ये आहे. इतक्या मोठ्या बॅटरीच्या निर्मितीचा उद्देश पॉवर ग्रीडवरील भार कमी करणे हा आहे. या प्रकल्पाला अमेरिकेच्या ऊर्जा विभागाकडून वित्तसहाय्य देण्यात आले आहे.



ऊर्जा साठवणीच्या समस्येवरील अशा समाधानासाठी डिपार्टमेंट ऑफ एनर्जीने १४७ दशलक्ष डॉलर्सचे अनुदान दिले आहे. जर सध्याच्या योजनेत परिवर्तन झाले नाही तर या बॅटरीत ८५०० मेगावॅट-अवर इलेक्ट्रिसिटी स्टोअर करण्याची क्षमता असेल. फॉर्म एनर्जीचे सीईओ आणि सह-संस्थापक माटेओ जारामिलो यांनी म्हटले आहे की बॅटरी सिस्टीममध्ये जगातील कोणत्याही सिस्टीमच्या तुलनेत अधिक एनर्जी स्टोअर करण्याची क्षमता असेल. सध्या कॅलिफोर्नियातील एडवर्डस आणि सॅनबोर्न सोलर-प्लस-स्टोरेजकडे अशी सर्वाधिक क्षमता आहे. तिथे ३,२८७ मेगावॅट-अवर स्टोअर करण्यासाठी १,२०,००० पेक्षा अधिक बॅटरींचा वापर होतो. नव्या बॅटरीत ८५०० मेगावॅट-अवरची क्षमता आहे. ही ऊर्जा इतकी आहे की त्यापैकी केवळ एक मेगावॅट-अवर एक इलेक्ट्रिक कारला ५८०० किलोमीटरपर्यंतचा प्रवास करण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकते. जर फॉर्म एनर्जीच्या नव्या बॅटरीला एखाद्या इलेक्ट्रिक कारशी जोडल्याची कल्पना केली तर ही कार पृथ्वीची १२२८ वेळा प्रदक्षिणा घालू शकेल किंवा सुमारे ५ कोटी किलोमीटरचा प्रवास करू शकेल. एखाद्या चांगल्या लॅपटॉप बॅटरीची क्षमता सुमारे ६५ डब्ल्यूएच असते. याचा अर्थ नवी बॅटरी १३ कोटी पट अधिक इलेक्ट्रिसिटी स्टोअर करू शकते. या नव्या बॅटरी बँकेची निर्मिती फॉर्म एनर्जीच्या नव्या आयर्न-एअर बॅटरी सिस्टीमचा वापर करून बनवले जाईल, जी 'रिव्हर्सिबल रस्टिंग'च्या प्रक्रियेचा वापर करून काम करते. ही बॅटरी ज्यावेळी डिस्चार्ज होते, त्यावेळी ती हवेतून ऑक्सिजन घेते आणि बॅटरीच्या आत असलेल्या लोखंडाला गंजवते. ज्यावेळी बॅटरी रिचार्ज होते त्यावेळी ही प्रक्रिया उलट होते. हा गंज पुन्हा लोखंडात बदलतो आणि ऑक्सिजन हवेत सोडला जातो.

## यात्रेचे गावागावात जंगी स्वागत

# स्वाभिमान यात्रेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** खा.शरद पवार व खा. सुप्रिया सुळे यांच्या मार्गदर्शनाखाली युगेंद्र पवार यांनी बारामती तालुक्यात सुरू केलेल्या स्वाभिमान यात्रेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात येत आहे. गावागावांत आधीपासूनच त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात येत असून जयघोषाने आसमंत दणाणून जात आहे.

स्वाभिमान यात्रेच्या तिसऱ्या दिवशी युगेंद्र पवार यांनी बारामती तालुक्यातील सावळ, जैनकवाडी, कटफळ, गाडीखेल, पाहुणेवाडी, शिरवली, शिरष्णे, कांबळेश्वर, सांगवी, लिमटेक या गावांना भेट देत स्थानिक नागरिकांशी संवाद साधला तसेच त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या संपूर्ण दौऱ्यात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीशमामा खोमणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष एस. एन. बापू जगताप, युवक तालुकाध्यक्ष प्रशांत बोरकर, गौरव जाधव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आदी सहभागी झाले होते.गेल्या सहा दशकांहून अधिक काळ आदरणीय पवार साहेबांच्या पाठीशी उभे असलेल्या या गावांतील नागरिकांशी भेटून आपल्याला आनंद वाटतो, त्यांच्याशी बोलताना साहेबांच्या संपूर्ण वाटचालीचा इतिहास डोळ्यांसमोर उभा असतो. साहेबांच्या धोरणामुळेविविध क्षेत्रात अनेक मान्यवर मंडळी नावारूपाला आली. अशा ठिकठिकाणी साहेबांसोबत राहीलेल्या ज्येष्ठ अनेक नागरिकांचा आशीर्वाद आणि पुढील वाटचालसाठी मार्गदर्शन सुद्धा मिळत आहे, अशी भावना युगेंद्र पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी आपल्या बारामती तालुक्यात नवीन उद्योगधंदे सुरू झाले पाहिजेत. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचा शैक्षणिक प्रवास थांबू नये, यासाठी सुप्रियाताईंच्या मार्गदर्शनाखाली पवार चॅरिटेबल ट्रस्ट सातत्याने प्रयत्नशील आहे. आदरणीय पवार साहेबांनी बारामतीचा विकास करताना पायाभूत सुविधांसह शेती, शिक्षण, रोजगार आणि आरोग्य सुविधांना प्राधान्य दिले आहे. दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी साहेबांनी डायनामिक्स डेअरीज लि. ही कंपनी बारामतीत आणली, याचा आपल्याला अभिमान वाटतो, असे त्यांनी नमूद केले.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीला आपण सर्वांनी जशी एकजूट दाखवली आहे. तशीच एकजूट येत्या विधानसभेला दाखवून आदरणीय पवार साहेबांचा पुरोगामी विचार जपला पाहिजे.

सध्याच्या राजकीय स्थितीत फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांची महाराष्ट्राला खरी गरज आहे. त्यासाठी एकत्र येऊन लढूया. बारामती तालुक्याने कायम सत्याची भूमिका घेतली आहे.

» Selected

## विद्या प्रतिष्ठानमध्ये सायबर जनजागृती

**बारामती :** येथील विद्या प्रतिष्ठानचे कला, विज्ञान, व वाणिज्य महाविद्यालय, व क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी सुभद्रा मॉल मध्ये उपस्थित असलेल्या सामान्य लोकांना सध्या शासनाच्या सुरू असलेल्या लाडकी बहीण योजनेचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन फसवणूक टाळा यासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेली सायबर सुरक्षेची शाळा लोकांना खूप भावली. तसेच आणखी काही योजनांमध्ये कशाप्रकारे सायबर हल्ले होत आहेत तेही पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांनी सादरीकरण करण करून सामान्य जनतेत सायबर जनजागृती केली. आपण या सायबर हल्या पासून कसे सावध राहावे हे देखील त्यांना समजावून सांगितले. या सुभद्रा मॉलमधील ५०० हून अधिक लोकांमध्ये जनजागृती केली. उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सध्याच्या मोबाईलच्या युगामध्ये अशा उपक्रमाची अत्यंत गरज असून समाजातील बरेच जण पैशाच्या खोट्या अमिषाला सहज बळी पडतात. हे टाळण्यासाठी जनजागृती महत्वाची आहे. कोणत्याही भूलथापांना लोकांननी बळी पडू नये असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमासाठी अक्षय भोसले यांनी शिक्षक समन्वयक म्हणून काम पाहिले तसेच या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्याचे काम केले.

# शिरदाळे परिसरात कांदा लागवडीला वेग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी - धामणी :** आंबेगावच्या पूर्व भागात यंदा पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे नाले, पाझर तलाव, बंधारे तुडुंब भरले आहेत. तर ओढे वाहू लागले आहेत.

पावसामुळे यंदा विहिरी, विंधन विहिरींना भरपूर पाणी राहणार असल्याने मांदळेवाडी, वडगावपीर, लोणी, शिरदाळे परिसरात कांदा लागवडीने वेग घेतला आहे. या परिसरातील रब्बी हंगामातील कांद हे महत्त्वाचे पीक आहे. सततच्या पावसामुळे कांदा रोपांना फटका बसला आहे

सध्या कांद्याला चांगला बाजारभाव असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

मांदळेवाडी, वडगावपीर शिरदाळे हा भाग दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. त्यामुळे जरी पावसाने जोरदार हजेरी लावली असली तरी पाण्याचा अंदाज घेऊन या भागात लवकर कांदा लागवड केली जाते, असे शेतकरी अण्णासाहेब पोखरकर यांनी सांगितले.

सध्या या भागात कांदा लागवडीने वेग घेतला आहे. मंजूर टंचाईवर उपाय म्हणून कांदा लागवड करताना शेतकरी सावड पद्धतीचा अवलंब करतात.वर्षभर कांद्याच्या भावात होणारा चढ-उतार पाहता शासनाने कांद्याला हमीभाव द्यावा, अशी मागणी कांदा उत्पादकांनी शेतकऱ्यांनी केली आहे.

## लागवड

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



» शिरदाळे (ता.आंबेगाव ) येथे सुरू असलेली कांदा लागवड

पान १ वरून

## ३५२.४९ कोटीवर महापालिकेला सोडावे लागणार आता पाणी

झाली आहे. दरम्यान सरकारनेही याबाबत स्पष्टता न दिल्याने संभ्रम निर्माण झाला आहे.

महापालिकेच्या मिळकतकर आकारणीला विरोध असल्याने फुरसुंगी आणि उरुळी देवाची या गावांनी महापालिकेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. पण येथून नियमीत करभरणाही कमी प्रमाण होता. तसेच अनधिकृत शेड, अवैध बांधकामांना तीन पट दंड केला आहे. हा दंड आकारणीस स्थगिती असली तरी त्याबाबतचा निर्णय फुरसुंगी, उरुळीसह अन्य ३४ गावांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. पण राज्य सरकारने त्याबाबत निर्णय घेतलेला नाही.

फुरसुंगी, उरुळी देवाची या दोन्ही गावांत कचरा डेपो असल्याने महापालिकेत येण्यापूर्वीपासूनच येथे विकासकामे केली जात आहेत. महापालिकेचा ११ गावांसाठी ३९२ कोटी रुपयांचा सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रकल्प सुरु असून, त्यामध्ये या दोन्ही गावांचाही समावेश होता. आता ही गावे वगळल्याने या प्रकल्पाचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दरम्यान, ही गावे महापालिकेच्या हद्दीत आल्यापासून सुमारे २०० कोटींपेक्षा जास्त रकमेची कामे झाली असून, त्यातील १३० कोटींची कामे घनकचरा व्यवस्थापन विभागाची आहेत. तसेच या गावात दरवर्षी पाण्याचे टँकर पुरविण्यासाठी १० कोटी रुपये खर्च केली जातात.

## झिकामुळे पाच जणांचा मृत्यू

रस्ता व पाषाण प्रत्येकी ९, सुखसागरनगर व मुंढवा प्रत्येकी ७, वानवडी ५, कळस ४, कोरेगाव पार्क व आंबेगाव बुद्रूक प्रत्येकी ३, लोहगाव २, विश्रामबागवाडा आणि धनकवडी प्रत्येकी १ अशी रुग्णसंख्या आहे. शहरातील एकूण १०० रुग्णांपैकी ४५ गर्भवती आहेत, अशी माहिती महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिली. शहरात झिकाच्या पाच रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यात खराडीतील ७२ वर्षीय पुरुष, पाषाणमधील ९५ वर्षीय स्त्री, बाणेरमधील ७८ वर्षीय पुरुष, कोथरूडमधील ६८ वर्षीय पुरुष आणि कर्वेनगरमधील ७६ वर्षीय पुरुष यांचा समावेश आहे. हे सर्व जण ज्येष्ठ नागरिक असून, त्यांना सहव्याधी होत्या. त्यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या रुग्णांचे वैद्यकीय अहवाल राज्याच्या आरोग्य विभागाला पाठविण्यात आले आहेत. आरोग्य विभागाची मृत्यू परीक्षण समिती या रुग्णांच्या मृत्यूचे नेमके कारण शोधणार आहे. त्यानंतर हे मृत्यू कशामुळे झाले हे स्पष्ट होणार आहे.

## गावकऱ्यांनी घडविली मंत्र्याला चिखल सफर

साचला असून नुसती माती व घाण पाणी रस्त्यावर दिसत आहेत. दरम्यान, गावातील रस्त्यांच्या वाईट अवस्थेबद्दल गावातील काही तरुण गिरीश महाजन यांना जाब विचारतांना दिसत आहे. मात्र, महाजन यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तर न देता कार्यकर्त्यांच्या दुचाकीवर बसून याच चिखल युक्त रस्त्याने जातांना दिसत आहे. सोशल मीडियावर हा व्हिडीओ तुफान व्हायरल झालाय. तर काही तरुण गिरीश महाजणांना हाका मारून त्यांच्या मागे धावतांना दिसत आहेत. हा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होतो आहे.

हा विडिओ अंबादास दानवे यांनी हा व्हिडिओ सोशल मीडिया वॉलवर पोस्ट केला आहे. यात त्यांनी त्यांना खराब रस्त्यावरून जाब विचारला आहे. जामनेर तालुक्यातील लिहा तांडा येथे भंडाऱ्यानिमित्त गिरीश महाजन गेले असता गेल्या ३० वर्षापासून गावात रस्त्यांची दुरवस्था का असा सवाल तरुणांनी विचारला. आम्ही तुम्हाला निवडून देता आणि तरीसुद्धा रस्ते खराब का? असा प्रश्न तरुणांनी विचारला असता, महाजन यांनी तेथून पळ काढला असे विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पोस्ट मध्ये लिहिले आहे.

## वर्दीला काळीमा, पोलिसाचे निलंबन

संबंध ठेव, अन्यथा तुझ्या घरातील लोकांना ठार मारु, अशी धमकी दिली होती. दरम्यान, महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर ढवळेचे निलंबन करण्यात आले आहे. मी पुण्याची लोकल आहे, माझी गुंडांबरोबर ओळख आहे. आम्ही एक सामाजिक संस्था चालवतो. आम्ही ब्लॅक मनीचे लीगलमध्ये रुपांतर करतो. आमचे 9 कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. तुझ्या नवऱ्याला 40 ते 50 लाख रुपये मिळतील, असंही ढवळे हिने पीडित महिलेला सांगितले होते. दरम्यान, पीडित महिलेने कोल्हापुरातील गडहिंग्लज तालुक्यात तक्रार दाखल केली. यानंतर तिचे निलंबन करण्यात आले आहे.

## खडकवासला...

चौथ्यांना ते निवडणुकीच्या रिंगणात उभे राहणार असताना, बदललेल्या राजकीय समीकरणामुळे त्यांच्यापुढे नवीन मित्रामुळे आव्हान उभे राहिले आहे.

महायुतीकडून विद्यामान आमदार भीमराव तापकीर हे प्रबळ दावेदार आहेत. अजित पवार यांच्या रार्ष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी विरोधी पक्षनेते दिलीप बराटे यांचे नाव चर्चेत आहे.

## माहेर संस्थेच्या नावे लग्नास मुलींच्या आमिषाने फसवणूक

**शिक्रापूर :** सध्या अनेक ठिकाणी लग्नासाठी मुली भेटत अल्स्याने अनेकजण वेगवेगळ्या संस्था व वधू वर सूचक केंद्राचा अवलंब करत असताना पुणे जिल्हातील माहेर संस्थेच्या नावाने लग्नासाठी मुली देतो असे भासवून अनेकांकडून पैसे उकळल्याच्या घटना घडत असल्याने नागरिकांनी अमिषाला बळी न पडण्याचे आवाहन माहेर संस्थच्या वतीने करण्यात आले आहे. वढू बुद्रुक ता. शिरुर येथील माहेर संस्थेच्या माध्यमातून अनेक अनाथ मुला मुलींचा सांभाळ करुन त्यांना स्वावलंबी बनवले जात असताना दोनशे जणांचे विवाह देखील मोफत करुन देण्यात आलेले असताना, सध्या पुणे जिल्ह्यात काही ठिकाणी फिरणारे युवक व युवती हे माहेर संस्थेचे पदाधिकारी असल्याचे सांगून आम्ही मुलांचे लग्न करुन देत असल्याचे भासवून अनेकांकडून हजारो रुपये घेऊन नंतर फरार होत असल्याच्या घटना घडत असल्याने त्याबाबत काही तक्रारी देखील माहेर संस्थेकडे प्राप्त झाल्या आहे.

## बिबट्याने पाडला वासराचा फडशा

**शिक्रापूर :** कासारी ता. शिरुर येथील शिंदे मळा येथील केरूभाऊ शिंदे हे रात्रीच्या सुमारास जनावरांना चारापाणी करुन झोपले असता, पहाटेच्या सुमारास शिंदे घरातून बाहेर आले त्यावेळी त्यांना घरापुढे गोठ्यात बांधलेली एक कालवड दिसली नाही त्यामुळे त्यांनी आजूबाजूला पाहिले असता बिबट्याने कालवड चा फडशा पाडल्याचे सांगण्यात आले आहे. सदर घटनेचा प्रशासनाकडून पंचनामा करण्यात आला.

## गणेशोत्सव व ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस पथकाची प्रात्यक्षिके

**जेजुरी :** सार्वजनिक गणेशोत्सव व ईद ए मिलादच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जेजुरी पोलीस स्टेशनच्या वतीने दंगा नियंत्रण प्रात्यक्षिके घेण्यात आली तसेच जेजुरी शहरातून पोलिसांचा रूट मार्च काढण्यात आला.

गणेशोत्सव व ईद च्या पार्श्वभूमीवर जेजुरी पोलिसांनी जुन्या पालखी मैदानावर दंगल नियंत्रण पथकाच्या माध्यमातून नागरिकांचा सहभाग घेवून प्रात्यक्षिके घेण्यात आली. या वेळी जेजुरी पोलीस स्टेशनचे आधीकारी कर्मचारी,जेजुरी नगरपालिकेची अग्निशमन व्यवस्था,महावितरण कर्मचारी,ग्रामीण रुग्णालय,रुग्णवाहिका सहभागी झाले होते. या मोकड्रील नंतर शहरातून पोलिसांचे पथ संचालन करण्यात आले.

जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे,पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी,नामदेव तारडे,चंद्रकांत झेंडे,तसेच पोलीस कर्मचारी,होमगार्ड,राज्य राखीव दलाचे आधीकारी कर्मचारी यांनी दंगल नियंत्रण प्रात्यक्षिक व पथ संचालन केले.

**सिंध को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.**

548, साधू वासवानी नगर, गणेश खिंड रोड, औंध, पुणे -411007, (1948 चा रजि. क्र. B358) दूरध्वनी. 25850903, 25851951/ ई-मेल: sind_soc@yahoo.in.

**SIND/प्रमाणपत्र/003**

सोसायटीचे सभासद **सौ. फुला. जे. कौल,** राहणार प्लॉट क्रमांक 809, सिंध को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, साधू वासवानी नगर, औंध, पुणे-४११ ००७ यांनी संस्थेकडे - दुप्लीकेट/दुबार भाग दाखला (क्रमांक 89 ते 93, प्रमाणपत्र क्र. डी-89) मिळणेकामी लेखी अर्ज दाखल केलेला आहे. दुप्लीकेट/दुबार भाग दाखला मिळणेकामी **सौ. फुला. जे. कौल** यांना कायदेशीर प्रक्रिया पूर्णकरावी लागेल आणि त्या प्रक्रियेचा भाग म्हणून सादर भाग दाखला हरवल्याबावत दैनिक वृत्तपत्रातजाहिर नोटीस देणे आवश्यक आहे.
सदर जाहिर नोटीसीचे दैनिक वृत्तपत्रात प्रकटन करण्यास सोसायटीची हरकत नाही.
सदरची नोटीस यांच्या विनंतीवरून देण्यात आलि आहे.

**धन्यवाद**
सिंध सहकारी गृहनिर्माण संस्था लि.
ठिकाण - पुणे
दि. १५/०९/२०२४
**सीतल आहुजा**
**चेअरमन**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिल कै. बसवराज इराण्णा मडीवाळ तर्फे वारसदार श्रीमती ललिता बसवराज मडीवाल व शिवराज बसवराज मडीवाल, रा. पुणे. यांचे मालकी वहीवाटीची असून सदर मिळकती बाबत श्री आण्णासाहेब दिलीप बिडगर व कै. बसवराज इराण्णा मडीवाळ यांच्या मध्ये झालेला मे. दुय्यम निबंधक सो. हवेली नं. ०७ यांच्या कार्यालयात दिनांक २१/०६/२०१६ रोजी नोंदवलेला मुळ खरेदीखत दस्त नं. ५७६३/२०१६ आमच्या आशिलांच्या कडुन कोलवडी हडपसर या परिसरात गहाळ झालेला असुन, त्या संदर्भात आमच्या अशिलांनी दिनांक १४/०९/२०२४ रोजी पुणे सिटी पोलिस यांच्या कडे लॉस्ट रिपोर्ट नंबर १३१६८०- २०२४अन्वये तक्रार दिलेली आहे. सदर दस्त कोणासही सापडल्यास त्यांनी आमच्या आशिलास त्यांच्या वरील पत्त्यावर आणुन दयावा, कोणताही गैरवापर केल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई केली जाईल यांची नोंद घ्यावी. याकामी सदर नोटिस दिली असे.

**परिशिष्ठ :**

मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे पोटतुकडी तालुका हवेली मे. दुय्यम निंबधक सो. हवेली यांचे हद्दीतील गाव मौजे कोलवडी येथील गट नं. ६७४ हिस्सा नं. २ मधील ५०० चौ.फुट म्हणजेच ४६.४६ चौ.मी. ही मिळकत.

पुणे.
दिनांक १५/०९/२०२४

शिक्का

**ॲड. विकास दत्तात्रय कोद्रे.**
एफ १०१, ग्राउंड फ्लोअर, मेगा "सेंटर, हडपसर, पुणे ४११०२८.,
मो. ९३२५८९९०२५

**ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे**
**बी.-१ खुली निविदा सुचना क्र.२ सन २०२४-२५.**

ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे येथील खालील कामांची मोहोरबंद निविदा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, म.जी.प्रा. व जि.प.पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडून दोन लिफ़ाफ़ा पध्दतीने खालील कामांची मोहरबंद निविदा २ पाकिटे पध्दतीने मागविणेत येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कार्यालय सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्याकडुन दि.१४/०९/२०२४ ते दि. २२/०९/२०२४ रोजी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (सकाळी १०:०० ते सायं ०४:३० वाजेपर्यंत) देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि.१४/०९/२०२४ ते दि. २२/०९/२०२४. सायं ०४:०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय सुपे खुर्द, येथे स्विकारल्या जातील व २३/०९/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | निविदा फी.र.रू | इसारा रक्कम रूपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुपे खुर्द आंबेडकर नगर येथे सार्वजनिक शौचालय बांधकाम करणे | ३ लक्ष/- | १००/- | ३०००/- | ६ महिने |
| २. | सुपे खुर्द येथे घनकचरा व्यवस्थापन करणे | १,६६,८०३/- | १००/- | १७००/- | ६ महिने |
| ३. | सुपे खुर्द येथे सांडपाणी व्यवस्थापन करणे | ६,८४,१८२/- | १००/- | ६८५०/- | ६ महिने |

टिप:- १. कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं.ने राखुन ठेवला आहे. २. सदर निविदा मोहोरबंद लिफ़ाफ़्यामध्ये स्विकारल्या जातील. सुट्टीच्या दिवशी निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. ३. सोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:-१. नोंदणी प्रमाणपत्र २.GST रजिस्ट्रेशन ३. आयकर प्रत ४. पॅनकार्ड.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत सुपे खुर्द, ता. पुरंदर, जि. पुणे

**धनअशोका प्रोड्युसर कंपनी लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालयः शॉप नं. १,२,३, गट नं. ३०७४, धायगुडेवाडी, ता. दौंड जि. पुणे- ४१२२०३
ईमेल आयडी: daund.pune.mpo@gmail.com | संपर्क क्र. +९१ ९८२२४९६६२८

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

याद्वारे असे कळविण्यात येते की, धनअशोका प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या सभासदांची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा, सोमवार दीनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी ०९.०० वाजता श्रीकृष्ण मंगल कार्यालय सुपा रोड तालुका दौंड जी. पुणे येथे कंपनीशी संबंधित खालील विषयांवर विचार करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदानी वेळेवर हजर राहावे हि विनंती :

**सभेपुढील विषयः**

31 मार्च 2024 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षित आर्थिक विवरणपत्रे आणि त्यावरील संचालक मंडळ आणि लेखापरीक्षकांचे अहवाल विचारात घेणे आणि त्यांचा अवलंब करणे आणि योग्य वाटल्यास, खालील ठराव एक सामान्य ठराव म्हणून पास करणे.
सन 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या खर्चाना मान्यता देणे.
सन 2024-25 च्या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प मंजूर करणे.
मागील सर्वसाधारण सभेचा / वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
मा. सभासदांकडून आलेल्या सूचना व ठरावावर चर्चा करणे व निर्णय घेणे कंपनीच्या अनुपस्थित सदस्यांना रजा मंजूर करणे. ऐनवेळी उपस्थित होणार्या विषयांवर अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**दिनांक : 15/09/24**
**स्थानः पुणे**
**संचालक अशोक जयवंत गिरमकर**

**टिप :**
नोटीसची सही शिक्क्याची प्रत नोटीस बोर्डवर लावलेली असून स्थळप्रत दप्तरी दाखल आहे.
वरील सभा गणपूर्ती अभावी तहकूब करावी लागल्यास त्यांनतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
सभेला उपस्थित राहण्यासाठी आणि मत देण्यासाठी पात्र असलेला सदस्य त्याच्या वतीने प्रतीनिधी म्हणून दुसऱ्या व्यक्तीची सभेला उपस्थित राहण्यासाठी आणि मत देण्यासाठी नियुक्ती करण्यास पात्र आहे आणि अशा प्रतिनिधीची कंपनीचा सदस्य असण्याची गरज. सभेच्या ४८ तास आधी प्रतिनिधी फॉर्म कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये जमा करणे आवश्यक आहे.
सदस्याचे नाव, पत्ता किंवा नामनिर्देशन मध्ये कोणताही बदल असल्यास कंपनीला त्याच्या नोंदणीकृत कार्यालयात त्वरित कळवावे.
ज्या सभासदांना अहवालसंबंधी काही माहिती व काही सूचना करावयाच्या असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालय मध्ये 18 सप्टेंबर 2024 सकाळी ठीक १२ वाजेपर्यंत आणून द्याव्यात.
वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये होणाऱ्या कामकाजाबाबत नोटीशीमध्ये निर्देशिलेल्या बाबीसंबंधी कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयामध्ये कार्यकालीन वेळेत पाहावयास मिळतील.
वार्षिक सभेस उपस्थित राहातेवेळी सभासदांनी आणि प्रतिनिधींनी आपले ओळखपत्र व सभासद नंबर आणणे आवश्यक आहे.
सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंद नफा आणि तोटा पत्रक आणि वार्षिक अहवाल सभासदांना देण्यात आलेला आहे.

**निविदा सुचना**
**ग्रामपंचायत चांदूस, पो. किवळे, ता. खेड, जि. पुणे**

खालील कामांचे सीलबंद निविदा ग्रामपंचायत चांदूस, पो. किवळे, ता. खेड, जि. पुणे हे सार्वजनिक बांधकाम व योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून २ पाकीटे पद्धतीने मागवीत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत चांदूस, पो. किवळे, ता. खेड, जि. पुणे यांजकडून दि. १५/०९/२०२४ ते २१/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी स. १०.३० ते संध्या ४.३० वाजेपर्यंत देण्यात येतील व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. २१/०९/२०२४ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत चांदूस, पो. किवळे, ता. खेड, जि. पुणे मध्ये स्वीकारल्या जातील. शक्य झाल्यास संभाव्य ग्रा.पं. मासिक सभा सभेच्या वेळेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | इसारा रक्कम | निविदा किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | आर सी सी टाकी बांधकाम करणे | २१७९४७/- | २१७९/- | ५६०/- |
| २. | FHTC कनेक्शन | २४३२१७/- | २४३२/- | ५६०/- |
| ३. | FHTC कनेक्शन | ३८९१२०/- | ३८९१/- | ५६०/- |
| ४. | स्मशानभूमी परिसर सुधारणा | १०५४०६/- | १०५४/- | ५६०/- |
| ५. | शाळा खिडकी बसवणे | ४२३८२/- | ४२३/- | २३६/- |

टिप:- १. कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार काम रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत चांदूस, ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत चांदूस, ता. खेड, जि. पुणे

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः गांव मौजे कऱ्हाटी (बारामती) येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा पुणे, ता. बारामती जि. पुणे गांव मौजे कऱ्हाटी येथील जमिन मिळकत प्लॉट नं. ५९६ क्षेत्र २७ हे. २९ आर यासी चतुःसिमा पुढीलप्रमाणे
पुर्व - ओढा
दक्षिण - गट नं. ५९५
पश्चिम - गट नं. ५९९,५९८,५९७
उत्तर - बाबुर्डी शिव

यापैकी १/५ हिस्सा पश्चिम-दक्षिण कोपऱ्यातील दक्षिण बाजुचा ५ हे.५४ आर ही जमिन आमचे अशिल, संजय कृष्णकांत लडकत, व त्यांचे मयत भाऊ राजेंद्रचे वारसदार, तसेच नंदकुमार लडकत व त्यांचे वारसदार तसेच मयत अनिलकुमार लडकत व त्यांचे वारसदार वगैरे १० इसम यांची वडीलोपार्जीत जमिन मिळकत होती व आहे. मुळ पुरूष कै. किसन उर्फ कृष्णकांत सावळाराम लडकत यांनी स्वकमाईतुन स्वकष्टाची कुळ हक्काने मिळावलेली जमिन मिळकत होती व आहे व या मिळकतीस इतर कोणत्याही विशेषतः नवनाथ हरिभाऊ लडकत, सोपाना सावळाराम लडकत, ज्ञानेश्वर निवृत्ती लडकत व त्यांचे इतर भाऊबंध यांचा या मिळकतीशी कोणत्याही हक्काने या मिळकतीशी संबंध नव्हता व नाही. परंतु नवनाथ हरीभाऊ लडकत व इतर यांनी लबाडीने, खोटे नाटे अर्ज करून व गांवकामगार तलाठ्यास हाताशी धरून व जमिन मिळकत गट नं. ५९६ ला बेकायदेशीर नोंदी करून घेतल्या आहेत. तसेच दत्तात्रय सोपान लडकत यांनी चुकीच्या पध्दतीने बेकायदेशीररित्या फेरफार नं. ९६४६ अन्वये गट नं. ५९६ ला स्वतःची नोंद ०१ हे. ३४ आर या क्षेत्रास लावुन घेतली आहे.

सदरील जमिन गट नं. ५९६ बाबत बारामती येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रे. मु.नं. १२५/२०१६ चालू आहे. तसेच बारामती प्रांत ऑफिस यांच्याकडे ही आरटीएस अपील नोंदीबाबत चालू आहे. असे असताना दत्ता सोपाना लडकत व इतर काही लोकांनी केवळ गट नं.५९६ ला च्या ७/१२ उताऱ्यावर खोट्या नोंदी लगल्याचा गैरफायदा घेवुन सदरील जमिन विक्रीस काढलेली आहे. प्रत्यक्षात वर नमुद केलेल्या लोकांना सदरील जमिन विक्री करण्यास किंवा अन्यथा मार्गाने तवदील हस्तांतर करण्याचा अधिकार नाही.

याउपर कोणीही अशा प्रकारे खरेदी विक्री किंवा अन्य प्रकारे तवदीलाचा व्यवहार वरील लोकांना बरोवर करू नये याउपर असा व्यवहार कोणी केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांच्यावर बंधनकारक राहणार नाही व त्या व्यवहाराची जबाबदारी तो व्यवहार करणारावर राहील याची नोंद घ्यावी.

या जमिन गट नं. ५९६ बाबत कोणाची फसवणूक होवु नये व आमचे अशिलांचे हक्कास बाधा येवु नये म्हणुन ही आगावु जाहिर नोटीस प्रसिध्द केली आहे.

**बारामती**
**दिनांक :** १४/०९/२०२४

सही/-
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
ॲड. विजयकुमार एस. बर्गे

**अशिल**
सही/-
१) श्री. संजय कृष्णकांत लडकत
सही/-
२) श्री. स्वप्नील राजेंद्र लडकत

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
15•09•2024



**पर्यावरणपूरक गणेशोत्सव**

गणेश मूर्ती विसर्जनाऐवजी मूर्तीदान हि संकल्पना महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत अ सून जास्तीत जास्त नागरिकांनी मूर्ती दान करावी.

**प्रमुख विसर्जन घाट खालीलप्रमाणे.**

- संगम घाट
- ओंकारेश्वर
- वृध्देश्वर घाट / सिध्देश्वर घाट
- पुलाची वाडी, नटराज सिनेमा मागे
- अष्टभुजा मंदिर (नारायणपेठ)
- खंडोजी बाब चौक
- बापूघाट (नारायण पेठ)
- गरवारे कॉलेजची मागील बाजू
- विठ्ठल मंदिर (अलका चौक)
- दत्तवाडी घाट
- ठोसरपागा घाट
- औंधगाव घाट
- राजाराम पूल घाट,
- सिध्देश्वर मंदिर बंडगार्डन घाट
- चिमा उद्यान येरवडा
- पांचाळेश्वर घाट
- वारजे कर्वेनगर, गल्ली क्र. १ नदीकिनार

## शिष्टाचारांच्या पलिकडील पुतीन-डोवाल भेट

# शांतता प्रस्थापित करण्यासाठी वचनबद्ध

**रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी राजनैतिक शिष्टाचारांच्या पलीकडे जात, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेतली. परराष्ट्रमंत्री जयशंकर यांचीही त्यांनी अशीच थेटभेट घेतली होती. मोदींचे दूत म्हणून डोवाल रशियात गेले आहेत. त्यांनी रशिया-युक्रेन युद्ध संपुष्टात आणण्यासाठी प्रस्ताव मांडला असल्याचे मानले जाते. भारतच या युद्धात यशस्वीपणे तोडगा काढू शकतो, असे पहिल्या दिवसापासून मानले जाते. आता रशियानेही भारताला मध्यस्थ म्हणून मानले आहे. भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर एक महत्त्वाचा देश म्हणून उदयास येत आहे, त्याचेच हे द्योतक आहे.**



रशिया-युक्रेन वादावर तोडगा काढण्याच्या प्रयत्नांदरम्यान राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी गुरुवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेतली. सेंट पीटर्सबर्ग येथे ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या परिषदेच्या निमित्ताने ही बैठक झाली. या चर्चेत पुतिन यांनी अशी आशा व्यक्त केली की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील महिन्यात रशियाच्या कझान येथे वार्षिक ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी जातील. २२ ऑक्टोबरला पंतप्रधान मोदी यांच्याशी भेटण्यास आपण उत्सुक असून, त्यांना शुभेच्छा द्यायच्या आहेत, असे पुतीन यांनी ठळकपणे सांगितले. त्यासाठीच त्यांनी त्यांच्यासमवेत द्विपक्षीय बैठकीचा प्रस्ताव ठेवला आहे. पंतप्रधान मोदी यांनी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांची कीव्ह येथे भेट घेतल्यानंतर, अडीच आठवड्यांत डोवाल यांचा झालेला रशिया दौरा, रशिया-युक्रेन युद्धात भारताची भूमिका अधोरेखित करणारा ठरला आहे, हे नक्कीच. युक्रेनमधील संघर्ष संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवला पाहिजे, अशी भारताची पहिल्या दिवसापासून भूमिका आहे. अजित डोवाल आणि पुतिन यांच्यात नुकतीच झालेली बैठक, ही संभाव्य युक्रेनियन शांतता योजनेभोवती केंद्रीत, सध्या सुरू असलेल्या संघर्ष आणि जागतिक मुत्सद्देगिरीवर महत्त्वपूर्ण परिणाम करणारी आहे. या भेटीचे तपशील उघड करण्यात आले नसले, तरी ही भेट जटिल भू-राजकीय परिदृष्यामध्ये भारत आणि रशिया यांच्यातील सखोल प्रतिबद्धता दर्शवतणारी ठरली आहे.

रशिया हा भारताचा मित्र असूनही, युक्रेन प्रश्नी भारताने आपली भूमिका पहिल्या दिवसापासून शांततेवर भर देणारी ठेवली आहे. रशियावर संपूर्ण जगाने निर्बंध घातले असतानाही, भारताने तसा कोणताही आततायी निर्णय न घेता, रशियाला शांततेच्या मार्गाने याप्रश्नी मार्ग काढण्याचे पहिल्या दिवसापासून सांगितले आहे. अमेरिकेबरोबर धोरणात्मक भागीदारी वाढत असताना, भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागाराला रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतीन सारे संकेत बाजूला ठेवत थेटभेट देतात, यातच भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढलेला दबदबा दिसून येतो. यापूर्वीही भारताचे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांची भेट पुतीन यांनी घेतली होती. एका देशाचे राष्ट्राध्यक्ष दुसऱ्या देशाच्या मंत्र्यांना भेटत नसतात, तर ते थेट पंतप्रधान अथवा अध्यक्ष अशा समकक्षांना भेटतात. मोदी यांच्या रशिया त्यानंतरच्या युक्रेन दौऱ्यानंतर संपूर्ण जगाचे लक्ष आता भारताकडे लागले आहे. पुतीन-डोवाल भेट ही म्हणूनच आंतरराष्ट्रीय माध्यमांचा मथळा ठरली. डोवाल यांची पुतीन भेट राष्ट्रीय हितसंबंध आणि जागतिक स्थिरतेला प्राधान्य देणारा बहुआयामी दृष्टिकोन दर्शवणारी आहे.

युक्रेन प्रश्नी भारताची मध्यस्थी यापूर्वीच रशियाने मान्य केली आहे. आता भारतानेही त्यासाठीची इच्छाशक्ती दर्शवली आहे, असे म्हणता येते. याचे तपशील अस्पष्ट असले तरी, त्याचे अस्तित्वच भारताची यासाठीची कटिबद्धता तसेच राजनैतिक इच्छाशक्ती दाखवणारी आहे. युद्धाचे जागतिक परिणाम तीव्र होत असताना, दोन्ही देशांनी परस्परांवरील प्रदेशांत खोलवर घुसण्याची तयारी चालवलेली असताना, भारताने हे युद्ध संपुष्टात आणण्यासाठी घेतलेला पुढाकार हा स्वागतार्ह असाच. रशियावर आंतरराष्ट्रीय दबाव असूनही, भारत आणि रशिया यांच्यातील संवाद सुरू ठेवण्याचे महत्त्व डोवाल यांच्या भेटीने अधोरेखित केले. रशियाशी संबंध ठेवण्याची भारताची क्षमता देखील ही भेट दाखवून देणारी आहे. अमेरिका-भारत मंत्रिस्तरीय संवादानंतर, अवघ्या काही आठवड्यांत झालेली ही भेट, जटिल भू-राजकीय संबंधांमध्ये मार्ग काढण्याची भारताची क्षमता दाखवणारी आहे. अमेरिकेशी धोरणात्मक संबंध मजबूत करताना, रशियासोबतचे दीर्घकालीन संबंध कायम ठेवले आहेत. भारताच्या संरक्षण आणि आर्थिक गरजांसाठी रशियाशी संबंध महत्त्वाचे असेच आहेत. हा समतोल भारताला त्याच्या राष्ट्रीय हितसंबंधांना पुढे नेण्यासाठी तसेच स्वतंत्र परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करण्यासाठी आवश्यक असाच आहे.



अन्वयार्थ
संजीव ओक
राष्ट्रसंचार

भारताने मध्यस्थाची भूमिका स्वीकारली आहे. रशिया-युक्रेन या दोन्ही देशांवर प्रभाव पाडण्याची त्याची क्षमता आहे. या बैठकीचा नेमका झालेला परिणाम आणि संभाव्य शांतता योजना प्रस्तावाच्या तपशीलांवर, रशिया-युक्रेन या दोन्ही देशांची काम करण्याची इच्छाशक्ती तसेच त्याचे होणारे व्यापक भू-राजकीय परिदृश्य यावर या योजनेचे यश अवलंबून असेल. युक्रेन संघर्षावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा मार्ग कठीण असला, तरी दोन्ही देशातील संवाद सुलभ करण्याचे काम तो करेल. तसेच शांततापूर्ण निराकरणात योगदान देण्यात भारताची भूमिका महत्त्वाची राहिल.

पुतिन आणि डोवाल आणि जयशंकर यांच्यासह झालेल्या बैठकी, युक्रेनच्या सुरू असलेल्या संघर्षादरम्यान भारताच्या रशियासोबतच्या धोरणात्मक संबंध दाखवणाऱ्या आहेत. जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताने संवादाला दिलेले महत्त्व त्यातून स्पष्ट होते. द्विपक्षीय संबंध कायम ठेवण्याच्या भारताच्या वचनबद्धतेला त्यातून बळकटी मिळते. जयशंकर आणि डोवाल यांच्याबरोबर पुतीन यांनी राजकीय शिष्टाचार बाजूला ठेवत घेतलेली भेट भारताचे परराष्ट्र धोरण किती प्रभावी आहे, हे स्पष्ट करणारी आहे. ज्या अमेरिकेने रशियावरील निर्बंधांसाठी पुढाकार घेतला, त्याच अमेरिकेसोबत धोरणात्मक भागीदारी वाढवताना, रशियाबरोबर यशस्वीपणे केलेली बोलणी भारताचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढलेले वजन दाखवणारी आहे.

रशियाच्या अध्यक्षांनी भारताचे परराष्ट्रमंत्री तसेच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार यांची पुतीन यांनी घेतलेली भेट ही अपवादात्मक अशीच आहे. सुरक्षा समस्या, जागतिक आव्हाने अशा अपवादात्मक परिस्थितीतच अशा भेटी होतात. परस्पर सुरक्षा समस्या, दहशतवादविरोधी प्रयत्न आणि संरक्षण सहयोगासंबंधी संबोधित करणे, व्यापार करार, गुंतवणुकीच्या संधी आणि आर्थिक भागीदारी यावर चर्चा करणे, प्रादेशिक संघर्ष, शांतता उपक्रम आणि आंतरराष्ट्रीय स्थैर्याबद्दल संवाद, जागतिक संकटांना समन्वित प्रतिसाद अशा वेळी या भेटी होतात. रशिया-युक्रेन युद्ध ही जागतिक समस्या असून, या युद्धाने जगभरातील अनेक देशांची अर्थव्यवस्था ठप्प केली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे अनेक देशांमध्ये मंदी आलेली आहे, महागाईचा भडका उडालेला आहे. म्हणूनच, युरोपसह अमेरिकालाही भारताने यात यशस्वी मध्यस्ती करावी, अशी अपेक्षा आहे. या युद्धात भारतच यशस्वीपणे तोडगा काढू शकतो, अशी त्यांची धारणा आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांचे दूत म्हणून रशियात गेलेल्या डोवाल यांच्या भेटीचे महत्त्व समजू शकते.

जयशंकर आणि डोवाल यांच्यासह पुतिन यांच्यातील बैठकी, भारताच्या मुत्सद्दी भूमिका आणि जागतिक भू-राजकारणातील भूमिकेबद्दल जगाला एक महत्त्वपूर्ण संदेश देण्याचे काम करतात. युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाला न जुमानता, रशियासह सर्व प्रमुख राष्ट्रांसोबत भारताने राखलेले संबंध, संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या भारताच्या वचनबद्धतेवर जोर देणारे आहेत. हा दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय विवाद सोडवण्यासाठी संवादाच्या महत्त्वावर भारताचा विश्वास दर्शवणारा आहे. एकाच वेळी पाश्चात्य राष्ट्रांसह, विशेषतः अमेरिकेसह भागीदारी मजबूत करताना, रशियाशी मजबूत संबंध राखण्याची भारताची क्षमता दर्शवते. भारताला जागतिक मुत्सद्देगिरीत महत्त्वाचा खेळाडू म्हणून स्थान मिळाले आहे. शांतता उपक्रम आणि सुरक्षा सहकार्यावर चर्चा करून, भारत आंतरराष्ट्रीय संघर्षांमध्ये मध्यस्थाची भूमिका बजावण्यास तयार असल्याचे संकेत तो देतो. यामुळे स्थैर्य आणि सहकार्य वाढवण्यासाठी वचनबद्ध, एक जबाबदार शक्ती म्हणून जागतिक स्तरावर भारताचा दर्जा वाढलेला आहे, हे स्पष्ट होते.

या बैठका एक स्मरणपत्र म्हणून काम करतात. जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रमुख शक्तींनी एकमेकांशी संलग्न असले पाहिजे, असे यातून भारताने सांगितले आहे. भारताची मुत्सद्देगिरी इतर राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय वातावरणास प्रोत्साहन देऊन, संघर्षावर संवाद साधण्यास प्रोत्साहित करणारी ठरेल, असे म्हणता येते. जागतिक घडामोडींमध्ये भारताचे धोरणात्मक महत्त्व, मुत्सद्देगिरी आणि संवादाद्वारे परिणामांवर प्रभाव टाकण्याची क्षमता अधोरेखित झाली आहे, हे कोणीही अमान्य करणार नाही. डोवाल आणि पुतिन यांच्यात झालेल्या बैठकीत रशिया-युक्रेन युद्धात शांतता प्रस्थापित करण्याच्या भारताच्या संभाव्य भूमिकेवर चर्चा झाली. झेलेन्स्की आणि पुतिन या दोघांसोबत मोदींनी यापूर्वी केलेल्या चर्चेनंतर डोवाल यांनी पंतप्रधान मोदी यांचा शांतता प्रस्ताव पुतीन यांच्याकडे नेल्याचे मानले जाते. डोवाल यांचा हा दौरा, भारताच्या राजनैतिक प्रयत्नांना तसेच प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोदींची वचनबद्धता दर्शवणारा ठरला आहे.

# निर्माल्य संकलन : स्वयंशिस्त

**भारतात वर्षात अनेक सणवार असतात यात विशेषतः हिंदु धर्मात रितीरिवाजा प्रमाणे प्रत्येक महिन्यात विविध धार्मिक कार्य, सणवार, यात्रा, उत्सव, व्रत-वैकल्य, तसेच अनेक धार्मिक समारंभ असतात. गणेश उत्सव नवरात्र काळात वातावरण प्रफुल्लीत असते. विसर्जनसमयी निर्माल्य नदी, तळी, तलाव, घाट, विहीर आदी नैसर्गिक जलस्त्रोतांत विसर्जित केले जातात. यामुळे नैसर्गिक स्त्रोतांच्या सौदंर्याला बाधा येते. यामुळे जलस्त्रोतातील जैवविविधता नष्ट होत चालल्याने पाणी दूषीत होत चालले आहे. शहरी भागाबरोबर आता ग्रामीण भागाचे शहरीकरण होत चालले असून जल प्रदूषणाबाबत वारंवार जनजागृती करावी लागते. त्यामुळे निर्माल्य असो अथवा व्यक्ती मृत्यू पाश्च्यात अस्ती विसर्जन असो जल प्रदूषणाचा प्रश्न हा शासन दरबारी नव्हे तर सामाजिक जाणिवेतून व स्वयंशिस्तीतून सुटेल.**

नॅशनल वेटलँड्स अँटलासने सूचित केलेल्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागांसह सुमारे ८० हजार अमृत सरोवरांना पाणथळ जागा म्हणून अधिसूचित करावे, असे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे. अनेक सरोवरे धोक्यात असून भूमाफियांकडून बुजविली जात आहेत. २०१९- २० माहितीत राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या रासयानिक तपासणीत १०.१ टक्के तर जैविक तपासणीत ८.३९ टक्के स्त्रोत हे दुषित आढळून आले आहे. केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाने राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमा अंतर्गत केलेल्या पाहणीत राज्यातील ३७ टक्के नसैगिक जलस्त्रोत प्रदुषित झाले असल्याचे म्हटले आहे. यात औद्योगिक क्षेत्र व इतर कारणांनी प्रदूषित झाले आहे. निर्माल्य बाबत संकलन व त्या पासून कंपोस्ट खत प्रकल्प उभारता आले पाहिजेत. त्या खतांचा उपयोग छोटया कुंडीतील झाडांना खत म्हणून उपयोग होतो. भविष्यात जर जलस्त्रोत टिकले तर जीवन समृद्ध होणार आहे. म्हणूनच जल है तो कल है! जल प्रदुषण करण्यात प्रत्येकाचा काहींना काहीतरी वाटा आहे. त्यामुळे त्याच्या निवारणाचे कर्तव्य सुद्धा आपले आहे. त्यामुळे धार्मिक कार्यात जलस्त्रोतांना प्रदूषित करणं म्हणजे जलसंस्कृतीला गालबोट लावण्या सारखे आहे.

निर्माल्य जलस्त्रोतांत विसर्जित केल्याने प्रदूषणाबरोबर पाणी दूषित होते त्यामुळे मनुष्य व जनावरांना पाणी पिण्यास योग्य राहत नाही. त्यामुळे पवित्र समजल्या जाणाऱ्या नद्या दूषित झाल्या आहेत. भारतात गणेश उत्सव, नवरात्र, छट पूजा, होळी, आदी मोठया सणातून पाने, फुले, हार,फळे, केळीचे खांब, नारळाची पाने,




प्रासंगिक
विठ्ठल वळसे-पाटील
vithalvalse@gmail.com
राष्ट्रसंचार

अशा विसर्जित निर्माल्यातून गोळा झालेल्या वस्तूंचा खत निर्मितीसाठी उपयोग होतो तर सजावटीत वापरलेली अविघटनशील वस्तू यात प्लास्टिक, कागदी पुठ्ठे पुनर्प्रक्रियेसाठी वापरता येतात अनेक समाजशील संस्था पर्यावरणाच्या रक्षणासाठी हाक देत असतात निर्माल्य तळयात अथवा टाकून देऊन पाण्याचे प्रदूषण करण्यापेक्षा संस्थेकडे दिल्यास खत निर्मितीसाठी वापरता येते. परंतु प्लास्टर ऑफ पॅरीस सारख्या वस्तू पाण्यात विरघळत नाही. शिवाय त्यांच्या पासून पुनर्प्रक्रिया होत नाही. यात अनेक मूर्ती या नदीतील पाणी ओसरल्या नंतर भग्न अवस्थेत दिसून येतात हा धार्मिक अवमान आहे. याची तमा बाळगली पाहिजे. पर्यावरणपूरक मुर्तींना नागरिकांनी प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे विघटनास मदत होते.




## कचरा विघटन हवे..

- भव्य दिव्य मूर्ती स्थापना ही एक आता स्पर्धा झाली आहे. या स्पेर्धेत मात्र पर्यावरण संवर्धन हा विषय बाजूला राहतो. निर्माल्य टाकण्यासाठी प्रशासनाच्या वतीने निर्माल्य कलश नदीकाठी ठेवले जातात.अनेकदा ते पूर्ण भरलेले असतात अश्यावेळी नागरीक जलप्रवाहात निर्माल्य टाकतात. त्यामुळे योग्य व्यवस्थापनाकडे लक्ष पुरवले पाहिजे अनेक शहरे हि स्वच्छ असण्यासाठी नियम व सुभाषिते लिहावी लागतात स्वयंशिस्त नसल्याने असे नियम लिहावे लागतात. भारत भेटीस आलेल्या परदेशी पाहुण्यांना या बाबत संकोच वाटत राहतो. कलशामध्ये निर्माल्य टाकताना सुद्धा विघटित, अविघटीत असे वर्गीकरण करून टाकले पाहिजे. जेणे करून समाजसेवी संस्थांना सहज वापरता येईल.



## भावी पिढीला नदी प्रदूषणाचा विळखा नको.

- धर्म संस्कृती बरोबर पर्यावरणाचे रक्षण हाती घेतले तर देश अधिक शोभून दिसेल. सध्याच्या पुणे गणेश उत्सवात जलस्त्रोतात मूर्ती विसर्जनास मनाई करून शाडूची मूर्ती दिलेल्या हौदात विसर्जन करून ती माती पुन्हा वापरात येणार आहे. तर प्लास्टर ऑफ पॅरीस मूर्ती दान संकल्प सुरु केला आहे. असे नवनवे प्रयोग केल्यास भावी पिढी नदी प्रदूषित होऊ देणार नाही.
- गाव ते नगर मध्ये असे संकलन कलश ठेवले पाहिजेत. या निर्माल्यातील खतांचा उपयोग शाळेतील झाडे, परसबागेतील झाडे, गच्चीवरील मातीशेती साठी उत्तम खत म्हणून उपयोगी होईल. अशी स्वयंशिस्त अंगिकारली तर निर्मळ जल सर्वांना मिळेल.

# डिजिटल कृषी अभियान

**गेल्या काही वर्षांपासून, भारताच्या डिजिटल क्रांतीने नव्या युगात पाऊल टाकले आहे. सुरक्षितता आणि प्रत्येक टप्प्यावर डिजिटल व्यवहारांची सुविधा निर्माण करुन प्रशासन आणि प्रशासकीय सेवा वितरणात परिवर्तन केले आहे. याचा परिणाम म्हणून, आरोग्यसेवा, शिक्षण आणि किरकोळ क्षेत्रात भरभराट होत आहे. अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळत आहे, ज्यामुळे भारताला प्रत्येक नागरिकापर्यंत अर्थकारण पोहोचवणे अर्थात नागरिक-केंद्रित डिजिटल सोल्यूशन्समध्ये जागतिक स्तरावर नवीन ओळख आणि अग्रस्थान मिळाले आहे. कृषी क्षेत्राच्या अशाच परिवर्तनासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने २ सप्टेंबर रोजी कृषी क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (DPI) तयार करण्यासाठी २८१७ कोटी रुपयांच्या डिजिटल कृषी अभियानाला मंजुरी दिली आहे. हे आभियान काय आहे आणि त्याचा शेतकरी आणि शेती क्षेत्रावर काय परिणाम होईल?**



### कृषी
वर्षा कुलकर्णी
राष्ट्रसंचार

सध्या विविध भागातील शेतकऱ्यांच्या शेत जमिनी, शेतमालक आणि शेतीसंबंधित सर्व माहिती विविध विभागांअंतर्गत तसेच राज्यांच्या स्तरावर विखुरलेली आहे. डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा (DPI) निर्माण झाल्याने या सर्व डेटाला एकत्रित व्यासपीठ मिळणार आहे. हा डेटा सरकारच्या शेतकऱ्यांसाठीच्या योजना आणि सेवा अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनवेल, तसेच तंत्रज्ञानावर आधारित इकोसिस्टम तयार करण्यात मदत करेल असे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. जे कृषी उत्पादनाचे अचूक अंदाज देऊ शकेल. याशिवाय शेतकरी ओळखपत्रामुळे शेतकऱ्यांना विविध सरकारी योजना, कर्जे आणि आर्थिक लाभ मिळणे सोपे होईल.

२८१७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यापैकी १९४० कोटी रुपये केंद्राकडून वितरीत केले जातील आणि अभियानासाठीची उर्वरित रक्कम राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश (UTs) द्वारे दिली जाणार आहे. अभियानाचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या १०० दिवसांसाठी नियोजित कृषी मंत्रालयाच्या उपक्रमांचा एक भाग आहे. पुढील दोन वर्षांत (२०२५-२६ पर्यंत) हे अभियान देशभरात राबविण्यात येईल. सरकारने २०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन्ही केंद्रीय अर्थसंकल्पांमध्ये कृषीसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्याची घोषणा केली आहे.

## डिजिटल कृषी मिशनचे तीन स्तंभ

### १) ॲग्रीस्टेक

शेतकरी-केंद्रित DPI ॲग्रीस्टेकमध्ये तीन मूलभूत कृषी-क्षेत्र नोंदणी किंवा डेटाबेस असतात.

**शेतकऱ्यांची नोंदणी:**

या अंतर्गत, शेतकऱ्यांना एक डिजिटल ओळख क्रमांक दिला जाईल - शेतकरी आयडी (फक्त आधार प्रमाणे) जो संबंधित राज्याच्या स्थानिक डेटाशी जोडला जाईल जसे की जमिनीच्या नोंदी, पशुधन मालकी, पेरणी केलेली पीके, लोकसंख्या तपशील, कुटुंब तपशील आणि शेतकरी लाभ घेत असलेल्या योजना तसेच अनुदान याची माहिती.

**पीक पेरणी नोंदणी:**

हा डेटाबेस शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकांची नोंद ठेवेल आणि प्रत्येक हंगामात आयोजित केलेल्या डिजिटल पीक सर्वेक्षणासारख्या मोबाईल-आधारित भू सर्वेक्षणाद्वारे या नोंदी अपडेट केल्या जातील.

**भौगोलिक घटकांच्या आधारे तयार केलेले- गाव नकाशे:**

गावाच्या भौगोलिक रचनेच्या आधारे जमिनीच्या नोंदीवरील भौगोलिक माहिती जमिनीच्या भौतिक स्थानांसह जोडली जाईल.

**कृषीसंदर्भातील निर्णय घेण्यासाठी आधार प्रणाली**

प्रत्येक हंगामातील पीके, माती, हवामान आणि जलस्रोत इत्यादींवरील रिमोट सेन्सिंग-आधारित माहिती एकत्रित करण्यासाठी सर्वसमावेशक भू-स्थानिक प्रणाली तयार होईल. ही माहिती पीक पेरणी पद्धती, दुष्काळ/पूर निरीक्षण आणि तंत्रज्ञान आधारित प्रकल्प कोणते असावेत या उद्देशाने पीकांचे नियोजन काय असावे यासाठी मदत करेल. शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे दावे निकाली काढण्यासाठी उत्पादनावर आधारित मूल्यांकन या प्रणालीद्वारे केले जाईल.

### लाखो शेतकऱ्यांना फायदा

डिजिटल ॲग्रीकल्चर मिशन, एक परिवर्तनकारी उपक्रम आहे, कृषी क्षेत्रातील महत्त्वाच्या डेटाचे एकत्रीकरण आणि डिजिटायझेशनद्वारे भारताच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यास हे अभियान सक्षम असेल. शिवाय, हे अभियान शेतकऱ्यांच्या डिजिटल आर्थिक सक्षमीकरणासाठी काम करेल, भविष्यातील कृषी क्षेत्रातील विविध कामांसाठी आवश्यक निधी सुरक्षित करण्याच्या सरकारच्या नियोजनाच्या क्षमतेला गती देईल. यामुळे भारतीय शेती अधिक लवचिक, डेटा-आधारित आणि सर्वसमावेशक होईल, ज्यामुळे देशभरातील लाखो शेतकऱ्यांना फायदा होईल.

### २) माती प्रोफाईल मॅपिंग

डिजिटल कृषी अभियान भारतातील सुमारे १४२ दशलक्ष हेक्टर शेतजमिनीमध्ये व्यापक प्रमाणात माती प्रोफाइल नकाशे (1:10,000 स्केलवर) तयार करेल. सुमारे २९ दशलक्ष हेक्टरची विस्तृत माती प्रोफाइल यादी आधीच पूर्ण झाली आहे. अशी माहिती कृषी मंत्रालयाने दिली आहे.

### ३) डिजिटल सामान्य पीक अंदाज सर्वेक्षण

भारताच्या कृषी क्षेत्रातील उत्पादनाचा अंदाज अचूक मिळावा या उद्देशाने, ही एक नवीन प्रणाली आहे. हे सरकारी संस्थांना कागदविरहित किमान आधारभूत किंमत (MSP) आधारित खरेदी, पीक विमा आणि क्रेडिट कार्डशी जोडलेली पीक कर्जे यासारख्या योजना आणि सेवा अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनविण्यात आणि खतांच्या संतुलित वापरासाठी प्रणाली विकसित करण्यात मदत करेल.

डिजिटल कृषी मिशनचा या क्षेत्रातील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीवर "उत्प्रेरक" म्हणून प्रभाव पडेल अशी अपेक्षा कृषी मंत्रालयाने व्यक्त केली आहे. डिजिटल पीक सर्वेक्षण आणि रिमोट सेन्सिंगसाठी "प्रत्यक्ष जमिनीवरील तथ्य" काय आहे याचा डेटा संकलित करेल. या अभियाना अंतर्गत असलेल्या विविध प्रकल्पांद्वारे प्रकल्प सुमारे २.५ लाख प्रशिक्षित स्थानिक तरुणांना आणि "कृषी सखींना" रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील असा अंदाज आहे.

### सद्यस्थिती आणि भविष्यातील योजना:

- शेतकरी ओळखपत्र तयार करण्यासाठी, सहा राज्यांमधील प्रत्येकी एका जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर प्रयोग करण्यात आले आहेत: उत्तर प्रदेश (फर्रुखाबाद), गुजरात (गांधीनगर), महाराष्ट्र (बीड), हरियाणा (यमुना नगर), पंजाब (फतेहगढ साहिब), आणि तामिळनाडू (विरुध्दनगर).
- ११ कोटी शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळख निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे:
- आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ६ कोटी शेतकरी, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तीन कोटी शेतकरी आणि आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये २ कोटी शेतकरी असे जे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पीक पेरणी संदर्भातील डेटा विकसित करण्यासाठी २०२३-२४ मध्ये ११ राज्यांमध्ये डिजिटल पीक सर्वेक्षणाचे पथदर्शी आयोजन करण्यात आले. पुढे, दोन वर्षांच्या आत संपूर्ण देशात डिजिटल पीक सर्वेक्षण सुरू करण्याचे लक्ष्य आहे, ज्यामध्ये आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४०० जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये देशभरातील सर्व जिल्ह्यांचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे. सुमारे २९ दशलक्ष हेक्टर्सवरील मातीचे प्रोफाइल तयार करण्यात आले असून त्यासंदर्भातील यादी यापुर्वीच पूर्ण झाली आहे. शेतकरी नोंदणी तयार करण्यासाठी राज्य प्रोत्साहनासाठी अतिरिक्त ५ हजार कोटी रुपये राखून ठेवले होते.

# आधुनिक तंत्रज्ञानाचे "फायदे, धोके आणि उपाय"



### स्मार्ट होम म्हणजे काय?

स्मार्ट होम म्हणजे इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) तंत्रज्ञान वापरून आपले घर अधिक सुरक्षित, ऊर्जा-क्षम, आणि सोयिस्कर बनवणे. यात अनेक डिव्हाईस आणि उपकरणे एकमेकांशी जोडली जातात आणि स्मार्टफोन, टॅबलेट, किंवा व्हॉईस असिस्टंट्सच्या माध्यमातून नियंत्रित करता येतात.

- **स्मार्ट लाइट्स:** ॲप किंवा व्हॉइस कमांडने नियंत्रित होणारे दिवे.
- **स्मार्ट थर्मोस्टॅट्स:** घराचे तापमान स्वयंचलितपणे नियंत्रित करणारी उपकरणे.
- **स्मार्ट लॉक्स:** डिजिटल की किंवा व्हॉइस कमांडने अनलॉक होणारे दरवाजे.
- **स्मार्ट सिक्युरिटी कॅमेरे:** मोबाइल ॲपच्या माध्यमातून लाइव्ह फीड देणारे कॅमेरे.
- **स्मार्ट ॲप्लायन्सेस:** इंटरनेटद्वारे नियंत्रित होणारे उपकरणे जसे की रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशीन, ओव्हन.



### लक्षवेधी
प्रा. योगेश हांडगे-पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
राष्ट्रसंचार

### स्मार्ट होम हॅकिंग कसे होते?

स्मार्ट होम हॅकिंगच्या अनेक पद्धती आहेत, ज्या हॅकर्स वापरतात:

#### 1. कमजोर पासवर्ड्स:

- अनेक वापरकर्ते डिव्हाइसच्या डिफॉल्ट पासवर्डचा वापर करतात किंवा सोपे पासवर्ड ठेवतात, ज्यामुळे हॅकर्सना प्रवेश मिळवणे सोपे होते.

#### 2. अद्ययावत नसलेले सॉफ्टवेअर:

- स्मार्ट होम डिव्हाइसवर जुने फर्मवेअर किंवा सॉफ्टवेअर वापरल्यास, ज्ञात असलेल्या सुरक्षेच्या त्रुटींचा फायदा घेतला जाऊ शकतो.

#### 3. अनसिक्युअर नेटवर्क्स:

- असुरक्षित Wi-Fi नेटवर्क्सवर स्मार्ट होम डिव्हाइस जोडल्यास हॅकर्सना नेटवर्कवर प्रवेश मिळवणे सोपे होते.

#### 4. फिशिंग आणि मालवेअर:

- वापरकर्त्यांच्या स्मार्टफोन किंवा संगणकावर फिशिंग ईमेल्सद्वारे मालवेअर इंस्टॉल केले जाते, ज्यामुळे हॅकर्सना स्मार्ट होम डिव्हाइसवर नियंत्रण मिळवता येते.

#### 5. मॅन-इन-द-मिडल (MITM) अटॅक्स:

- हॅकर्स नेटवर्कवर संदेशांची देवाणघेवाण अडवून त्यात फेरफार करू शकतात.

### किती नुकसान होऊ शकते?

**1. वैयक्तिक माहिती चोरी:** हॅकर्सना वैयक्तिक डेटा, फोटो, आणि व्हिडिओ मिळवण्याची शक्यता असते.

**2. घराच्या सुरक्षा यंत्रणांचे नुकसान:** स्मार्ट लॉक, सुरक्षा कॅमेरे, आणि अलार्म सिस्टम हॅक केल्याने घराची सुरक्षा धोक्यात येते.

**3. आर्थिक नुकसान:** हॅकर्सने घरातील ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली हॅक केल्यास ऊर्जा खर्च वाढू शकतो.

**4. गोपनीयतेचा भंग:** हॅकर्सला घरातील क्रियाकलापांची माहिती मिळवता येते, ज्यामुळे गोपनीयतेचा भंग होतो.

### उपाय आणि संरक्षणाचे मार्ग

**1. मजबूत पासवर्ड:** प्रत्येक डिव्हाइससाठी मजबूत आणि वेगळे पासवर्ड वापरा.

**2. दुहेरी प्रमाणीकरण (2FA):** 2FA वापरून सुरक्षा अधिक वाढवा.

**3. सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवा:** डिव्हाइससाठी नियमित सॉफ्टवेअर आणि फर्मवेअर अपडेट्स करा.

**4. सिक्युअर नेटवर्क:** WPA3-एन्क्रिप्शनसह सुरक्षित Wi-Fi नेटवर्क वापरा.

**5. फायरवॉल:** नेटवर्कला सुरक्षित ठेवण्यासाठी फायरवॉल वापरा.

**6. कायदेशीर ॲप्स वापरा:** अधिकृत ॲप्स आणि वेबसाइट्स वापरा आणि अनधिकृत सॉफ्टवेअरपासून दूर रहा.

**7. नियमित मॉनिटरिंग:** डिव्हाइस आणि नेटवर्कच्या सुरक्षा सेटिंग्ज नियमितपणे तपासा.

### उदाहरणे

**1. नेस्ट कॅमेरे हॅक:** २०१९ मध्ये नेस्ट कॅमेरे हॅक झाल्याने वापरकर्त्यांचे खाजगी व्हिडिओ स्ट्रीम्स इंटरनेटवर प्रसारित झाले.

**2. रिंग डोअरबेल हॅक:** काही रिंग डोअरबेल्स हॅक करून हॅकर्सनी घरातील लोकांशी संवाद साधला आणि त्यांना धमकावले.

**3. मिराई बॉटनेट अटॅक:** २०१६ मध्ये, मिराई बॉटनेटने अनेक IoT डिव्हाइस हॅक करून इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात डिस्ट्रीब्यूटेड डिनायल-ऑफ-सर्विस (DDoS) अटॅक केला.

स्मार्ट होम डिव्हाइस सुरक्षित ठेवण्यासाठी सतर्कता आणि योग्य सुरक्षा पद्धतींचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

# नारायणपूरचा महायोगी

## माणसातलं माणूसपण जागं करणारा इतिहास पुरुष

नारायणपुरच्या परमपूज्य विश्वचैतन्य नारायण महाराजांचे नुकतेच निधन झाले आणि एका युगाचा अस्त झाला. नारायण महाराज (आणा) म्हणजे त्रिगुणात्मक दत्त गुरूंचे निश्चिम भक्त,त्यांनी दत्त गुरूंची सेवा करत असंख्य लोकांना मार्गदर्शन केले आणि अध्यात्माच्या माध्यमातून समाजात बदल घडवले. साधारणपणे गेल्या पन्नास वर्षांपासून त्यांनी केलेले प्रयत्न हे खरोखर वाखाणण्याजोगे होते.आण्णांनी अनेक लोकांचे संसार तुटता तुटता वाचवले. अनेकांची मने त्यांनी जोडली, अनेकांना व्यसनांपासून परावृत्त केले. असा हा महायोगी पुरुष समाजात बदल घडवण्याच्या दृष्टीने चालला होता. त्यांनी ज्याच्या डोक्यावर हात ठेवले ज्याला जवळ केले त्या व्यक्तीला कधीच काही कमी पडले नाही. अनेक लोकांनी दत्त संप्रदायाच्या माध्यमातून त्यांचे आशीर्वाद घेऊन आपले भविष्य घडवले आहे. त्यांचे मार्गदर्शन घेऊन कित्येक लोक मोठे झाले आहेत नावलौकिक प्राप्त केला आहे. दिसताना अतिशय साधारण आणि वरवर कडक स्वभावाचे वाटणारे आणि आतमध्ये फणसातील गोड गऱ्यांप्रमाणे असणारे असे हे व्यक्तिमत्व जास्त न बोलणारे मात्र प्रवचन करण्यासाठी उभे राहिले की भाविकांना अगदी एकाग्र करून मन लावून त्यांच्या काळजाला हात घालणारे असं हे व्यक्तिमत्व होतं.



दत्त गुरूंचा कृपाप्रसाद आणि आशीर्वाद असल्याकारणाने अनेक लोकांचे त्यांनी प्रबोधन केले. समाजाला दिशा दाखवण्याचे मोठं कार्य या व्यक्तीने केलं आहे.

महाराष्ट्रात नारायणपूर हे नाव समोर आलं की नारायण महाराज (आण्णा) हे नाव लोकांच्या तोंडात येतच त्याच कारण म्हणजे त्यांची दत्त गुरूंवर असणारी अपारांपार श्रद्धा आणि सेवा करण्याची पद्धत,यामुळे नारायण महाराज म्हणजेच नारायणपूरचे दत्तगुरु असा लौकिक संपूर्ण महाराष्ट्र मध्ये पसरलेला आहे. ते जर दत्त जयंतीला किंवा गुरुवारी प्रवचनाला उभे राहिले तर इतके एकाग्रतेने प्रवचन करत की अनेक लोक त्यांच्या पायावर डोके ठेवून साष्टांग दंडवत घालत असत.

ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या घराघरात शिरून त्यांच्या समस्या बोलून दाखवणारे आणि दत्त महिमा मोठ्या तन्मयतेने लोकांसमोर साध्या सरळ सोप्या भाषेत सांगणारे असे हे व्यक्तिमत्व,समाजाला एकत्र करणारे आपल्यातील दोष,चुका अतिशय हलकेपणाने सांगणारे आणि प्रत्येकाला अंतर्मुख करायला लावणारे असे हे व्यक्तिमत्व होते.



### प्रासंगिक
नारायण ढेबे
राष्ट्रसंचार

नारायण महाराजांनी समाजाचं प्रबोधन केलं ते करत असताना माणसातल्या माणसाला जागा करण्याचा प्रयत्नही ते नेहमी करत असत ते अनेकांच्या दुःखावर फुंकर घालत असत. माणसातला मीपणा संपवून त्याला समाजातील मुख्य प्रवाहात आणण्याचं मोठं कार्य अण्णांनी केल आहे.

दुसरे एक महत्त्वाचे म्हणजे त्यांनी मानव जोड प्रकल्प अतिशय कुशलतेने साकार केला कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्ती त्यांच्यासमोर आल्या की त्या फक्त आणि फक्त माणूस म्हणूनच असायच्या. माणसात समन्वय साधण्याचं काम आयुष्यभर त्यांनी केलं. माणसातला माणूस जोडला, विचारांना विचार जोडले, प्रत्येकाला आपलंसं करून घेतलं.असा हा सर्वसामान्य तळागाळातल्या समाजातला योगी महापुरुष होता.

नारायण महाराजांनी चारधाम चा प्रकल्प उभा करण्यासाठी संकल्प केला आणि तो तडीस नेला नारायणपूरचे आणि महाराष्ट्राचे नाव संपूर्ण भारतात पसरवलं. केरळ,कन्याकुमारी, कलकत्ता आणि उत्तराखंड या चार ठिकाणी दत्ताचे अधिष्ठान निर्माण करून दत्त मंदिरे बांधून त्या त्या ठिकाणी लोकांना एकत्र करून हा मानव जोड प्रकल्प त्यांनी अध्यात्माच्या माध्यमातून साकार केला. प्रचंड इच्छाशक्ती असणारे आणि समाजात विरून गेलेलं असं हे व्यक्तिमत्व होतं सर्व जाती धर्म विसरून त्यांनी माणसंच नव्हे तर आपला देश जोडण्याचं महान कार्य केलं आहे. अशा या महायोगी पुरुषाला माझे आणि दत्त संप्रदायातील अनेकविध शिष्यांच्या वतीने साष्टांग दंडवत.


# घरातील कामे करायची नसतील तर लग्नाआधी सांगा

**एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये किंवा विभक्त कुटुंबात राहत असताना देखील लग्न करून सासरी आल्यावर घरातील कामे करावीच लागतात. कामे करायची नसतील, तर लग्नाआधीच तसे सांगायला हवे, असे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे.**



लग्न हा एक संस्कार आहे, असे आपण मानतो. त्यामुळे लग्नानंतर सासरी आल्यावर माहेरी जसं वातावरण होतं, तसंच सासरीही मिळेल, याची शाश्वती नसते. परंतु, आदर्श म्हणून माहेरात मिळणारी वागणूक सासरी देखील मिळावी, अशी अपेक्षा असू शकते. काही प्रकरणांमध्ये अशी सुखद परिस्थिती असतेही. मात्र, बहुतांश कुटुंबांमध्ये लग्न करून घरात आलेल्या मुलीला सासुरवास आणि मानसीक छळाचा सामना करावा लागतो, हेही आपण आपल्या आजूबाजूला पाहतो. खरं तर प्रत्येक घरातील मुली लग्नानंतर सासरी जातात. त्यामुळे लग्न करून घरात आलेल्या मुलीला स्वत:च्या मुलीचे प्रेम देऊन तिचा सन्मान ठेवता येणे शक्य असते. आणि लग्न करून आलेली मुलगी देखील सासरच्या मंडळींना स्वत:च्या आई-वडिलांसमान मानसन्मान देऊ शकते. अशी देखील काही कुटुंब असतात. परंतु, आजकालच्या व्यक्तीकेंद्री जीवनशैलीमध्ये असे प्रमाण खूपच कमी दिसेल. तरीही एखाद्या कुटुंबात लग्न करून सासरी आलेल्या मुलीला घरातील एखाद्या सदस्याने काही छोटेसे काम सांगितले म्हणून तिला नोकरासारखी वागणूक दिली असे म्हणता येणार नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या एका निकालाची चर्चा याच अनुषंगाने सुरु झाली आहे. लग्न झालेल्या विवाहितेला घरातील कामे करायला सांगणे म्हणजे तिला नोकरासारखे वागवणे असा अर्थ होत नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे पती किंवा सासरच्या लोकांकडून केलेल्या कृतीबाबत आरोप स्पष्ट झाल्याशिवाय ते कौर्य आहे की नाही हे सांगता येणार नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.



### कायदा
ॲड. गायत्री कांबळे
राष्ट्रसंचार

अनेकदा काही महिलांकडून सासरच्या मंडळींविरोधात कामाचा जाच केल्याचा आरोप करण्यात येतो. त्यादृष्टीने हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे. कुटुंबात राहणाऱ्या महिलेला काम सांगितले याचा अर्थ तिला नोकरासारखी वागणूक मिळते असे नाही. तिला लग्नानंतर घरातील कामे करायची नसतील तर तिने लग्नापूर्वी सांगायला हवे. जेणेकरून मुलाला तिच्याशी लग्न करायचे की नाही ठरवता येईल. त्यामुळे ही समस्या निर्माण होणार नाही असे हायकोर्टाने निकालात म्हटले आहे.

एका महिलेने तिचा पती आणि सासरच्या कुटुंबाविरोधात पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवला होता. त्याविरोधात औरंगाबाद खंडपीठाने हा निकाल देऊन एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. ४९८ अ घरगुती हिंसाचारानुसार, महिलेने पती आणि तिच्या सासरकडील लोकांवर आरोप केले होते. लग्नानंतर तिला नोकरासारखी वागणूक देण्यात आली. सासरच्या लोकांनी चारचाकी खरेदी करण्यासाठी ४ लाख रुपये मागितल्याचा आरोपही महिलेने केला होता.

माझ्या घरच्यांना परवडत नाही असे सांगितल्यानंतर सासरच्यांनी मानसिक आणि शारिरीक त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच मुलगा व्हावा यासाठी डॉक्टरकडेही नेले. सासू आणि नणंदेकडून मारहाण केली जात होती. चार लाख रुपये दिल्याशिवाय घरी राहू देणार नाही, अशी धमकी दिल्याचा आरोपही महिलेने केला होता. मात्र, सासरच्या मंडळींनी सर्व आरोप फेटाळून लावले होते. पोलीस तपास आणि वकिलांच्या युक्तिवादानंतर ही केस उभी राहू शकत नाही असा निष्कर्ष कोर्टाने काढला आहे. त्यामुळे काही गोष्टी या अलिखित असतात. आणि लग्नानंतर सासरी गेल्यावर तिथे काही कामे करावी लागतात, त्यामुळे नोकरासारखी वागणूक दिली यात तथ्य असत नाही. अन्यथा कामे करायची नसतील, तर लग्नाआधीच मुलींनी तसे सांगायला हवे असे न्यायालयाने म्हटले आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे.

# "रिझर्व्ह बँकेची" स्थिती भक्कम व बळकटच !

भारताची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँकेबद्दल संभ्रम निर्माण करणारे काही लेख, वक्तव्ये बरीच व्हायरल होत आहेत. किंबहुना रिझर्व्ह बँक दिवाळखोरीच्या मार्गावर आहे असा 'जावई शोध' काही 'तथाकथित', विद्वान अर्थतज्ज्ञांनी लावला आहे. त्याला व्हॉट्सअप युनिव्हर्सिटीची जोड मिळताना दिसत आहे. आपली अर्थव्यवस्था आणि रिझर्व्ह बँकेची कामगिरी पाहता या विधानांमध्ये काहीही तथ्य नाही. उलटपक्षी करोनानंतरच्या तीन-चार वर्षात रिझर्व्ह बँकेने अत्यंत सक्षम कामगिरी केली आहे. याचा घेतलेला लेखाजोखा.

**आर्थिक**
**प्रा. नंदकुमार काकिर्डे**
राष्ट्रसंचार

जागतिक पातळीवरील करोना महामारीच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जगातील बहुतेक सर्व विकसित व विकसनशील राष्ट्रांची अर्थव्यवस्थेची गाडी रुळावरून घसरलेली होती. भारताची अर्थव्यवस्था याला अपवाद नव्हती. अमेरिका, चीन व युरोपातील अनेक देश अजूनही त्यातून सावरलेले नाहीत. मात्र गेल्या तीन-चार वर्षात भारतीय अर्थव्यवस्था खूप चांगल्या पद्धतीत सावरली गेली आणि त्याचे संपूर्ण श्रेय आपल्या मध्यवर्ती बँकेला म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला जाते हे प्रथमच नमूद करतो. आज १०० जागतिक मध्यवर्ती बँकांच्या क्रमवारीत भारतीय रिझर्व्ह बँकेचा क्रमांक १२ वा आहे.


रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया भारताची मध्यवर्ती बँक असून एक एप्रिल १९३५ रोजी स्थापना झाली. एक जानेवारी १९४९ रोजी या बँकेचे राष्ट्रीयकरण करण्यात येऊन त्याची संपूर्ण मालकी केंद्र सरकारकडे गेली. बँकेचे भाग भांडवल पाच कोटी रुपये असून सध्याचा राखीव निधी ६५०० कोटी रुपये आहे. श्री. शक्तीकांत दास सध्याचे गव्हर्नर असून १६ जणांचे तज्ज्ञांचे संचालक मंडळ आहे. बँकेच्या भारताच्या विविध भागात एकूण ३१ शाखा किंवा कार्यालय आहेत. बँकेची सध्याची आर्थिक स्थिती अत्यंत बळकट व स्थिर स्वरूपाची आहे. मार्च २०२४ अखेरच्या वर्षातील रिझर्व्ह बँकेचा ताळेबंद आकार ११.०८ टक्क्यांनी वाढलेला आहे. या वर्षात त्यांचे उत्पन्न १७.०४ टक्क्यांनी वाढले तर बँकेचा एकूण खर्च 56.30 टक्क्यांनी मागील वर्षाच्या तुलनेत कमी झाला.

बँकेचा ताळेबंदाचा सध्याचा आकार 70 लाख 47 हजार 703.21 कोटी रुपये इतका आहे. परकीय गुंतवणूक, सोने, व कर्जे यात लक्षणीय वाढ झालेली आहे. या वर्षातील उत्पन्न 2 लाख 75 हजार 572.32 कोटी रुपये तर एकूण खर्च 64 हजार 694.33 कोटी रुपये झाला. या वर्षअखेरीस बँकेला अतिरिक्त निव्वळ (सरप्लस ) रक्कम 2 लाख 10 हजार 877.99 कोटी रुपये झाले. बँकेकडे या वर्षात 822.10 टन सोने उपलब्ध आहे. त्यात चलनी नोटांच्या भक्कम पाठिंब्यासाठीच्या 308.03 टन सोन्याचा समावेश आहे. हा सोन्याचा साठा अनेक मध्यवर्ती बँकांच्या तुलनेत खूप चांगला आहे. तसेच या वर्षाअखेरचा परकीय चलनाचा साठा 53 लाख 91 हजार 255.87 कोटी रुपये इतका असून त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत 13.40 टक्क्यांची भक्कम वाढ झालेली आहे.

याशिवाय रिझर्व्ह बँकेच्या एकूण मालमत्तेचा दर्जा अत्यंत उत्तम असून अनुत्पादित कर्जाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. कोणत्याही दृष्टिकोनातून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही दिवाळखोरीच्या मार्गावर नाही. किंबहुना त्यांची वित्तीय स्थिती अत्यंत बळकट असून त्यांची भांडवल पर्याप्तता नियामकांनी आखून दिलेल्या निकषांच्यापेक्षा जास्त आहे.

## २०२४ चा लाभांश

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने मार्च २०२४ च्या वर्षांमध्ये केंद्र सरकारला लाभांशापोटी २.११ लाख कोटी रुपये दिले. हा लाभांश केवळ रिझर्व्ह बँकेच्या निव्वळ नफ्यातून दिलेला नाही तर २०१९ मध्ये त्यांनी अस्तित्वात आणलेल्या इकॉनॉमिक कॅपिटल फ्रेमवर्क (इसीएफ)नुसार आहे. या लाभांशाचा फायदा केंद्र सरकारची वित्तीय तुट कमी होण्यास निश्चित मदत झाली यात शंका नाही. मात्र या लाभांशाच्या पोटदुखीपोटी काही अर्थतज्ज्ञांनी याचा प्रतिकूल परिणाम रिझर्व बँकेच्या एकूण क्षमतेवर होईल आणि देशाची आर्थिक स्थैर्य बिघडेल असा अंदाज व्यक्त केला असून त्याला कोणताही शास्त्रीय आधार नाही.




चालू आर्थिक वर्षाचा आढावा घ्यायचा झाला तर भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर हा साडे सहा किंवा सात टक्क्यांच्या घरात राहील असा आर्थिक पाहणीचा अहवाल सांगतो. हा आर्थिक विकासाचा दर केंद्र सरकारने हाती घेतलेल्या विविध नव्या पायाभूत सुविधांमधील किंवा बेरोजगारी किंवा रोजगार निर्मिती साठी लागणाऱ्या गुंतवणुकीला उपयुक्त ठरणार आहे. मोदी सरकारने 2.66 लाख कोटी रुपये रक्कम ग्रामीण भागातील विकास व पायाभूत सुविधांसाठी वापरण्याचे ठरवले आहे पुढील पाच वर्षांमध्ये देशातील चार कोटींपेक्षा जास्त तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून दोन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. यामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासाचा दर शाश्वत राहणार असून त्यामुळे नागरिकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होणार आहे. आणि यामध्ये रिझर्व्ह बँक त्यांची जबाबदारी निश्चित चांगल्या रीतीने पार पाडत आहे. याचा अर्थ रिझर्व्ह बँकेसमोर काही आव्हाने नाहीत असेही नाही. रुपयाचा विनिमय दर,परकीय चलनाचा साठा, कृषी क्षेत्रासाठी दिली जाणारी कर्जे, अनुत्पादित कर्जांचे प्रमाण, ज्या उद्योगपतींनी देशातील बँकांना गंडा घातला आहे त्यांच्याविरुद्ध कारवाई करून त्यांची मालमत्ता जप्त करण्याची सशक्त यंत्रणा उभारणे, देशभरातील बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार रोखणे, द्रवतेमधील जोखीम व सायबर हल्ल्यांपासून डेटा -माहितीचे योग्य संरक्षण करणे, भाव वाढीवर नियंत्रण ठेवणे, चलन पुरवठा नियमन अशी विविध आव्हाने त्यांच्यापुढे निश्चित आहेत. त्यासाठी चांगल्या कार्यक्षमतेने रिझर्व्ह बँक काम करीत राहील अशी अपेक्षा आहे.

- मोदी सरकारने 2.66 लाख कोटी रुपये रक्कम ग्रामीण भागातील विकास व पायाभूत सुविधांसाठी वापरण्याचे ठरवले आहे
- त्याचप्रमाणे 1.52 लाख कोटी रुपये रक्कम ही कृषी आणि कृषी आधारित अन्य उद्योगांसाठी वापरण्यात येणार आहे.
- तसेच 11.11 लाख कोटी रुपये रक्कम देशाच्या पायाभूत सुविधांसाठी वापरण्यात येणार आहे.



# अभियंता दिनी अभिवादन

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस.

**प्रासंगिक**
**श्याम ठाणेदार, पुणे**
राष्ट्रसंचार



मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो.

**विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

# अवलिये आप्त...अव्वल आणि अस्सल...

**पुस्तक परीक्षण**
**श्रीधर खेडगीकर**
राष्ट्रसंचार

**या पुस्तकाचे सुहास कुळकर्णी लेखक आहेत. त्यांनी आठ लेख आणि आठ व्यक्तींबद्दल भरभरून लिहिले आहे. कुठेही व्यक्तीपूजा जाणवत नाही. त्या त्या व्यक्तीची छटा आपल्यापर्यंत पोचवण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. ज्येष्ठ लेखक रत्नाकर मतकरी यांना हे पुस्तक अर्पण करण्यात आले आहे. रत्नाकर मतकरी यांच्या अकाली जाण्याने एक शब्दही लिहिता येत नाही असे लेखक अर्पण पत्रिकेत नमूद करतात. पण रत्नाकर मतकरी यांच्यावर न लिहिता लेखकाने वाचकांवर अन्यायच केला आहे असे वाटते. असो. पुस्तकात अरुण टिकेकर, अनिल अवचट, सदा डुंबरे, निरंजन घाटे, निळू दामले, ना. धो. महानोर, एकनाथ आव्हाड आणि आमटे कुटुंबीय या महनीय व्यक्तींबद्दल लिहिले आहे. पहिला लेख अरुण टिकेकर यांच्याविषयी आहे. अरुण टिकेकर यांना लेखक गुरुजी म्हणत असत. पण नाते मित्रत्वाचे होते. फोन वर ते दोघे किमान पाऊण तास बोलत. अनेक किस्से रंजक पद्धतीने लेखात आहेत.**


***अनिल अवचट आणि ट्रॅफिक पोलिस....***

**अनिल अवचट यांच्यावरील लेखात, एकदा लेखक आणि अनिल अवचट प्रवास करीत असतात त्या घटनेचा उल्लेख आहे. ट्रॅफिक पोलिस अनिल अवचट यांची गाडी अडवतात आणि चक्क त्यांना चहा पाजतात. हा मोठेपणा त्यांना मुक्तांगणने अनिल अवचट यांना कसा मिळवून दिला हे वाचुन आपण थक्क होऊन जातो. कोविड ने एक संवेदनशील संपादक सदा डुंबरे यांचा बळी घेतला. वाचत सुटलो त्याची गोष्ट या व अनेक पुस्तकांचे लेखक निरंजन घाटे यांच्यावर एक लेख आहे.**

**निळू दामले हे पत्रकार/लेखक जत ते जेरुसलेम आणि लातूर ते लंडन अशी मुशाफिरी करणारे निळू दामले असे कौतुक लेखक करतात. आयुष्य हे संधींनी अनिश्चिततांनी भरलेले आहे. त्यांचा शोध घेत जाण्याची मजा आपण लुटायला हवी असे निळू दामले म्हणत. ना. धो. महानोर यांच्यावर एक लेख आहे. महानोर हे निसर्गकवी आहेत, रानकवी आहेत. त्यापेक्षा ही महानोर मोठे होते, हे लेख वाचल्यावर समजते.**


***एकनाथ आव्हाड..***

**बीड जिल्हा इथे पोतराजाच्या पोटी जन्माला आलेल्या धाडसी नेत्याची गोष्ट एकनाथ आव्हाड यांच्या लेखात आहे. एकनाथ आव्हाड खरे तर परंपरेने पोतराजच झाले असते, पण त्यांनी शिक्षण घेतले. शिक्षण घेताना खडतर कष्ट घेतले, खड्डे खणून, शेळ्या पाळून, ओझी उचलून त्यांनी सोके शिक्षण पुर्ण केले. आईमुळे शिक्षण पुर्ण झाले असे एकनाथ आव्हाड म्हणत असत.**




# "निर्विघ्न"पणे बाप्पाला निरोप द्या!

## बाप्पाच्या मिरवणुकीत विद्रुपीकरणाचे "विघ्न" नको!



**वारसा**
**सारिका महाले रोजेकर**
राष्ट्रसंचार



पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक पुणे शहरात अनंत चतुर्दशीच्या दिवशी काढण्यात येते. यात पुणे शहर व आसपासच्या भागातील सार्वजनिक गणपती मंडळे भाग घेतात. प्रत्येक मंडळाचे सदस्य आपआपल्या गणपतीची पूजनमूर्ती व उत्सवमूर्ती घेवून विविक्षित ठिकाणापासून ठरवलेल्या मार्गाने चालत (किंवा हळू चालणाऱ्या वाहनातून) मुठा नदीच्या तीरावर येतात व पूजनमूर्तीचे विसर्जन करून उत्सवमूर्ती घेवून परत जातात. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सकाळी सुरू होणारी ही मिरवणूक जवळपास ३० तास चालू असते व दुसऱ्या दिवशी मध्यान्हापर्यंत चालते. ही मिरवणूक पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाचा परमोच्च बिंदू समजली जाते.

सार्वजनिक गणेश उत्सव प्रथम बाळ गंगांधार टिळकानी चालू केला तो लोकांना एकत्र आणण्यासाठी. आपले विचार मांडण्यासाठी एक व्यासपीठ मिळावे यासाठी त्यांनी गणेशोत्सवाचा प्रारंभ केला. पण आज काल एकाच गल्लीत तीन किंवा चार मंडळ एकमेकांवर पाय देऊन उभी असतात. गणपतीच्या मिरवणुकीला तीन तीन ढोल ताशा पथक असतात. तीस तास चालणारी विसर्जन मिरवणूक शहरात सहज चालते. ह्याच विसर्जन मिरवणूकीमुळे मंडळामध्ये चुरस वाढत चालली आहे. काही गणपती मंडळ जमा झालेल्या वर्गणीमधून गरीब लोकांना आणि अनाथ लोकांना मदत करतात. पण त्यांची संख्या फार मोजकी आहे. ज्याप्रमाणे दहीहंडी उत्सव ३५ मंडळांनी एकत्र राबविला, धनकवडीमध्ये देखील ११ गणेश मंडळांनी काढून सामाजिक प्रबोधन केले आहे. शहरातील वाढती गुन्हेगारी आणि वाहतूक कोंडी बघता गणेशोत्सव हा आनंदाचा उत्सव झाला पाहिजे. त्याचे प्रमाण वाढवून शहराचे विद्रुपीकरण होऊ नये याकडे प्रत्येक भाविकाने लक्ष देणे आवश्यक आहे.

## उत्सव आनंदाचा व्हावा हवा, बेरंग नको !

वैभवशाली गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीला प्रचंड गर्दी होत असते. राज्यासह देशभरातून भाविक येतात. गर्दीत महिला-तरुणींची छेड काढण्याच्या घटनाही घडतात. मोबाईल चोरांचा सुळसूळाट असतो. चोऱ्या करण्यासाठीच काही परराज्यातून चोरटे पुण्यात येतात. शेकडो मोबाईल चोरीला जाण्याचा घटना घडतात. त्यासोबतच दागिने व पाकिटमारी देखील मोठ्या प्रमाणत होते. यंदा मात्र या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी आगळी-वेगळी युक्ती राबवत छेडछाड काढणाऱ्यांचे फोटो फ्लेक्सद्वारे भरचौकात लावले जातील. एवढेच नाही तर त्यांची परेड देखील घेतली जाणार आहे. त्यामुळे महिलांची छेडछाड कराल तर सावधान असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिल्यामुळे या घटनांना लगाम बसणार का याकडे पुणेकर भाविकांचे लक्ष वेधले आहे.

### विसर्जन मिरवणुकीची वैशिष्ट्ये :

- मूर्ती विसर्जनासाठी हौदांमध्ये स्वच्छ पाणी
- घाटांच्या ठिकाणी नागरिकांना बसण्यासाठी व्यवस्था
- महिलांसाठी हिरकणी कक्ष
- दैनंदिन स्वच्छता, साफसफाईला सर्वाधिक प्राधान्य
- नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अग्निशामक दल, जीवरक्षक, सुरक्षा रक्षकांची व्यवस्था
- महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसह कला क्षेत्रातील कलाकार, वादक सफाई अभियानात घेणार सहभाग



**सध्या 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनावरून वाद निर्माण झाला आहे. या चित्रपटावर बंदी आणण्याची मागणी केली जात आहे. या चित्रपटात इतिहासातील अनेक गोष्टी चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. पंजाबसह अन्य बिगर भाजपशासित राज्यांनी चित्रपट प्रदर्शन न करण्याचा निर्णय घेतला आहे. इतिहासात डोकावल्यास अनेकदा मजकुर, दृश्यावरून राज्य आणि केंद्र सरकारने चित्रपटावर बंदी घातलेली आहे. आतापर्यंत जवळपास ८०० चित्रपटांना सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र जारी करण्यास मनाई केल्याची नोंद आहे.**




# 'इमर्जन्सी'चे निमित्त

▌सुचित्रा दिवाकर

सिनेविशेष

सध्या 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शनावरून वाद निर्माण झाला आहे. या चित्रपटावर बंदी आणण्याची मागणी केली जात आहे. या चित्रपटात इतिहासातील अनेक गोष्टी चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. शिवाय तो शिखविरोधी असल्याचेही शिख समुदायाचे म्हणणे आहे. त्याचवेळी खासदार कंगणा रानावत आणि निर्मात्यांनी चित्रपट प्रदर्शित करण्यावर ठाम असल्याचे म्हटले आहे. हा चित्रपट सहा सप्टेंबरला प्रदर्शित होणार होता, परंतु निर्मात्यांनीच प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. सततचा विरोध पाहून सेन्सॉर बोर्डाने देखील अजून प्रमाणपत्र जारी केले नाही. आता हे प्रकरण उच्च न्यायालयापर्यंत पोचले आहे. पंजाबसह अन्य बिगर भाजपशासित राज्यांनी चित्रपट प्रदर्शन न करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर एखाद्या चित्रपटावर बंदी कशी आणली जाते आणि सेन्सॉर बोर्ड एखाद्या चित्रपटावर बंदी घालू शकतो का? असे अनेक प्रश्न मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन ही एक घटनात्मक संस्था आहे. सेन्सॉर बोर्डचे मुख्यालय मुंबईत असून त्याचे नऊ प्रादेशिक कार्यालय आहेत. मुंबई, कोलकता, चेन्नई, बंगळूर, तिरुअनंतपूरम, हैदराबाद, नवी दिल्ली, कटक आणि गुवाहाटीत कार्यालये आहेत. भारताचे सेन्सॉर बोर्ड सिनेमेटोग्राफ कायदा १९५२ आणि सिनेमेटोग्रॉफ नियम १९८३ नुसार काम करते. जुन १९८३ पर्यंत त्यास सेंट्रल फिल्म सेन्सॉर बोर्ड या नावाने ओळखले जात होते. साधारणपणे त्याला सेन्सॉर बोर्ड असेच म्हणतात. हे मंडळ माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अधिनिस्त काम करते. मंडळाचे काम प्रामुख्याने चित्रपट प्रदर्शनासाठी त्याच्या कथानकाला मंजुरी देण्याचे असते. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास चित्रपट प्रदर्शित होण्याअगोदर तो बोर्डाकडे पाठविण्यात येतो. तेथे अवलोकन केले जाते. यात काही आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्यास काढून टाकणे किंवा बदल करण्याची सूचना निर्मात्यांना केली जाते. चित्रपटांच्या कथानकानुसार प्रमाणपत्र बहाल केले जाते.

सेन्सॉर बोर्डचे अध्यक्ष आणि सदस्यांची नियुक्ती केंद्र सरकारकडून केली जाते. सेन्सॉर बोर्ड हा कथानकानुसार चित्रपटाला प्रमाणपत्र देत असते. काही चित्रपट कौटुंबीक असतात तर काही चित्रपट हिंसेने ठासून भरलेले तसेच वयस्कर लोकांनीच पाहण्यासारखे असतात. त्याला केवळ वयस्कर लोकांसाठीच प्रदार्शित केले जाते.

प्रमाणपत्रांचे स्वरूप

यू: ही युनिव्हर्सल श्रेणी असून या श्रेणीतील चित्रपट सर्व वयोगटातील मंडळी पाहू शकतात.

यू/ए: या श्रेणीतील चित्रपट बारापेक्षा कमी वयोगटातील मुले पालकांसमवेत आणि त्यांच्या देखरेखीखाली पाहू शकतात.

ए: या श्रेणीतील चित्रपट केवळ वयस्कर म्हणजे साधारणपणे १८ किंवा २१ पेक्षा अधिक वयोगटातील प्रेक्षकांसाठी प्रदार्शित केला जातो.

एस: या श्रेणीतील चित्रपट विशिष्ट वर्गासाठी असतो. प्रामुख्याने डॉक्टर, इंजिनिअर किंवा शेतकऱ्यांसाठी प्रदर्शित केले जातात.

सेन्सॉर बोर्डकडून प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया

एखाद्या चित्रपटांची निर्मिती झाल्यानंतर त्याचे देशभरात, जगभरात प्रदर्शन करण्यासाठी केंद्रीय सेन्सॉर बोर्डची परवानगी आवश्यक असते.यासाठी मंडळाकडे अर्ज द्यावा लागतो. तो अर्ज मंडळासमोर सादर केला जातो आणि त्यातील मजकूर, दृश्य, गाणे, संवाद, भाषा याचा बारकाईने अभ्यास केला जातो. चित्रपटात देशविरोधात मजकूर असेल, एखाद्या धर्मावरून, समुदायावरून आक्षेपार्ह गोष्टी दाखविल्या असतील तर त्या काढून टाकण्याचे निर्देश दिले जातात. मात्र याउपरही निर्मात्यांनी आक्षेपार्ह गोष्टी वगळण्यास नकार दिल्यास बोर्ड प्रमाणपत्र जारी करत नाही. परिणामी चित्रपटांचे प्रदर्शन खोळंबते. साधारणपणे सेन्सॉर बोर्डाकडे अर्ज आल्यापासून ते प्रमाणपत्र बहाल करण्यासाठी साधारणपणे ६८ दिवसांचा कालावधी लागतो. अर्ज मिळाल्यानंतर त्याची तपासणी करण्यातच एक आठवडा जातो. निर्मात्याचा अर्ज समितीकडे पाठविला जातो. चौकशी समिती पंधरा दिवसांच्या आत चित्रपटांविषयीचा अहवाल सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षाकडे पाठविते. अध्यक्ष या कामी कमाल दहा दिवस घेतो. एखादा चित्रपटाचा भाग कापण्याची गरज असेल तर त्याची माहिती निर्मात्याला दिली जाते. ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ३६ दिवसांच्या आत प्रमाणपत्र दिले जाते.

सेन्सॉर बोर्डचे काम चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी प्रमाणपत्र जारी करण्याचे असते. प्रदर्शनात आडकाठी किंवा बंदी आणण्याचे काम बोर्ड करू शकत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे कोणताही चित्रपट सेन्सॉर बोर्डच्या परवानगीशिवाय प्रदर्शित होऊ शकत नाही. एकदा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकार धोरणानुसार निर्णय घेऊ शकते. कायदा आणि सुव्यवस्थेचा दाखला देत सरकार चित्रपट प्रदर्शनास मनाई करू शकते आणि असे अनेक उदाहरणे देता येईल. सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र दिल्यानंतरही केंद्र आणि राज्य सरकारला चित्रपटावर बंदी घालण्याचा हक्क आहे. अर्थात प्रकरण कोर्टात गेले तर न्यायालयाचा निर्णय अंतीम मानला जातो. कोर्ट देखील चित्रपटावर बंदी घालण्यास स्वतंत्र आहे.

१ जानेवारी २००० ते ३१ मार्च २०१६ पर्यंत ७९३ चित्रपटांना सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र जारी करण्यास मनाई केल्याची नोंद आहे. अनेकदा मजकुर, दृश्यावरून राज्य आणि केंद्र सरकारने चित्रपटावर बंदी घातलेली आहे. १९९४ मध्ये फूलनदेवीवरचा 'बँडिट क्विन' चित्रपटावर बंदी घातली होती. १९९६ मध्ये 'कामसूत्र' चित्रपटात आक्षेपार्ह आणि अश्लिल दृश्य असल्याने त्यावर बंदी घालण्यात आली. १९९६ मध्ये 'फायर' चित्रपटासही प्रमाणपत्र दिलेले नव्हते. यानंतर चित्रपटातील काही दृश्य कापल्यानंतर १९९८ मध्ये त्यास प्रदर्शनाची परवानगी देण्यात आली. 'द काश्मीर फाइल्स' चित्रपटावर देखील अनेक राज्यांत बंदी घालण्यात आली होती. शिवाय 'द केरल स्टोरी'वर देखील अनेक राज्यांत बंदी घालण्यात आली. १९९० च्या दशकांत मणिरत्नम यांच्या गाजलेल्या 'बॉम्बे' चित्रपटाला देखील लवकर परवानगी मिळाली नव्हती.

इमर्जन्सीच्या निमित्ताने संजय लीला भन्साळी यांच्या पद्मावती चित्रपटाला अकारण झालेल्या विरोधाची आठवण येते. या चित्रपटाचे आकलन न करताच करणीसेनेने त्याच्याविरोधात रान उठविले होते. आज कंगना राणावत यांना धमक्या मिळत असून तशाच धमक्या दीपिका पदूकोन यांनाही दिल्या होत्या. रस्त्यावर गोंधळ घातला होता. शेवटी चित्रपटाचे नाव बदलले आणि पद्मावतीऐवजी पद्मावत केले गेले.चित्रपट पाहिला तर त्यात काहीच आक्षेपार्ह नसल्याचे निदर्शनास आले. चित्रपट प्रदर्शनावर आक्षेप घेण्याचे काम केवळ भारतातच नाही तर जगाच्या पाठीवरही होते. सध्या मल्याळम भाषेतील चित्रपट आडुजीवितम द गोट लाइफ या चित्रपटाला आखाती देशांत प्रामुख्याने सौदीत विरोध केला जात आहे. या चित्रपटात केरळचे महंमद नजीब यांना सहन कराव्या लागलेल्या प्रसंगाचे सादरीकरण करण्यात आले आहे. त्यांना सौदीत एखाद्या गुलामाप्रमाणे ठेवण्यात आले होते. सौदीतील लोकांच्या मते, या चित्रपटाने त्यांच्या देशाची प्रतिमा खराब करण्याचे काम केले आहे. तरीही आखाती देशांनी यावर बंदी घातलेली नाही. एखाद्या चित्रपटातील मजकूराबाबत किंवा दृश्याबाबत आक्षेप घेता येऊ शकतो, परंतु समजून न घेता विरोध करणे गैर आहे. यापेक्षाही वाईट बाब म्हणजे चित्रपट रोखण्यासाठी धमक्या देणे एवढेच नाही तर सेन्सॉर बोर्डला देखील धमकावले जाते. म्हणून कोणतीही संघटना ही समांतर सेन्सॉर बोर्ड होणार नाही, याची सरकारने काळजी घेतली पाहिजे.

# काजल झळकणार सलमानसोबत



साऊथची सुपरस्टार काजल अग्रवालने २००४ मध्ये 'क्यों! हो गया ना' या चित्रपटातून तिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर ती साउथ चित्रपटांमध्ये झळकली. अजय देवगनच्या 'सिंघम'या चित्रपटातून तिला एक वेगळी ओळख मिळाली. त्यानंतर तिने मागे वळून पाहिले नाही. तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. यानंतर आता ती बॉलिवूडचा भाईजान अशी ओळख असलेल्या सलमान खान बरोबर स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. काजल अग्रवालला एक मोठा बॉलिवूड चित्रपट मिळाला आहे. ती आता सुपरस्टार सलमान खानसोबत दिसणार आहे. या अगोदर तिने अजय देवगण आणि अक्षय कुमार सारख्या बॉलीवूडमधील काही मोठ्या कलाकारांसोबत काम केलं आहे. आता ती 'सिकंदर' या चित्रपटात सलमान खान बरोबर स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदानादेखील महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

ईदच्या दिवशी सलमान खानने त्याच्या आगामी सिनेमाची घोषणा केली होती. दीड वर्षांहून अधिक काळ ब्रेक घेतल्यानंतर सलमान या चित्रपटाद्वारे थिएटरमध्ये परतणार आहे. 'गजनी' आणि 'हॉलिडे: अ सोल्जर नेव्हर ऑफ ड्यूटी' सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट देणारा ए.आर. मुरुगदास हा या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे.

# 'हाऊसफुल ५'मध्ये जॅकीदादांची एंट्री

'हाऊसफुल' चित्रपटाचे आतापर्यंत चार भाग प्रदर्शित झाले आहे. यानतर 'हाऊसफुल ५'ची घोषणा केल्यापासून चाहते देखील या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटाच्या चारही भागांमध्ये अभिनेता अक्षय कुमार मुख्य भूमिकेत पाहायला मिळाला. यानंतर आता तो पाचव्या भागात देखील पाहायला मिळणार आहे. मात्र त्याच्यासोबत इतरही अनेक कलाकार मंडळी दिसणार आहे. यातच आता या चित्रपटात आणखी एका दिग्गज कलाकराची एंट्री झाल्याची माहिती समोर आली आहे.

अक्षय कुमार आणि रितेश देशमुख सारखे कलाकार हाऊसफुल ५ मध्ये काही नवीन ट्विस्ट घेऊन परत येत आहेत. संजय दत्त, फरदीन खान, नोरा फतेही, रितेश देशमुख, अनिल कपूर आणि पूजा हेगडे यांसारखे नवीन सदस्यही यात आहेत. यानंतर आता जॅकी श्रॉफ देखील हाऊसफुल ५ मध्ये सहभागी होण्यासाठी सज्ज झाले आहेत. जॅकी



आणि संजय दत्त दोघेही विनोदी मुख्य भूमिका साकारणार आहेत. त्यांची पात्रं कथेत विनोदाची भर घालतील. परंतु याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही.

दरम्यान, 'हाऊसफुल ५' चित्रपट मागच्या वर्षी प्रदर्शित होणार होता; परंतु काही कारणांमुळे चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आली. आता हा चित्रपट ६ जून २०२५ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

दरम्यान, २०१० साली प्रदर्शित झालेल्या 'हाऊसफुल्ल' या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर धमाका घातला होता. हा सिनेमा सुपरहिट ठरल्यानंतर २०१२ मध्ये 'हाऊसफुल्ल २' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला. तर २०१६ मध्ये 'हाऊसफुल्ल ३' आणि २०१९ मध्ये 'हाऊसफुल्ल ४' हे सिनेमाही प्रदर्शित झाला. त्यानंतर आता 'हाऊसफुल्ल ५' प्रेक्षकांच्या भेटीस सज्ज होणार आहे.

# रकुलचा धक्कादायक खुलासा



अभिनेत्री रकुल प्रीत सिंगने साऊथपासून बॉलिवूडपर्यंत तिची खास ओळख निर्माण केली आहे. या अभिनेत्रीने केवळ तमिळ आणि तेलुगू भाषांमध्येच अनेक सुपरहिट चित्रपट केले नाहीत तर हिंदी चित्रपटसृष्टीत दे दे प्यार दे, रनवे ३४, डॉक्टर जी आणि छत्रीवाली सारखे अनेक चित्रपट केले आहे.

कोणत्याही इंडस्ट्री पार्श्वभूमीशिवाय रकुलने चित्रपटांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. सध्या रकुल अजय देवगण आणि आर माधवनसोबत तिच्या आगामी 'दे दे प्यार दे २' चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. या सगळ्या दरम्यान अभिनेत्रीने एका मुलाखतीत बॉलीवूडमधील नेपोटिझमबद्दल बोलले.

रकुल नुकतीच 'द रणवीर शो'मध्ये पोहोचली होती. यादरम्यान अभिनेत्री नेपोटिझमबद्दल बोलली. तिच्या अनुभवाबद्दल मोकळेपणाने बोलत असताना, रकुलने कबूल केले की तिने आपल्या करिअरमध्ये घराणेशाहीमुळे चित्रपट गमावले, परंतु तिने त्याकडे दुर्लक्ष करणे पसंत केले. रकुल म्हणाली, हो, असं होतं, आणि मी चित्रपट गमावले, पण मी अशा प्रकारची व्यक्ती नाही जी दुर्लक्ष करत समोरचा विचार करते. कदाचित ते चित्रपट माझ्यासाठी बनवलेले नसतील.' आयुष्यातील चढ-उतार समजून घेणे हे प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे,घराणेशाहीचा जास्त विचार करू नका असे तिने सांगितले.

वर्क फ्रंटवरबाबत सांगायचे झाल्यास, रकुल 'दे दे प्यार दे २' च्या पुढील शेड्यूलची तयारी करत आहे, ज्याचे शूटिंग पंजाबमध्ये अजय देवगण आणि आर माधवनसोबत केले जाईल.

# फक्त वहिनीच्या भूमिकाच का?



अभिनेत्री रुबिना दिलैक गेल्या वर्षी जुळ्या मुलींची आई झाली. आई झाल्यानंतर तिने आपला सगळा वेळ आपल्या दोन्ही मुलींसाठी दिला. काही काळापूर्वी ती कामावर परतली. मात्र आता रुबिना दिलैकला फक्त वहिनीची भूमिका मिळत आहे, ज्याबद्दल अभिनेत्रीने अलीकडेच तिच्या पॉडकास्टमध्ये खुलासा केला आहे. रुबिना दिलीकने अभिनेता शरद केळकरला तिच्या पॉडकास्टच्या नवीन सीझनसाठी आमंत्रित केले. यामध्ये तिने आई झाल्यानंतर कुटुंब आणि कामाचे आयुष्य संतुलित करण्याविषयी सांगितले.

संवादादरम्यान शरद केळकरने रुबिनाच्या फिटनेसचे कौतुक केले तेव्हा अभिनेत्री म्हणाली, 'आता मला वहिनीच्या भूमिका मिळत आहेत.' अशी माहिती आहे की, आई होण्यापूर्वी रुबिना दिलीक टीव्ही शोमध्ये मुख्य भूमिका साकारत होती. रुबिना 'शक्ती: अस्तित्व के एहसास की' ते 'छोटी बहू' आणि 'सास बिना ससुराल' सारख्या अनेक टीव्ही शोमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. रुबिना 'बिग बॉस १४' ची विजेती होती आणि अनेक रिॲलिटी शोमध्येही दिसली होती. पण आई झाल्यानंतर परिस्थिती बदलली असून आता तिला मुख्य भूमिका मिळत नाहीत. रुबिना काही चित्रपटांचा भागही आहे. ती लवकरच 'हम तुम और मक्तूब' या चित्रपटात दिसणार आहे, ज्याचे शूटिंग सुरू आहे.

नुकतेच रुबीनाच्या घरी गणपती बाप्पा उपस्थित होते आणि तिने पूर्ण भक्तिभावाने पूजा केली. तिने दीड दिवस बाप्पाला घरी आणले होते आणि नंतर त्याचे विसर्जन केले होते.

विसर्जनानंतर, रुबिना हिमाचल प्रदेशमधील तिच्या घरी परतली, जिथे तिने पती अभिनव शुक्ला यांच्यासोबत मुली जीवा आणि एधा यांना सोडले. कामावर परतल्यानंतर रुबिनाही आपल्या मुलींची विशेष काळजी घेत आहे. ती आणि अभिनव शुक्ला एकमेकांच्या अनुपस्थितीत त्यांच्या मुलींची काळजी घेतात.

# कपिल दुसऱ्यांदा येतोय...

कॉमेडियन कपिल शर्माने 'द ग्रेट इंडियन कपिल शो'सह नेटफ्लिक्समध्ये प्रवेश केला. टीव्ही क्षेत्रात अधिराज्य गाजवल्यानंतर आता कपिल शर्मा ओटीटीवर मनोरंजन करण्यास सज्ज झाला आहे. कपिलचा पहिला शो लोकांना फारसा आवडला नव्हता. कपिल आणि सुनीलची जोडी या शोला टीआरपी मिळवू शकली नाही. पहिला शोनंतर आता कपिल शर्मा आता त्याच्या शोचा दुसरा सीझन घेऊन येत आहे. दुसऱ्या सीझनचा पहिला एपिसोड कधी रिलीज होणार याची माहितीही कपिलने सोशल मीडियावर दिली आहे.

कपिल शर्माच्या शोचा पहिला सीझन २१ फेब्रुवारीपासून नेटफ्लिक्सवर आला होता. आता लवकरच त्याचा दुसरा सीझन येत आहे. कपिलने शेअर केलेल्या



व्हिडिओमध्ये तो संपूर्ण टीमसोबत मस्ती करताना आणि डेटबद्दल बोलताना दिसत आहे. कपिल शर्माच्या शोमध्ये त्याच्यासोबत कृष्णा अभिषेक, राजीव ठाकूर, किकू शारदा, सुनील ग्रोवर आणि अर्चना पूरण सिंह दिसणार आहेत.

# सिनेसृष्टीत पदार्पण

'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मुळे शिवाली परबला मोठी लोकप्रियता मिळाली. आपल्या विनोदी शैलीने तिने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. शिवाली लवकरच सिनेमात पदार्पण करत आहे. मात्र या चित्रपटात ती विनोदी नाही तर एका गंभीर भूमिकेत पाहायला मिळणार आहे.

शिवाली परब 'मंगला' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात मंगला ही व्यक्तिरेखा शिवाली साकारणार असल्याचं समोर आलं आहे. नुकतेच शिवालीने लालबागच्या राजाचे दर्शन घेतले असून गणरायाच्या चरणी तिने आगामी सिनेमाचे पोस्टरही रिलीज केले. या पोस्टरमध्ये शिवालीचे तीन लूक पाहायला मिळत आहेत. एक कौलारू घर आणि कोपऱ्यात एक दाम्पत्य या पोस्टरमध्ये आहे.





# भाजपाचा विधानसभेचा चेहरा कोण ?

## शिरुर हवेली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



प्रदीप कंद — संजय पाचंगे — राहुल पाचर्णे — जयश्री पलांडे

**शिक्रापूर :** शिरुर विधानसभेच्या जागेची नेहमीच राज्यभर वेगवेगळी चर्चा होत असताना अनेक दिवसांपासून राष्ट्रवादी व भारतीय जनता पार्टीकडे सदर जागा राहिलेली असताना दोन वर्षापूर्वी भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांचे निधन झाल्याने तेव्हापासून भाजपाला तगडा उमेदवार कोण असणार हे गुलदस्त्यात असताना आता पुढील काळात शिरुर विधान सभेचा भारतीय जनता भारतीय पार्टीचा चेहरा कोण असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिरुर विधानसभा मतदार संघ अनेकदा राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे राहिलेला असताना यापूर्वी माजी आमदार सुर्यकांत पलांडे, पोपटराव गावडे यांनी या तालुक्याचे प्रतिनिधित्व केले असून सध्या राष्ट्रवादीचे अशोक पवार प्रतिनिधित्व करत आहे, मात्र राष्ट्रवादीचे दोन गट पडल्याने पदाधिकारी व कार्यकर्ते सुद्धा विभागले गेले आहे, यापूर्वी भारतीय जनता पार्टीकडून दिवंगत बाबुराव पाचर्णे, जयश्री पलांडे व मंगलदास बांदल यांना अपयशाला सामोरे जावे लागले मात्र बाबुराव पाचर्णे यांनी देखील दोन वेळा यश मिळवले, दोन वर्षापूर्वी माजी आमदार बाबुराव पाचर्णे यांचे निधन झाल्याने भाजपाकडे तुल्यबळ उमेदवार कोण असे बोलले जात असताना, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक प्रदीप कंद, शिरुर तालुक्यात विविध आंदोलने यशस्वी करणारे भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे तर यापूर्वी निवडणूक लढवलेल्या माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री पलांडे यांनी मतदार संघात वेगवेगळ्या माध्यमातून आपला संपर्क सुरु ठेवून उमेदवारीची तयारी सुरु ठेवली आहे, मात्र सध्या राष्ट्रवादी मध्ये दोन गट असताना अशोक पवार हे शरद पवार गटाकडे असल्याने त्यांची उमेदवारी निच्छित आहे, शिरुर ची जागा भाजपाकडे जाणार कि अजित पवार गटाला याबाबत तर्कवितर्क असताना सध्या मंगलदास बांदल ईडीच्या कारवाईमध्ये असल्याने त्यांचा उमेदवारी बाबत सध्या कोणतीही चर्चा नसली तरी बाबुराव पाचर्णे यांचे चिरंजीव माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल पाचर्णे यांच्या नावाची देखील ऐनवेळी निवड होईल असे बोलले जात आहे, मात्र भाजपाकडे सध्या जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद, भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे, माजी जिल्हा परिषद सदस्या जयश्री पलांडे, राहुल पाचर्णे हे उमेदवारीच्या रिंगणात असून भारतीय जनता पार्टी कडून कोण निवडणूक लढवणार आणि विधानसभेचा भारतीय जनता पार्टीचा चेहरा प्रदीप कंद, संजय पाचंगे, जयश्री पलांडे कि राहुल यांच्यापैकी कोण असणार चर्चा शिरुर तालुक्यात रंगू लागली आहे.

## शिक्रापुरातील शिक्षकांना चौतीस लाखांना गंडा

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील सात शिक्षकांना विद्यापीठात नोकरी लावतो असे म्हणून एका भामट्याने तब्बल चौतीस लाखांना गंडा घालून फरार झाल्याची घटना घडली असल्याने सदर भामट्याबाबत शिक्रापूर पोलिसांत तक्रार देण्यात आली आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथे राहणारे काही शिक्षक व वेगवेगळ्या शाळेमध्ये शिपाई नोकरीवर असलेल्या व्यक्तींची सोमनाथ नावाच्या व्यक्तीसोबत ओळख झाल्यानंतर त्याने सदर सात शिक्षक व्यक्तींना माझी पुणे विद्यापीठात ओळख असून मी अनेकांना नोकरीला लावले आहे, तुम्हाला देखील नोकरीला लावतो असे म्हणून सात जणांकडून तब्बल चौतीस लाख रुपये घेतले.

## » Selected



## श्री क्षेत्र नारायणपूर गावात सर्व व्यवहार बंद; सर्वत्र शुकशुकाट

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील अवघ्या दत्त भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र नारायणपूर येथील सर्व परिसरावर शोककळा पसरली असून गेली अनेक दिवस शुकशुकाट व व्यवहार बंद आहेत परपूज्य श्री आण्णा महाराज यांच्या निधनामुळे अवघ्या पुरंदर तालुक्यातील नव्हे तर मेढा उत्तरप्रदेश मध्यप्रदेश हिमाचल प्रदेश कन्याकुमारी येथे देखील शोककळा पसरली आहे
अण्णांच्या निधनाने संपूर्ण नारायणपूर येथील सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत एकही दुकानं किंवा भाजीबाजार देखील भरत नाही आण्णांचा दशक्रिया ़पौर्णेमेला होणार आहे तोपर्यंत सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले आहेत हे सर्व व्यवहार स्वतः स्थानिक नागरिकांनी मिळून ठेरवले आहेत

# लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी बोट सज्ज...

## शिंदे बंधूना सामाजिकेतेची जाण



विठ्ठलवाडी ता. शिरूर येथे भीमा नदीकाठी लोकार्पण करण्यात आलेली बोट.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** विठ्ठलवाडी ता. शिरुर येथील जयेश शिंदे व नितीन शिंदे या भावंडांनी आपल्या वडिलांच्या दशक्रिया निमित्ताने गावामध्ये विसर्जन घाट येथे गणेश विसर्जन वेळी येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ भीमा नदी काठी गणेश विसर्जनसाठी बोट सह संरक्षण जॅकेटचे लोकार्पण केले आहे.

विठ्ठलवाडी ता. शिरुर येथे भीमा नदीकाठी प्रत्येक वर्षी शेकडो गणेश विसर्जन होत असताना गावातील नागरिक सर्व मूर्ती व निर्माल्य संकलित करत असताना अनेक अडचणी येतात, येथे दुर्घटना रोखण्यासाठी बोटची आवश्यकता भासत होती, नुकतेच येथील सोसायटीचे माजी संचालक प्रकाश शिंदे यांचे गणेशोत्सव काळात नुकतेच निधन झाले, त्यानंतर सामाजिक जाण असलेले भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे प्रदेश सचिव जय शिंदे व उद्योजक नितीन शिंदे या भावांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ भीमा नदीकाठी बोट लोकार्पण करण्याचा निर्णय घेत वडिलांच्या दशक्रिया वेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत भीमा नदी काठी गणेश विसर्जन व आपत्कालीन व्यवस्थेसाठी बोट सह संरक्षण जॅकेटचे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ह. भ. प. नवनाथ महाराज माशीरे यांच्या हस्ते लोकार्पण केले. दरम्यान अनेक मान्यवरांनी शिंदे परिवाराने सामाजिक बांधिलकीतून राबवलेल्या या अनोख्या उपक्रमाचे कौतुक केले.



## धामारीत बिबट्याच्या हल्ल्यात बिबट मादीचा मृत्यू

**शिक्रापूर :** धामारी ता. शिरुर येथील कान्हुर मेसाई रस्त्यालगत एका तळ्याजवळ अंदाजे दिड वर्षे वयाची बिबट मादी मृतावस्थेत आढळून आली असताना वनविभागाकडून दोन बिबट्यांच्या झटापटीत हा मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तविला जात असताना याबाबत शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यावर बिबट्याच्या मृत्यूचे नेमके कारण निष्पन्न होणार आहे. धामारी ता. शिरुर येथील सागर केंजळे हे शेतात गेले असता त्यांना बिबट्या झोपल्याचे दिसले मात्र बिबट्याची कुठलीच हालचाल दिसली नाही, याबाबतची माहिती सरपंच अर्जुन भगत, संपत कापरे यांनी वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांना देताच वनपाल गणेश पवार, वनरक्षक नारायण राठोड, अभिजित सातपूते, हनुमंत कारकुड घटनास्थळी दाखल झाले असता बिबट्या मृत असल्याचे निष्पन्न झाले, दरम्यान पाहणी केली असता मादी जातीचा हा बिबट्या असून त्याच्या गळ्याभोवती तसेच जबड्यावर आणि मानेखाली जखमां असल्याने दुसऱ्या बिबटयाकडून झालेल्या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला, यावेळी सरपंच अर्जुन भगत, माजी सरपंच संपत कापरे, सागर केंजळे, बाळासाहेब चौधरी, सोपान गायकवाड, सुनिल कंजळे आदींच्या उपस्थितीत वनविभागाने बिबट्याला शिरुर घेऊन जात शवविच्छेदनानंतर बिबट्याचे दहन केले असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांनी सांगितले.

# उड्डाणसाठी तय्यार...

## इंदु इंग्लिश स्कुल कोळविहिरेच्या विद्यार्थ्यांनी साकारली नियोजित पुरंदर विमानतळाची प्रतिकृती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** इंदू इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे सर यांच्या संकलपणेतून धार्मिक व ऐतिहासिक वारसा जतन व्हावा या हेतूने या वर्षी विद्यालयाने गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुरंदर तालुक्यातील नियोजित श्री. छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिकृती उभारली आहे.

विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करून नियोजित विमानतळाची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे.

पुरंदरच्या भूमीतील ही विमानसेवा सुरू झाल्यास पुरंदर तालुका जगाच्या नकाशात महत्वाचे शहर म्हणून नावलौकिक मिळवेल. पुरंदर तालुक्यात आंबोडी, सोनोरी, कुंभारवळण, एखतपूर-मुंजवडी, खानवडी, पारगाव मेमाणे, राजेवाडी, आंबळे, टेकवाडी, वनपुरी, उदाचीवाडी, आणि सिंगापूर या गावात हा नियोजित प्रकल्प होणार आहे. पुणे-मिरज-लोणंद मार्गावरील राजेवाडी रेल्वे स्थानक देखील जागेजवळ आहे. प्रस्तावित विमानतळ राष्ट्रीय महामार्ग 48 आणि 65 सह सहा वेगवेगळ्या मार्गांनी जोडले जाईल. प्रस्तावित विमानतळासह हडपसरपासून प्रमुख औद्योगिक आस्थापनांना जोडणारा विशेष रिंगरोडही असेल. नवीन पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ राज्यासाठी कार्गो हब म्हणून काम करेल. जवळपासचे बरेच शेतकरी इतर पिकांसह द्राक्षे आणि डाळिंब यासारख्या फळांची लागवड करतात. नवीन विमानतळामुळे सर्व पिके फळे जागतिक स्तरावर इतर राज्ये आणि देशांत पोहोचवता येतील. या कार्गो हबमुळे राज्याच्या महसुलात वाढ होईल . विमानसेवा जर सुरू झाली तर निर्यात सहजतेने करता येते, तसेच रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील असे डॉ रामदास कुटे यांनी सांगितले. संस्थेच्या संस्थापिका इंदुमती कुटे, अध्यक्ष डॉ. रामदास कुटे, पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडे पाटील, सचिव डॉ. मोनाली कुटे, प्राचार्य पुरुषोत्तम रोटे यांनी या देखव्या बद्दल शिक्षका व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### अमेरिकेत भारतीय विद्यार्थ्यांनी केला गणेशोत्सव साजरा

# जेजुरीकरांचा न्यूयॉर्क मध्ये बाप्पा मोरया!



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** अमेरिकेतील न्यूयॉर्क प्रांतातील सिराक्युज विद्यापीठात भारतातील अनेक तरुण शिक्षण घेत आहेत.शिक्षण घेत असताना आपली सण ,उत्सव साजरे करून आपल्या संस्कृतीचे जतन करत असतात. या सिराक्युज शहरात भारतीय विद्यार्थ्यांनी गणेशाची स्थापना करून उत्सव साजरा केला. उच्च शिक्षणासाठी भारतातून हजारो विद्यार्थी परदेशी जात असतात. अमेरिकेतील सिराक्यूज विद्यापीठात अनेक भारतीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सिराक्युज शहरातील ग्रीनवुड परिसरात सुमारे तीनशे भारतीय तरुणांनी श्री गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून तीन दिवस पूजा आरती नैवद्य प्रसाद असा धार्मिक विधी केला. तिसऱ्या दिवशी मिरवणूक काढून गणेशाचे विसर्जन करण्यात आले.दर् वर्षी येथे गणेश उत्सव साजरा केला जात असून या शहरातील इंडिया बझारचे मालक य उत्सवाला सहकार्य करीत असतात असे विद्यार्थी अभिषेक गवळी यांनी सांगितले.

अर्चित दुखंडे,वेदांत कदम, अथरव राणे,स्वराज सांबरे, साहिल शिर्के,तन्मय कांबळे या विद्यार्थ्यांनी अमेरिकेतील गणेशोत्सवाचे आयोजन केले होते.



# हिवरे गावात घडले दोन सामाजिक जाणिवेचे रत्न



## विकास गायकवाड व दीपक खैरेंचा गावासाठी कोट्यावधींचा स्वखर्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** हिवरे कुंभार हे शिरुर तालुक्यातील दुष्काळी समजले जाणारे आणि शेतकऱ्यांचे गाव मात्र या गावात घडलेले विकास गायकवाड व दीपक खैरे यांनी सामाजिक भान जपत गावासाठी काहीतरी करण्याचे स्वप्न पाहून गावासाठी कोट्यावधींचा स्वखर्च करुन गावचा विकास करत गावाचा चेहरा मोहरा बदलला आहे.

हिवरे कुंभार ता. शिरुर हे गाव पूर्णता शेती व्यावसायिकांचे आणि दुष्काळी समजले जाणारे गाव मात्र या गावातील दुष्काळाची जाण असेलल्या विकास गायकवड यांनी आपला व्यवसायात जम बसल्यानंतर गावासाठी काहीतरी करण्याचा विचार केला, दरम्यान दुष्काळ व परिस्थितीमुळे गावामध्ये अनेकांच्या मुलींची लग्रे करण्यासाठी अडचणी येत असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्याचे ठरवून कायमस्वरूपी सामुदायिक विवाह सोहळा चळवळ सुरु करत आज पर्यंत कोरोना काळ वगळता तब्बल ऐंशी जोडप्यांचे सर्व कौटुंबिक साहित्य व झाल देऊन विविध खासदार व आमदारांच्या उपस्थितीत स्वखर्चाने लग्र लावून दिले आहे. तर याच गावात घडलेले दिपक खैरे यांनी आपल्या जिद्दीने काहीही झाले तर दुष्काळी गावाची ओळख पुसण्याचा विचार करुन गाव जलयुक्त करण्याचा निर्णय घेऊन गावातील नागरिकांना बरोबर घेऊन गावातील काशीतळे येथे जागा विकत घेत तब्बल एक कोटी रुपयांचा स्वखर्च करुन तेथे विहीर बनवून विहिरीतून साडेपाच किलोमीटर पाईपलाईनने पाझर तलावात पाणी आणून तलाव खोलीकरण करत पाणी साठवण करण्यास सुरुवात केली, असल्याने गावची दुष्काळी ओळख पुसली जाऊन शेकडो हेक्टर जमिनी पाण्याखाली आल्याने शेती हिरवीगार होऊ लागली आहे, विकास गायकवाड यांच्या कार्याने नागरिकांनी त्यांना समाजसेवक तर दिपक खैरे यांच्या कार्याने त्यांना जलदेव व देवमाणूस उपाधी बहाल केली असून अनेकांच्या वाहनांवर त्यांचे या उपाधीसह फोटो देखील नागरिकांनी लावले असल्याने या दोघांच्या कार्याचा समाजाने व नागरिकांनी प्रेरणा घेणे गरजेचे आहे.

### ग्रामस्थांकडून दोघांचे ऋण

● हिवरे कुंभार येथे प्रत्येक वर्षी सामुदायिक विवाह सोहळा चळवळ राबवणारे विकास गायकवाड व दिपक खैरे यांच्या या सामाजिक कार्यामुळे ग्रामस्थांनी ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध करत विकास गायकवाड यांची पत्नी शारदा गायकवाड व दिपक खैरे यांची पत्नी दिपाली गायकवाड या दोघींसह दिपक खैरे यांना बिनविरोध ग्रामपंचायत सदस्य पदाची संधी देऊन शारदा गायकवाड व दिपाली गायकवाड यांना सरपंच पदी आणि दिपक खैरे यांना उपसरपंचपदी विराजमान करत त्यांचे ऋण व्यक्त केले आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनी नारायणपूर मध्ये केले सांत्वन

# श्रीसदगुरु नारायण महाराजांना वाहिली आदरांजली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणपूर :** पुणे जिल्ह्याच्या पुरंदर तालुक्यातील श्रीक्षेत्र नारायणपूर येथील श्रीसदगुरु नारायण महाराज यांचं नुकतच निधन झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज नारायणपूर येथे भेट देऊन श्री सद्गुरु नारायण महाराजांच्या प्रतिमेला आदरांजली वाहिली तसेच अनुयायांची भेट घेऊन सांत्वन केले. "सद्गुरु नारायण महाराजांचे निधन ही महाराष्ट्राच्या अध्यात्मिक, पुरोगामी, सुधारणावादी चळवळीची मोठी हानी आहे. अध्यात्माच्या माध्यमातून लोकजागृती, लोकजागृतीतून लोकचळवळ, लोकचळवळीतून सामाजिक सुधारणा, पुरोगामी विचार गावोगावी पोहचवले. श्रीसदगुरु नारायण महाराजांचे विचार आणि सेवाकार्य सर्वांनी मिळून पुढे नेणं. सामुदायिक शेती, सामुदायिक विवाह, सामुदायिक श्रमदान, व्यसनमुक्तीचे त्यांचे कार्य अखंडीतपणे कायम ठेवणं हीच श्रीसदगुरु नारायण महाराजांना खरी आदरांजली ठरेल," अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन आदरांजली वाहिली.



#रा

## नेहरू विद्यालयाचे क्रीडा स्पर्धामध्ये यश

**लोणी-धामणी :** पुणे जिल्हा परिषद व पुणे जिल्हा क्रीडा अधिकार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत तालूकास्तरीय विविध क्रीडा स्पर्धामध्ये निरगुडसर ( ता.आंबेगाव ) येथील पंडीत जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी तालुका क्रिडा स्पर्धे मध्ये चमकले असून यशस्वी खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षाखालील मुले . सार्थक पांडुरंग टाव्हरे-गोळा फेक प्रथम , पियुष रामदास टाव्हरे-८० मीटर अडथळा शर्यत द्वितीय . १७ वर्षाखालील मुले . यश पोंदे-भाला फेक द्वितीय,नवनाथ राहींज-उंच उडी तृतीय. तसेच १४ वर्षाखालील मुली . दिव्या प्रवीण केदारी-८० मीटर हर्डल्स प्रथम

'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्तीसाठीच्या अडचणींचे; शिबिरात तत्काळ निरसन

# शिबिरास व्यवसायधारकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

- शहरातील सर्व व्यावसायिक मालमत्ताधारकांनी 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करणे आवश्यक
- व्यावसायिक मालमत्ताधारकांनी मालमत्ता सिलबंद होण्याची कारवाई टाळावी
- व्यावसायिक मालमत्ताधारकांनी त्यांची मिळकत अग्निसुरक्षित करण्यासाठी स्वतःहून पुढाकार घ्यावा!

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत गुरुवार, दिनांक १२ सप्टेंबर रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील चिखली, कुडळवाडी व तळवडे परिसरातील व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यासाठी चिखली, सोनवणे वस्ती येथील 'टाऊन हॉल' येथे मार्गदर्शन शिबिर पार पडले. याप्रसंगी अग्निशमन विभागाचे उपायुक्त, मनोज लोणकर, उप अग्निशमन अधिकारी बाळासाहेब वैद्य यांनी व्यावसायिकांना मार्गदर्शन केले.

मार्गदर्शन शिबिरामध्ये व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत माहिती देण्यात आली. त्याचबरोबर, शिबिरामध्ये व्यावसायिक मालमत्ताधारकांच्या अडचणींचा तत्काळ निरसन करण्यात आले. व्यावसायिक मालमत्ताधारकांना अग्निशमन उपकरणे हाताळण्याची पद्धती, व्यावसायिक मालमत्ता अग्निसुरक्षेच्या दृष्टीने पूर्ण सुरक्षित करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची व यंत्रणांची इत्थंभूत माहिती देण्यात आली.

### आत्तापर्यंत ५,०९३ व्यावसायिक मालमत्ताधारकांना नोटिस

● पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील मालमत्तांच्या सुरक्षेसाठी अग्निप्रतिबंधात्मक व जीवसंरक्षक सर्वेक्षण करण्यात येत आहे. यामध्ये, मनपा क्षेत्रातील व्यावसायिक, औद्योगिक, शैक्षणिक, संस्थात्मक व वैद्यकीय इमारतींचे अग्निप्रतिबंधात्मक सर्वेक्षण झालेल्या मिळकतीपैकी धोकादायक मिळकतींची ओळख पटवून मिळकतीमध्ये अग्निशमन यंत्रणांची उपलब्धता, ये-जा करण्याचा सुरक्षित मार्ग, धोकादायक पदार्थांचा साठा, मिळकतीमध्ये निवासी वास्तव्य इत्यादी बाबींचा विचार करून शहरात अग्निप्रतिबंधात्मक व जीवसंरक्षक सर्वेक्षण सुरू आहे. शहरातील व्यावसायिक मालमत्ताधारकांना आपली मालमत्ता अग्निसुरक्षित करण्यासाठी अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. ज्यांनी अद्यापि पूर्तता केली नाही, अशा ५,०९३ मालमत्ताधारकांना नोटिस बजाविण्यात आली आहे. यापैकी, ९७० मालमत्ताधारकांची प्रकरणे विभागामध्ये आली आहेत. यामधून ४२९ मालमत्तांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून ३१३ मालमत्तांची प्रकरणे व्यावसायिक अग्निसुरक्षा प्रमाणपत्राकरिता प्रक्रियेत आहेत. याबरोबरच, आतापर्यंत ९२ व्यावसायिक मालमत्ताधारकांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्रदान करण्यात आले आहे.

### अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन न केल्याने आत्तापर्यंत ३७ मालमत्ता सिल

● पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व्यावसायिक मालमत्ताधारकांना दोन वेळा नोटिस बजाविल्यानंतरही ३७ व्यावसायिक मालमत्ताधारकांनी अग्निप्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन न केल्याने त्या मालमत्ता सिलबंद करण्यात आल्या आहेत.

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व्यावसायिक मालमत्ता अग्निसुरक्षित होण्यासाठी अग्निशमन विभागाकडून ज्या व्यावसायिक मालमत्तांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांची पूर्तता केली आहे, अशा मालमत्तांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' देण्यात येत आहे. शहरामध्ये आगीच्या घटना घडू नयेत यासाठी सर्व व्यावसायिक मालमत्तांनी अग्निसुरक्षा उपाययोजनांची पूर्तता करून 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करणे आवश्यक आहे."
— **शेखर सिंह** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

"शहरातील व्यावसायिक मालमत्तांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्यासाठी नोटिस बजाविण्यात आल्या आहेत. शहरातील ज्या व्यावसायिक मालमत्ताधारकांनी अद्यापि आवश्यक अटींची पूर्तता केली नसेल, तर त्यांनी त्वरित पूर्तता करून घ्यावी. अग्निशमन विभागाने आयोजित केलेल्या शिबिरांच्या माध्यमातून इत्थंभूत माहिती देण्यात येत आहे. व्यावसायिक मालमत्ताधारकांनी आपली मालमत्ता अग्निसुरक्षित करून 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करावे व मालमत्ता सिल होण्याची कटू कारवाई टाळावी."
— **प्रदीप जाभंळे-पाटील** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

"पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व्यावसायिक मालमत्तांना 'अग्निसुरक्षितता पूर्तता प्रमाणपत्र' प्राप्त करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व त्याबाबतची माहिती मिळण्यासाठी अग्निशमन विभागाकडून शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. ज्या व्यावसायिक मालमत्ताधारकांना प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यामध्ये अडचणी निर्माण होत असतील, अशांनी जवळच्या अग्निशमन केंद्राकडे संपर्क साधून आपल्या शंकाचे निरसन करून घ्यावे".
— **मनोज लोणकर** उपायुक्त, अग्निशमन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

» Selected



## उन्नतीच्या श्री गणेश आरतीचा समाजातील विविध घटकांना मान

**पिंपळे सौदागर :** येथील उन्नती सोशल फाऊंडेशनतर्फे आयोजित उन्न " ती " च्या गणेश उत्सवात समाजातील विविध आणि वंचित घटकातील व्यक्तींना आरती करण्याचा मान दिला जात आहे. आतापर्यंत शिक्षक, प्राध्यापक, पोलिस, माजी सैनिकांच्या पत्नी, सफाई कामगार महिला, ज्येष्ठ नागरिक अशा विविध स्तरातील व्यक्तींच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आलेली आहे. उन्नती फाऊंडेशनचे संस्थापक डॉ. कुंदाताई भिसे आणि संजय भिसे यांनी गेल्या पाच वर्षांपासून उपक्रम सुरु केला असून त्यांच्या या उपक्रमात पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

## सांगवी-बोपोडी पुलावर 21 कोटींचे सुशोभीकरण

**सांगवी :** महापालिकेच्या वतीने सांगवी-बोपोडीदरम्यान मुळा नदीवर उभारण्यात ( Sangavi) येणा-या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या पुलाच्या कामासाठी 32 कोटी 36 लाखांचा खर्च करण्यात आला असताना आता या पुलाच्या सुशोभीकरणावर तब्बल 20 कोटी 65 लाखांचा खर्च केला जाणार आहे.
या पुलाच्या उभारणीसाठी आतापर्यंत एकूण 32 कोटी 36 लाखांचा खर्च करण्यात आला आहे. हे काम टीॲण्डटी इन्फ्रा लिमिटेड कंपनी करत आहे. कामाची मुदत 2 वर्षे होती. मात्र, पुण्याकडील राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्राची जागा मिळण्यास विलंब झाल्याने ठेकेदाराला 31 ऑगस्ट 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सप्टेंबर महिना उजाडला तरी अद्याप पुलाचे काम पूर्ण झाले नसून, त्यावरून वाहतूक, रहदारी सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## राहुल गांधींच्या विरोधात भाजपचे काळ्या फिती बांधून आंदोलन



**पिंपरी :** मेरिकेच्या चालू दौऱ्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतीय लोकशाहीवर टीका करून देशातील सामाजिक आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेण्याबाबत वक्तव्य केले. या घटनेच्या निषेधार्थ पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक भागात पिंपरी-चिंचवड शहर (जिल्हा) भाजपा पदाधिकारी व महिला कार्यकर्त्यांनी राहुल गांधी यांच्या विरोधात काळया फिती बांधून आंदोलन केले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.

भाजप आहे तोपर्यंत कोणीही आरक्षण रद्द करू शकणार नाही, असा पुनरुच्चार करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप हा लोकांच्या पाठिंब्याने जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष बनला आहे आणि सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी प्रयत्नशील आहे, असे जगताप यांनी सांगितले.

यावेळी, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार अमर साबळे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, आमदार अमित गोरखे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य माऊली थोरात, महेश कुलकर्णी, मोरेश्वर शेडगे, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, शितल शिंदे, अजय पाताडे, भाजपा उपाध्यक्ष तथा प्रवक्ते राजू दुर्गे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मनोज तोरडमल, डॉ. संजीवनी पांड्ये यांच्यासह माजी नगरसेवक – नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## समाजभान ठेवून उत्सव साजरे करा – पार्थ पवार

**पिंपरी :** सण, उत्सव हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. यातील गणेश उत्सव महाराष्ट्र बरोबरच जागतिक स्तरावर भक्ती भावाने साजरा केला जातो. असे उत्सव साजरे करीत असताना मांगल्य व पावित्र्य जपत पर्यावरणाचे रक्षण करीत समाजभान ठेवावे असे आवाहन युवा नेते पार्थ पवार यांनी केले.

पिंपरी गावातील वैभवनगर येथे विजय आसवानी यांच्या संकल्पनेतून आसवानी असोसिएटस् आणि ॲस्पीफ्लाय इनव्हायरमेंट या संस्थेच्या वतीने गतवर्षी प्रमाणे खासगी जागेत गणेश मूर्ती विसर्जनासाठी लहान, मोठ्या आकाराचे दोन हौद करण्यात आले आहेत. त्यांचे उद्‌घाटन पार्थ पवार यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी उद्योजक राजूशेठ आसवानी, माजी नगरसेवक हिरानंद उर्फ डब्बू आसवानी, उद्योजक राजू आसवानी, श्रीचंद आसवानी, सतीश आसवानी, अनिल आसवानी, विजय आसवानी, अमर कुकरेजा, हितेश बटवा, हिरो मदयानी, सुनील चूगवानी, हरेश सेवानी, अविनाश इसरानी, फजल शेख आदी उपस्थित होते.

सण, उत्सव साजरे करीत असताना पर्यावरणाचे रक्षण व्हावे व गणेशोत्सव काळात नदी नाल्यांचे प्रदूषण होऊ नये. यासाठी यावर्षी देखील पिंपरी, वैभव नगर येथे कृत्रिम हौद उभारण्यात आले आहेत. येथे गणेश मूर्ती विसर्जित कराव्यात. विसर्जनाच्या वेळी श्रींच्या आरतीसाठी स्वतंत्र व्यवस्था केली आहे. महापालिकेच्या वतीने पाणी व निर्माल्यकुंड दिले आहे. संयोजकांच्या वतीने विद्युत व्यवस्था व स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच खासगी अनुभवी जीवरक्षक नेमण्यात आले आहेत. जीवरक्षक विधीवत पध्दतीने या हौदांमध्ये मूर्ती विसर्जन करतात असे संयोजक विजय आसवानी यांनी सांगितले. स्वागत श्रीचंद आसवानी, तर आभार विजय आसवानी यांनी मानले.



पालखीचे स्वागत..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळा तर्फे उत्सवाच्या १३२ व्या वर्षी चिंचवड देवस्थान ट्रस्ट तर्फे आलेल्या पालखीचे स्वागत करण्यात आले.

श्रीमंत 'दगडूशेठ' गणपती उत्सवमंडपात

## श्री मोरया गोसावी पालखी सोहळ्याचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** श्री मोरया गोसावी यांनी भाद्रपद महिन्यातील मोरगावला सुरु केलली पालखी परंपरा परतीच्या वेळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती उत्सव मंडपात दरवर्षी येते. यावर्षी देखील तब्बल १० दिवसांचा पायी पालखी सोहळा करुन उत्सव मंडपात आलेल्या पालखीचे स्वागत व आरती श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या विश्वस्त व पदाधिका-यांच्या हस्ते करण्यात आली. तसेच चिंचवड देवस्थानच्या विश्वस्तांनी श्री दगडूशेठ गणपतीची देखील आरती केली.

यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, माजी विश्वस्त व श्री मोरया गोसावी यांचे वंशज विश्राम देव, दगडूशेठ गणपती ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

श्री मोरया गोसावी विनायकी चतुर्थी ला मोरगावला जात असत. एकदा विनायकी चतुर्थीला गेले असताना मयुरेश्वराने त्यांना दृष्टांत दिला की आता तू वृद्ध झाला आहेस, तुझे कष्ट पाहवत नाहीत. त्यामुळे मीच तुझ्या घरी येईन. त्या दृष्टांताप्रमाणे चिंचवडमधील गणेश कुंडामध्ये क-हा नदीच्या तीरी मयूरेश्वराची मूर्ती सापडेल, असे सांगितले. त्याप्रमाणे प्रति मयुरेश्वर रुपाची मूर्ती सापडली. श्री मोरया गोसावी यांनी ती मूर्ती चिंचवडमधील मंगलमूर्ती वाडयात स्थापन केली.तेव्हापासून दर माघ व भाद्रपद महिन्यात श्री मंगलमूर्ती (प्रति मयुरेश्वर) पालखीतून मोरगावला श्री मयुरेश्वराच्या भेटीला जाते. ही पालखी चिंचवड ते मोरगाव अशी माघ महिन्यात रथातून आणि भाद्रपद महिन्यात युवा कार्यकर्ते खांद्यावर पालखी घेऊन जातात. या दोन्ही वेळेला मोरगावला दिवाळीसारखे वातावरण असते. दर तृतीयेला पालखी मोरगावला पोहोचते.

दिघीतील वाहतूक कोंडी कमी करण्यास होणार मदत

# दिघी बायपास रस्त्याच्या कामाला “गती”

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पिंपरी :** दिघी- भोसरीला जोडणारा सीएमई (कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग) च्या भिंतीलगत असलेल्या दिघी बायपास रस्त्याचे काम मार्गी लागले आहे. या रस्त्याचे काम सुरू झाले असून, लवकरच रहदारीसाठी खुला करण्यात येणार आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा आमदार महेश लांडगे यांनी समाविष्ट गावांची ‘कनेक्टिव्हीटी’ वाढवण्यासाठी सातत्यपूर्ण पुढाकार घेतला आहे. दिघी-भोसरी सीएमई सीमा भिंतीलगतच्या रस्त्याचे काम करण्याबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केली होती. त्यानुसार कामाला सुरूवात करण्यात आली.

माजी नगरसेवक विकास डोळस म्हणाले की, दिघी-भोसरी सीएमई भिंतीलगतचा रस्त्यामुळे भोसरीला जाण्यासाठी पर्यायी रस्ता (बायपास) उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांचा वेळ व किमान १ किमीचे अंतर वाचणार आहे. धर्मवीर संभाजी महाराज चौकातील (ममता स्वीट जवळील) ट्रॅफिक कमी होण्यास मदत होणार आहे. दररोज संध्याकाळ च्या वेळेस धर्मवीर संभाजी महाराज चौकात ट्रॅफिक जाम होते. अनेक नागरिक त्या ट्रॅफिक जॅममध्ये अडकतात. आता रस्त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे.



भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा



"समाविष्ट गावांतील महानगरपालिका मंजूर विकास आराखडाप्रमाणे (डीपी) रस्ते विकसित करण्यावर आम्ही प्राधान्याने भर दिला आहेत. दिघीची कनेक्टिव्हीटी वाढवणे आणि धर्मवीर संभाजी महाराज चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडण्यासाठी सीएमई भिंतीलगतचा रस्ता मदतशील ठरेल. या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे आणि रस्ता नागरिकांसाठी खुला करावा, अशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत."
— **महेश लांडगे** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## गणेश विसर्जनासाठी महापालिकेची यंत्रणा सज्ज; पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गणेश विसर्जनासाठी महापालिकेची (Pimpri) सर्व यंत्रणा सज्ज असून शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची दक्षता संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत. गणेशोत्सव आनंदात आणि उत्साहात साजरा करताना नागरिकांनी पर्यावरणाचीही काळजी घ्यावी, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले आहे.

सांगवी येथे आज गणेश विसर्जन होत असून पोलीस प्रशासन आणि महापालिकेच्या संयुक्त पथकाने सांगवीतील सर्व विसर्जन घाटांवर प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छता आणि सुरक्षेचा आढावा घेतला.या पथकात सांगवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांचा समावेश होता. सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाट, वेताळ महाराज घाट, दत्त मंदिर घाट आदी घाटांची पाहणी या पथकाने आज केली. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या महापालिकेच्या आवाहनाला नागरिक उस्फुर्त प्रतिसाद देत आहेत. सांगवी येथे आज गणेश विसर्जन होत असून महापालिकेच्या वतीने निर्माल्य संकलनासाठी निर्माल्य कुंडांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी गणेश विसर्जन करण्यासाठी येणारे नागरिक सर्व निर्माल्य निर्माल्य कुंडातच टाकत आहेत. तसेच या विसर्जन घाटांवर ‘गणेश विसर्जन (Pimpri) फिरती पथक’ वाहन मूर्ती संकलित करत आहे. या ठिकाणी गणेश विसर्जनासाठी येणारे नागरिक उस्फुर्तपणे मूर्तीदान करत आहेत. विसर्जनाच्या ठिकाणी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबतचे सूचना फलक महापालिकेच्या वतीने लावण्यात आले आहे.

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या !

## सांगवीतील 'अरविंद एज्युकेशन सोसायटी'च्या गणरायाला दिला निरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** टाळ मृदंगाचा गजर, लेझीम, लाठीकाठी, आदिवासी नृत्य, बंजारा नृत्य, विविध कसरती आणि 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या गणरायाला विद्यार्थी, शिक्षकांनी जड अंत:करणाने निरोप दिला.



गणरायाला निरोप देण्यासाठी विद्यार्थ्यांनी जुनी सांगवीतून बाप्पाची मिरवणूक काढली. ही विसर्जन मिरवणूक शितोळेनगर, गजानन महाराज मंदिर, संविधान चौकामार्गे अहिल्याबाई होळकर घाटावर आली. गणपतीची आरती करून गणरायाला जड अंतःकरणाने निरोप दिला. दरम्यान, 'गणपती चालले गावाला, चैन पडेना आम्हाला, गणपती बाप्पा मोरया...पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. आकर्षक फुलांची सजावट, विद्यार्थ्यांचा पांढरा ड्रेस कोड नागरिकांचे लक्ष आकर्षून घेत होता. रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी बालचमुंच्या कसरती, लेझीम पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. शिक्षिकांनी फुगड्यांचे फेर धरले होते.

विद्यार्थ्यांचे मर्दानी खेळ, लाठी-काठी, टाळपथक, लेझिम, आदिवासी नृत्य, बंजारा नृत्य हे मिरवणुकीचे खास आकर्षण होते. मागील सात दिवसांपासून शाळेत गणेशोत्सवाची धूम असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

विसर्जन मिरवणुकीत स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे, उद्योजक अजय शितोळे, संस्थेच्या अध्यक्षा आरती राव, सचिव प्रणव राव, भारतीय विद्यानिकेतनच्या मुख्याध्यापिका आशा घोरपडे, लिटल फ्लॉवर इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य शीतल मोरे, लिटल फ्लॉवर प्रायमरीच्या मुख्याध्यापिका पिंकी मनिकम, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, प्रिती पाटील, उदय फडतरे, भटू शिंदे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

#रा

## आयात शुल्कात २० टक्क्यांची वाढ

# ऐन सणात खाद्यतेल महागणार



**कस्टम ड्युटी वाढवल्यावर तेलांच्या किंमती किती वाढतील?**

● समोर आलेल्या माहितीनुसार, कस्टम ड्युटी वाढवल्यानंतर सर्व खाद्य तेलांवरील प्रभावी शुल्क वाढून ३५.७५ टक्के इतके होणार आहे. क्रूड पाम ऑइल, क्रूड सोयाबीन तेल आणि क्रूड सनफ्लॉवर सीड ऑइलवरील प्रभावी शुल्क दर आता ५.५ टक्क्यांनी वाढून २७.५ टक्के होणार आहे. तेच रिफाइंड सनफ्लॉवर सीड ऑइल, रिफाइंड पाम ऑइल आणि रिफाइंड सोयाबीन तेलावरचं प्रभावी शुल्क आता १३.७५ टक्क्यांवरुन आता ३५.७५ टक्के इतकी होणार आहे. खाद्य तेलांच्या किंमती अशावेळी वाढवल्या जातात जेव्हा देशात काहीच दिवसांत सणासुदीचे दिवस असतील. आता सप्टेंबर महिना सरत आला आहे. पुढच्या महिन्यात ऑक्टोबर महिन्यात नवरात्र, दसरा, दिवाळी सण आहेत. अशावेळी सणासुदीच्या दिवसांत खाद्य तेलांच्या किंमतीत वाढ होणार हे निश्चित आहे.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** ऐन सणासुदीच्या काळात खाद्य तेल महागणार आहे. त्यामुळे आता सामान्य माणसाचं महिन्याचं बजेट कोलमडणार हे निश्चित झाले आहे. नवरात्रात नऊ दिवसांचे उपास असतात, दिवाळीत फराळ तयार केला जातो. या सगळ्यासाठी खाद्य तेल वापरले जाते. पीटीआयच्या वृत्तानुसार सरकारने क्रूड, रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि अन्य खाद्य तेलांवरील कस्टम ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आयात शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आल्याने खाद्य तेल महागणार आहे. ऐन सणासुदीत ही दरवाढ झाल्याने आता बजेट कसं मांडायचं हा प्रश्न सगळ्यांनाच सतावणार आहे. अर्थ मंत्रालयाकडून एक अधिसूचना काढण्यात आली आहे. त्यानुसार, क्रुड आणि रिफाइंड पाम तेल, सोयाबीन तेल आणि सनफ्लॉवर सीड तेल यांवर बेसिक कस्टम ड्युटी वाढवण्यात आली आहे. क्रुड पाम ऑइल, क्रूड सोयाबीन तेल आणि क्रुड सनफ्लॉवर सीड ऑइलवर बेसिक कस्टम ड्युटीचे दर आत्तापर्यंत शून्य होती. म्हणजेच या तेलांवरील आयात शुल्क लागत नव्हते. आता हेच आयात शुल्क वाढून २० टक्के करण्यात आलं आहे. तर, रिफाइंड सनफ्लॉवर सीड ऑइल, रिफाइंड पाम ऑइल, रिफाइंड सोयाबीन तेलांवर बेसिक ड्युटीचे दर वाढवून ३२.५ टक्के करण्यात आले आहे.

# मविआच्या जागांचे प्राथमिक सूत्र निश्चित



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** आगामी विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली असताना महाविकास आघाडीच्या जागावाटपाचे प्राथमिक सूत्र निश्चित झाल्याची माहिती आहे. राज्यातील सर्वच पक्षांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरु आहे. सर्व पक्षांकडून जागावाटप, मतदारसंघाची चाचपणी केली जात आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीसाठी आता महायुती आणि महाविकास आघाडी जागावाटपाचा फॉर्म्युला काय असणार याची उत्सुकता आहे. गणेशोत्सवानंतर जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित करण्यासाठी बैठक घेतली जाईल.

विधानसभेच्या २८८ जागांपैकी १०५ जागांची मागणी काँग्रेसने केली आहे. तर शिवसेना ठाकरे गटाने १०० जागा मागितल्या आहेत. तर शरद पवार गटाने ९० जागांची मागणी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महाविकास आघाडीत सध्या जागा वाटपाबद्दल चर्चा होत आहे. यानुसार काँग्रेसने १०० ते १०५ जागांवर लढण्याची तयारी केली आहे. तर शरद पवार गटाने ८५ ते ९० लढण्याची तयारी सुरु केली आहे. त्यासोबतच ठाकरे गटाने ९५ ते १०० जागांवर लढण्याचा निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवानंतर महाविकास आघाडीच्या अनेक बैठका होणार आहेत. नवरात्रीपूर्वी किंवा नवरात्रीदरम्यान जागावाटपाबद्दल अंतिम निर्णय जाहीर केला जाईल.

काँग्रेस आणि ठाकरे गटात मुख्यमंत्रिपदावरुन सध्या रस्सीखेच सुरु आहे. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेसचे नेते मुख्यमंत्रिपदाबद्दल विविध विधाने करताना दिसत आहेत. तर दुसरीकडे, ठाकरे गटानेही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण हे लवकर जाहीर करावा असा आग्रह धरला आहे. त्यामुळे याच बैठकांमध्ये मुख्यमंत्रीपदाबद्दलही धोरण ठरेल, असे बोलले जात आहे.

**पवार गटाचे लोकसभेचेच सूत्र :**

लोकसभेत पवार गटाने १० जागांवर निवडणूक लढली होती. यातील ८ जागांवर त्यांना विजय मिळाला होता. त्यानुसार विधानसभा निवडणुकीतही पवार गटाचा हाच फॉर्म्युला कायम राहणार आहे. शरद पवार विधानसभेला नवीन चेहऱ्यांना संधी देणार आहेत. त्यामुळे निवडणुकीत पवार गटाचे ५० हून अधिक आमदार जिंकून येऊन शकतात, अशी चर्चा आहे.

### तालुका शिक्षण मंडळाची सभा खेळीमेळीत

**राजगुरूनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात (दि. १४) खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अ‍ॅड. आर. एस. घोलप, सतीश चांभारे, अविनाश कहाणे, काळूराम कड, अ‍ॅड. पोपटराव तांबे, गणेश थिगळे, सुरेश डुंबरे, गणेश घुमटकर आदी सभासदांनी सहभाग घेऊन संस्थेच्या कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला. नवीन विस्तारित इमारत बांधकाम, विद्यार्थिनी सुरक्षितता, प्रवेश घेतलेल्या व परीक्षेचा फॉर्म न भरलेल्या विद्यार्थ्यांच्या थकीत शुल्कासंदर्भात सभेत चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# कर निरीक्षक नियुक्तीसाठी अजित पवारांना साकडे

## विधानसभा आचारसंहितापूर्वी करावी

**पुणे :** एमपीएससीमार्फत राज्य करनिरीक्षक पदासाठी ९३ उमेदवारांची शिफारस करण्यात आली. त्याला ६ महिने उलटूनही उमेदवारांना अद्याप नियुक्ती मिळालेली नाही.

उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी १९ मार्च ते २१ मार्च दरम्यान पूर्ण झाली. त्याला सहा महिने उलटून गेले, तरी अद्याप उत्तीर्ण उमेदवारांना नियुक्तीसाठी प्रतीक्षाच करावी लागत आहे. आमच्या नियुक्तीचा प्रश्न मार्गी लावा, अशी मागणी उमेदवारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. ९३ पदांची जाहिरात जून २०२२ मध्ये प्रसिद्ध झाली. परीक्षेचे सर्व टप्पे पूर्ण करून निकाल डिसेंबर २०२३ मध्ये प्रसिद्ध झाला. प्रारंभी लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे नियुक्ती देता येणार नसल्याचे सांगण्यात आले. आचारसंहितेनंतर पुन्हा चौकशी केली असता, जीएसटी विभागाच्या पुनर्रचना प्रक्रियेचे कारण सांगण्यात आले. याच प्रक्रियेच्या कालावधी दरम्यान राज्यकर निरीक्षक २०२१ वेटिंग उमेदवार, तसेच कर सहायक २०२२ उमेदवारांना मात्र विभागाकडून नियुक्ती देण्यात आली.

पुनर्रचना प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर याबाबत जीएसटी विभागाशी पुन्हा संपर्क साधला असता, पदोन्नती, बदली सुरू असल्याचे सांगण्यात आले, असे उमेदवारांनी पवार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

नियुक्तीअभावी उमेदवारांना प्रचंड आर्थिक, सामाजिक व मानसिक तणावातून जावे लागत आहे. आता काही दिवसांत विधानसभेची आचारसंहिता लागू शकते. त्यात नियुक्तीचा मुद्दा पुन्हा अडकून पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे.

» Selected

## पावसामुळे ताजमहालच्या मुख्य घुमटातून गळती



**नवी दिल्ली :** दिल्ली, उत्तर प्रदेश आणि आग्रा येते मागच्या दोन तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस होत असल्यामुळे जागतिक वारसा स्थळातील पर्यटन स्थळ असलेल्या ताजमहाल परिसरात पाणीच पाणी झाले आहे. ताजमहालच्या तीन घुमटांपैकी मुख्य घुमटातून पाण्याची गळती सुरू झाल्याचे भारतीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. गुरूवारी ताजमहाल परिसरातील उद्यानात पाणी साचल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. यानंतर पर्यटकांचे लक्ष ताजमहालन पुन्हा वेधून घेतले. भारतीय पुरातत्व विभाग, आग्रा येथील अधिकाऱ्यांनी सांगिते की, मुसळधार पावसामुळे मुख्य घुमटातून गळती सुरू झाली असली तरी अद्याप ताजमहालचे कोणतेही नुकसान झालेले नाही.

आग्रा विभागाच्या पुरातत्व खात्यामधील अधीक्षक प्रमुख राजकुमार पाटील यांनी पीटीआयशी सांगितले, "ताजमहालमध्ये पाण्याची गळती होत असल्याची बातमी खरी आहे. आम्ही मुख्य घुमटाची तपासणी केली असून पावसामुळे ही गळती होत असल्याचे दिसून आले. तसेच ड्रोन कॅमेऱ्याने आम्ही घुमटाची तपासणी केली आहे." गुरुवारी ताजमहाल परिसरात पाणी साचल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यामुळे पर्यटकांचे लक्ष वेधले गेले. त्यानंतर अनेकजण याठिकाणी व्हिडीओ काढण्यासाठी येऊ लागले.

## केंद्राच्या निर्णयाचा लासलगाव बाजारपेठेत परिणाम

# कांद्याच्या दरात ४०० रु. वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकारने कांद्यावर लादलेले साडेपाचशे डॉलर निर्यात मूल्य रद्द केले आहे. तसेच, अर्थ मंत्रालयाने ४० टक्के निर्यात शुल्क निम्म्यावर आणत २० टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे नाशिकमधील बाजारपेठेत कांद्याच्या दरात वाढ झाली आहे. लासलगाव बाजार समितीत शनिवारी एकाच दिवसात कांद्याच्या दरात प्रतिक्विंटल ४०० रुपयांची वाढ झाली आहे.



लोकसभा निवडणुकीत कांद्याने महायुतीचा वांदा केला होता. केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदीच्या घेतलेल्या निर्णयाचे परिणाम महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीत दिसून आले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी ग्राहक हिताचा विचार करत केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर निर्बंध आणले होते. कांद्यावर प्रती टन साडेपाचशे डॉलर निर्यात मूल्य लादले होते. तसेच ४० टक्के निर्यात शुल्कसुद्धा लादले होते.

लासलगाव बाजारपेठेत कांद्याला ३९०० ते ४४०० रुपये दर होता. तो नव्या निर्णयानंतर शनिवारी ४३०० ते ४८०० रुपयांपर्यंत गेला आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत या निर्णयाचे स्वागत केले आहे. सरकारला हे उशिरा आलेले शहाणपण आहे. पण आता हा निर्णय कायमस्वरूपी ठेवावा, अशी संमिश्र प्रतिक्रिया शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

किसान सभेचे नेते अजीत नवले यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात शुल्क घटवण्याचा निर्णय घेण्यास उशीर केला. यामुळे शेतकरी आणि व्यापारी यांचे मोठे नुकसान झाले आहे.

# बोल्हाईदेवी पालखीमार्ग रस्त्यासाठी भरघोस निधी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली:** श्री क्षेत्र वाडेबोल्हाई(ता. हवेली) येथे पुणे जिल्हा नियोजन समिती व ग्रामपंचायत ग्रामनिधी मधून मोठी विविध प्रकारची विकास कामे मंजूर झाली असून बोल्हाई देवी पालखी मार्ग रस्त्यासाठी मोठा निधी मंजूर झाला आहे.त्यामुळे गावामध्ये अनेक विकास कामे मार्गी लागत असून

वाडेबोल्हाई गावची सर्वांगीण विकासाकडे वाटचाल चालू असल्याची माहिती ग्रामपंचायतीच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच वैशाली चंद्रकांत केसवड,उपसरपंच किर्ती अमोल पायगुडे यांनी दिली.

मंजूर झालेल्या विविध विकास कामांमध्ये पुणे जिल्हा नियोजन समितीच्या निधी अंतर्गत वाडेबोल्हाई येथील राजु भोरडे घर ते बाळासाहेब केसवड यांच्या घराकडे जाणारा पालखी मार्ग रस्ता करणे,बोल्हाई मंदिर पालखी मार्ग १ किमी रस्ता डांबरीकरण करणे,वाडेबोल्हाई ग्रामपंचायत कार्यालय ते बाळु लोखंडे घर कॉर्नर रस्ता काँक्रीटीकरण करणे,केसनंद शिवरस्ता करणे, रिकामेवस्ती शिवरस्ता करणे,राधा नामा शिंदे ते पायगुडेवस्ती रस्ता करणे,वाडेगाव येतील प्रदिप शिंदे घर ते बाळासाहेब केसवड पालखी मार्ग रस्ता करणे, वाडेबोल्हाई वाडेगाव ते खुटाळी रस्ता, वाडेबोल्हाई प्राथमिक आरोग्य केंद्र ते पायगुडेवस्ती रस्ता करणे ग्रा. मा. ६१, इंगळेमळा ते पायगुडेवस्ती रस्ता करणे अशी मोठ्या आर्थिक निधीच्या विकास कामांना मंजुरी मिळाली आहे.

### शिक्रापूर गावात फवारणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरूर परिसरामध्ये अनेक ठिकाणी तापाच्या आजाराने नागरिक ग्रासलेले असून काही नागरिकांना डेंगू सह आदी आजार झाल्याचे समोर आलेले असताना खबरदारी म्हणून ग्रामपंचायत प्रशासनाकडून गावामध्ये सर्वत्र फवारणी करत निर्जंतुकीकरण करण्यात येत आहे. अनेक नागरिकांना डेंगू सदृश आजाराची लक्षणे दिसून येत आहे, गावातील अनेक रुग्णालयात डेंगूसदृश आजाराचे रुग्ण उपचार घेत असल्याने परिसरात ग्रामपंचायत प्रशासन सतर्क झाले आहे.

## नभ उतरु आलं..!

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**धरतीवर ढगांचे अच्छादान :** सातारा जिल्ह्यातील औंध येथील यमाई मंदिर परिसरातून दिसणारे हे मनमोहक दृश्य. (फोटो =विजयकुमार हरिश्चंद्रे)

# सुनीता विल्यम्स करणार अंतराळातून मतदान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**न्यू यॉर्क :** गेल्या शंभर दिवसांपासून अंतराळात अडकलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर अमेरिकन अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत अंतराळातून मतदान करणार आहेत.

दोघांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून भारतीय वेळेनुसार शुक्रवारी रात्री १२. १५ वाजता पत्रकार परिषद घेतली. त्यात सुनीता आणि बुच यांनी अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. मतदाना संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बुच म्हणाले की, मतदानाशी संबंधित निवडणूक प्रक्रिया त्यांनी लगेचच सुरू केली आहे. हे एक महत्त्वाचे कर्तव्य आहे. आपण मतदान कसे करू शकतो यावर नासा काम करत आहे. विल्यम्स म्हणाल्या की, अंतराळातून मतदान करण्याबद्दल मी उत्साहित आहे. पृथ्वीपासून ४०० किलोमीटर अंतरावर असलेल्या स्पेस सेंटरमधून सुनीता आणि बुच यांनी सांगितले की त्यांनी नासाला अमेरिकेच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्याची विनंती केली आहे. सुनीता आणि बुच यांनी ५ जून रोजी स्पेस स्टेशनवर उड्डाण केले. ते ६ जून रोजी अंतराळ स्थानकावर पोहोचले. ते १३ जूनला परतणार होते. पण, नासाच्या बोईंग स्टारलाइनर यानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे त्यांचे परतणे पुढे ढकलण्यात आले. आता दोघेही पुढील वर्षीच परतण्याची शक्यता आहे.

स्टारलाइनर सोडताना पाहून वाईट वाटल्याचे सुनीता म्हणाल्या. मात्र, अशा परिस्थितीत जगण्याचे प्रशिक्षण त्यांना मिळाले आहे. त्या म्हणाल्या की, 'मला अंतराळात रहायला आवडते. हे माझ्या आवडत्या ठिकाणांपैकी एक आहे. त्यांनी सांगितले की, हे आनंदाचे ठिकाण आहे. गरज पडल्यास, आम्ही येथे ८ महिने, ९ किंवा १० महिने राहू शकतो. पण, कुटुंब आणि पाळीव कुत्र्यांना मिस करत आहे. एकाच मोहिमेवर दोन वेगवेगळे अंतराळयान उडवण्यास उत्सुक असल्याचे सुनीताने सांगितले. बुच म्हणाले की, तो पहाटे साडेचार वाजता उठतो, तर सुनीता साडेसहा वाजता उठते. अंतराळात राहण्यामुळे हाडांची घनता कमी होण्यास सामोरे जाण्यासाठी दोघेही दोन तास व्यायाम करतात.

**स्टारलाइनर पृथ्वीवर परतले**

● सुनीता आणि बुच यांना अंतराळ स्थानकावर घेऊन जाणारे अंतराळ यान तीन महिन्यांनंतर 7 सप्टेंबर रोजी सुरक्षितपणे पृथ्वीवर उतरले. त्याचे लँडिंग ३ मोठे पॅराशूट आणि एअरबॅगच्या मदतीने झाले. नासाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी भारतीय वेळेनुसार पहाटे साडेतीन वाजता हे यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळे करण्यात आले. पृथ्वीवर पोहोचण्यासाठी सुमारे ६ तास लागले. हे अमेरिकेतील न्यू मेक्सिकोच्या वाळवंटातील व्हाईट सॅन्ड स्पेस हार्बरमध्ये उतरले. बोइंग कंपनीने नासासाठी हे यान बनवले होते. अंतराळ यानामध्ये तांत्रिक समस्या आणि हेलियम वायूची गळती झाल्याची माहिती समोर आली आहे. ते सुरक्षित परत येण्याबाबत अनेक शंका होत्या.

## बारशावरुन पुण्याला येतांना कुटुंबावर काळाचा घाला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजी नगर :** संभाजी नगर येथे ड्रंक अँड ड्राईव्हची घटना उघडकीस आली आहे. दहा वर्षानंतर झालेल्या बाळाचे बारसे आटोपून पुण्याला येत असणाऱ्या एका कुटुंबाच्या कारला मद्यधुंद अवस्थेत स्कॉर्पिओ कार चालवत धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या घटनेत कारमधील चौघांचा जागीच मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना संभाजीनगर शहरापासून जवळच असलेल्या नगर रोडवरील लिंबे जळगाव परिसरातील टोलनाक्याजवळ मध्यरात्री घडली. मद्यधुंद तरुण चालकांना अटक करण्यात आली आहे.

## केशर पान मसाला कंपनी मालकाच्या पत्नीचा अपघातात मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** केशर पान मसाला या कंपनीचे मालक हरीश मखिजा यांच्या पत्नी प्रीती मखिजा यांचा अपघाती मृत्यू झाला. हरीश मखिजा आणि त्यांच्या पत्नी प्रीती यांचा कारचा टायर आग्रा लखनौ एक्स्प्रेस वे वर अचानक फुटला आणि हा भयंकर अपघात झाला. केशर पान मसाला कंपनीचे मालक हरीश मखिजा, त्यांच्या पत्नी प्रीती मखिजा, मद्य व्यावसायिक तिलक राज शर्मा यांची पत्नी आणि चालक असे चौघेजण प्रवास करत होते. या अपघातात प्रीती मखिजा यांचा मृत्यू झाला आहे तर इतर सगळे प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. केशर पान मसाला ही कानपूरची प्रसिद्ध मसाला कंपनी आहे. माइलस्टोन ७९ जवळ हरीश मखिजा यांच्या कारचा अपघात झाला. या अपघातात त्यांच्या पत्नी प्रीती मखिजा यांचा मृत्यू झाला आहे. हरीश मखिजा उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष सतीश महाना यांचे नातेवाईक आहेत. त्यांच्या कारचा टायर फुटून हा अपघात झाला.

## आगार व्यवस्थापक, स्थानक प्रमुखांचे दूरध्वनी लावणार

# एसटी बसमध्येच तक्रारीची सोय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एसटी प्रवासात प्रवाशांना येणाऱ्या अडीअडचणींचा निपटारा करण्यासाठी आता प्रत्येक बसमध्ये आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुखांचे दूरध्वनी लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे एसटीचा प्रवास करताना प्रवाशांना आलेल्या तक्रारींचा निपटारा करणे सोपे होणार आहे.

तक्रारीची दाद कुठे मागायची याची अडचण असते. अनेकदा या संदर्भात परिपत्रकीय सूचना करण्यात आलेल्या आहेत. तरी त्याचे पालन होतेच असे नाही. त्यामुळे आता प्रवाशांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आणि पर्यायाने एसटीची सेवा सुधारण्यासाठी आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुखाचे दूरध्वनी क्रमांक एसटीच्या बसच्या प्रदर्शनीय भागात लावण्याचा निर्णय घेतला आहे.




एसटीचा चालक अतिवेगाने बस चालवित आहे का ? चालक वाहन चालवताना मोबाईल पहात किंवा मोबाईलवर बोलत आहे का ? वाहकाने सुट्टे पैसे परत केले नाहीत का ? वाहकाचे वर्तन असभ्य आहे का ? योग्य थांब्यावर बस थांबविली नाही का ? बसचा तांत्रिक बिघाड झालेला आहे का ? अशा तक्रारी प्रवासी मुख्यालयाकडे करतात. त्यामुळे एसटीच्या बसमध्ये आता चालकाच्या मागील बाजूस संबंधित आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुखाचे नाव आणि दूरध्वनी क्रमांक लावण्याचे आदेश महामंडळाने प्रत्येक आगाराला दिले आहेत.

**२१ सप्टेंबरची मुदत**

● २१ सप्टेंबरपर्यंत एसटीच्या बसमध्ये दूरध्वनी क्रमांक लावण्याची कारवाई पूर्ण करावी, असे परिपत्रक काढण्यात आले आहे. टेलीफोन जर बंद असतील तर ते तातडीने सुरु करावेत असेही या पत्रकात म्हटले आहे. दूरध्वनीवर आलेल्या तक्रारींचा रेकॉर्ड ठेवण्यात यावा आणि त्याप्रमाणे तक्रारींचा निपटारा करण्यात यावा. या कामात कुचराई केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. ही भित्तीपत्रके लावण्यात येणारा खर्च आगार व्यवस्थापकांना असलेल्या आर्थिक खर्चाच्या अधिकारातून करण्यात यावा, असे आदेश उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांनी सर्व आगारांना दिले आहेत.

#रा



'भारताविरुद्ध बोलणाऱ्यांना तिखटच उत्तर द्यावं लागतं, कारण त्यांना तीच भाषा समजते. नुकतेच मी कोणीतरी असं म्हटलेलं ऐकलं की जर जो रुटने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला, तर ते कसोटी क्रिकेटसाठी चांगले असेल.' 'कृपया मला सांगा की सध्या कसोटी क्रिकेटमध्ये काय वाईट आहे, जेव्हा सचिन तेंडुलकरच्या नावावर विक्रम आहे आणि जर एखाद्या इंग्लंडच्या खेळाडूने तो विक्रम केला, तर कसोटी क्रिकेटमध्ये असं काय मोठं चांगलं होणार आहे, कशा पद्धतीने कसोटी क्रिकेट चांगले होईल, कृपया याबद्दलही आम्हाला सांगावे.' 'काही विचित्र कारणांमुळे परदेशात असा समज आहे की बीसीसीआयला कसोटी क्रिकेट आवडत नाही. हे खूपच हास्यास्पद आहे कारण भारतीय संघ प्रत्येक हंगामात अर्धा डझन कसोटी सामने खेळत असतात, मग ते मायदेशात असो किंवा परदेशात.'

— सुनील गावसकर


### आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ : कर्णधार हरमनप्रीत सिंगचा दरारा

# भारताने पाकिस्तानला हरविले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या भारतीय पुरुष हॉकी संघाने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ स्पर्धेतील अपराजित मालिका कायम राखली. कर्णधार हरमनप्रीत सिंगचा दरारा याही सामन्यात पाहायला मिळाला आणि त्यासमोर पाकिस्तानचा संघ हरला. सुरुवातीच्या काही मिनिटांत आघाडी घेऊनही पाकिस्तानला तगड्या भारतीय संघाने पराभवाची चव चाखवली. पाकिस्तानने सामन्यात पुनरागमनासाठी जोर लावला, परंतु भारताचा गोलरक्षक कृष्णा पाठक याने अप्रतिम बचाव केला. पाकिस्तानचा या स्पर्धेतील पहिलाच पराभव ठरला.

भारतीय संघाने सुरुवातीला आक्रमण केल्याने पाकिस्तानचे खेळाडू थोडे बावचळले, परंतु पाच मिनिटांच्या खेळानंतर त्यांच्याकडून



हल्ले व्हायला लागले. पाकिस्तानच्या अजाज अहमदने भारताची डोकेदुखी वाढवली होती. हनाद शाहीदने चतुराईने गोलपोस्ट जवळ उभ्या असलेल्या अहमद नदीमकडे चेंडू पास केला अन् पाकिस्तानच्या स्टार खेळाडूने त्याचे गोलमध्ये रुपांतर केले. पाकिस्तानने ८व्या मिनिटाला १-० अशी आघाडी घेतली.

१३ व्या मिनिटाला अजाजला ग्रीन कार्ड दाखवून दोन मिनिटांसाठी बाहेर केले गेले. त्याचवेळी भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि कर्णधार हरमनप्रीत सिंगने स्टीकने चेंडू सूसाट वेगाने गोलपोस्टच्या दिशेने भिरकावून सामना १-१ असा बरोबरीत आणला. पुढच्याच मिनिटाला पाकिस्तानकडून आघाडीचा चांगला प्रयत्न झाला, परंतु यावेळी भारतीय बचावफळी सज्ज होती. पण, पहिल्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानचा दबदबा दिसला.


दुसऱ्या क्वार्टरच्या तिसऱ्या मिनिटाला भारताला पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला. १९व्या मिनिटाला जुगराज सिंगने सर्कलवरून चेंडू हरमनप्रीतकडे सोपवला अन् 'सरपंच' साहबने भन्नाट गोल करून भारताला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारताचा बचावपटू निळकंता शर्माने पाकिस्तानला जखडून ठेवलेले दिसले. प्रयत्न करूनही दुसऱ्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानला पिछाडी भरून काढता आली नाही. २८व्या मिनिटाला नदीमने भारताच्या गोटात चिंता निर्माण केली होती आणि बरोबरीचा गोल थोडक्यात हुकला. मात्र, पुढच्या मिनिटाला त्याने संघाला पेनल्टी कॉर्नर मिळवून दिला. सुफियानचा थेट प्रयत्न पोस्ट बारवर आदळला अन् बरोबरीचा गोल हुकला.

### श्रीजेशचा वारसदार

● IND vs PAK यांच्यातल्या आजच्या लढतीपूर्वी झालेल्या सामन्यात मलेशिया व दक्षिण कोरिया यांच्यात थरार पाहायला मिळाला. हा सामना ३-३ असा बरोबरीत सुटला. तिसऱ्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानच्या खेळाडूंनी बचावावर भर दिला. ३९व्या मिनिटाला भारताला आणखी एक पेनल्टी कॉर्नर मिळाला आणि पण यावेळी पाकिस्तानी बचावपटू यशस्वी झाले. पुढच्याच मिनिटाला पाकिस्तानने पेनल्टी कॉर्नर कमावला, परंतु भारतीय खेळाडूंनी त्यांचा डाव हाणून पाडला. गोलरक्षक कृष्णा पाठकने त्यानंतर पाकिस्तानचे सलग ३ गोल रोखले. सातत्याने येत असलेल्या अपयशाने पाकिस्तानी खेळाडू सैरभैर झालेले दिसले. पी आर श्रीजेशनंतर भारताच्या गोलरक्षकाची जबाबदारी कृष्णा सक्षमपणे पार पाडताना दिसतोय.

## किल्ले राजमाची

**लोणावळा-खंडाळाच्या सहलीला आलेले** पर्यटक राजमाची पॉईंटवर हमखास जातात पण ज्या किल्ल्यावरून नाव पडले त्या राजमाची किल्ल्याची बऱ्याच



गड गणेश

**सुरेश तरलगट्टी,**
शिवसुर्य प्रतिष्ठान पुणे

जणांना माहिती नाही. राजमाची किल्ला हा लोणावळा पासून १६ कि.मी. आहे. लोणावळ्याहून तुंगार्ली मार्गे वळवंडे गावाच्या अलीकडे असणाया फाटयाने किल्ले राजमाचीच्या पायथ्याचे गाव उधेवाडीत जाता येते. एखादी राजधानी स्थापन व्हावी एवढया मोठया पठाराचा विस्तार असलेला, श्रीवर्धन व मनरंजन असे दोन बालेकिल्ला लाभलेला तसेच दोन्ही किल्ल्याच्या मध्ये २०० मीटरची खिंड व अनेक दुर्ग अवशेषांनी नटलेला हा राजमाची किल्ला होय. मनरंजन पेक्षा श्रीवर्धन हा थोडा उंच आहे. खिंडीतून श्रीवर्धन कडे जाणारा वळणा-वळणाचा मार्ग किल्ल्याच्या गोमुखी दारातून गडमाथ्यावर पोहचवते. या श्रीवर्धनच्या बालेकिल्ल्यावर असलेल्या धान्य कोठारावर छोटीशी पण फारच सुंदर श्री गजाननाची मूर्ती आहे. या गणेश मूर्तीची फारच झीज झाल्यामुळे अंगावरील अलंकार व हातातील शस्त्रे मात्र कळून येत नसले तरी मूर्तीच्या मागील दोन्ही हातात शस्त्रे नक्की आहेत | एवढे मात्र नक्की कळते. तसेच मूर्तीचा पुढील उजवा हात आशिर्वाद देताना असून पुढील डाव्या हातात मोदक रूपी प्रसाद आहे. तसेच मूर्तीचा डावा पाय मांडी घातलेल्या स्थितीत असून उजवा पाय गुडघ्यात दुमडलेल्या स्थितीत आहे. तसेच मूर्तीच्या दोन्ही पायामध्ये धोतरचा शेला आलेला दिसतो. या किल्याच्या उंचवण्यावर गावकऱ्यांनी १९८० साली ध्वजस्तंभ उभारला आहे. येथून संपूर्ण परिसराचे विहंगम दृश्य दिसते. नंतर पुन्हा खिंडीत येवून मनरंजनच्या बालेकिल्ल्यावर जाता येते. उधेवाडी गावातील उदयसागर तलावाजवळील शिवमंदिर हे आवर्जुन पाहण्यासारखे आहे. पूर्वी हे मंदिर संपूर्ण गाळाने बुजले होते. श्रमदानाने याला पुन्हा अस्तित्व प्राप्त झाले आहे. प्राचीन काळापासून बोरघाट आणि परिसरावर लक्ष ठेवणारा हा सुंदर किल्ला आजही दुर्ग भटक्यांचे भटकंतीचे लाडके ठिकाण आहे. सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, कदंब, बहमनी, अदिलशाही, शिवशाही व पेशवाई या सर्व राजवटींचा हात याच्या घडणीला लागले. असा हा राजमाची किल्ला होय.

## तिलक वर्माचे खणखणीत शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुलीप ट्रॉफी २०२४-२५ हंगामाच्या दुसऱ्या फेरीत मुंबई इंडियन्सच्या इशान किशन, तिलक वर्मा व अंशूल कंबोज यांनी दम दाखवला. इशानपाठोपाठ तिलकनेही त्याच्या संघासाठी शतकी खेळी केली. भारत अ संघाकडून खेळणाऱ्या तिलकने १९३ चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने १११ धावांची नाबाद खेळी केली. त्याला शाश्वत रावतची ( ६४*) चांगली साथ मिळाली. भारताच्या बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी संघ अजून निवडलेला नाही आणि ही कामगिरी त्यादृष्टीने महत्त्वाची ठरतेय. तिलकचे हे प्रथम श्रेणी क्रिकेटमधील पाचवे शतक ठरले. तिलकने या शतकासह टीम इंडियाच्या कसोटी संघासाठी दावा सांगितला आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या फायनलपूर्वी भारताला १० कसोटी सामने खेळायचे आहेत. अशात या युवा खेळाडूंच्या दमदार कामगिरीमुळे निवड समितीसमोर तगडे पर्याय उपलब्ध झाले आहेत.

### शिक्षण मंडळ आयोजित आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत

# सरदार दस्तूर नौशरवान प्रशाला संघाला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा क्रीडा परिषद आणि पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ आयोजित आंतरशालेय बास्केटबॉल स्पर्धेत सतरा वर्षांखालील मुलींच्या गटात अर्णवी फुलबंधेच्या नेतृत्वाखालील सरदार दस्तूर नौशरवान प्रशाला संघाने विजेतेपद पटकावले.

डेक्कन जिमखाना क्लबच्या बास्केटबॉल कोर्टवर संपलेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सरदार दस्तूर प्रशालेच्या खेळाडूंनी वेगवान खेळ करताना सेंट मेरीज स्कूलचा एकतर्फी लढतीत ७०-४१ असा २९ गुणांनी पराभव केला. मध्यतरांस दस्तूर प्रशालेने ३८-२३ अशी पंधरा गुणांच्या आघाडीसह सामन्याचा निर्णय निश्चित केला होता. त्यात महत्त्वाचा वाटा ४४



गुण नोंदविणाऱ्या वैष्णवी परदेशीचा होता तिला सई सोनावणेने बारा गुण नोंदवीत

सुरेख साथ दिली. सेंट मेरीजकडून राजन्या सरकराने तेरा गुणांची नोंद केली. उपांत्य फेरीत सेंट मेरीज स्कूलने द कल्याणी स्कूलचा ४९-३१ असा अठरा गुणांनी पराभव केला त्यात प्रमुख वाटा ओवी पाटील व राजज्ञा सरकारचा (प्रत्येकी १२ गुण) होता. पराभूत संघाच्या आरवी धोकाने (१४ गुण) केलेली खेळी अपुरी पडली. या सामन्यात मध्यतरांस सेंट मेरीज स्कूलने ३७-१२ अशी २५ गुणांची आघाडी घेतली होती.

## आयपीएल २०२५ : रिटेन्शन पॉलिसीवर लवकरच निर्णय

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग (IPL) च्या रिटेन्शन पॉलिसीबाबत आणखी एक मोठा अपडेट समोर आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) आयपीएल रिटेन्शन नियमांवर निर्णय घेण्यास विलंब करू शकते. रिटेनशन पॉलिसीबाबत, असे मानले जाते की चेन्नई सुपर किंग्ज आणि महेंद्रसिंग धोनीला त्याचा फायदा होऊ शकतो. मात्र याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका नाही. आयपीएल फ्रँचायझी मालक आणि अधिकाऱ्यांमध्ये सुरू असलेल्या माहितीनुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) महिन्याच्या शेवटपर्यंत घोषणा पुढे ढकलू शकते. २९ सप्टेंबर रोजी बेंगळुरू येथे होणाऱ्या बीसीसीआयच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (एजीएम) वेळी हे धोरण सार्वजनिक झाल्यास आश्चर्य वाटायला नको. आयपीएल अधिकाऱ्यांमध्ये सर्वात मोठी भावना अशी आहे की या घोषणेसाठी किमान १० दिवस ते दोन आठवडे लागू शकतात.

## शारीरिक शिक्षण, अभियांत्रिकी महाविद्यालयाला जेतेपद

**पुणे :** भारती विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंटतर्फे (आयएमईडी) आयोजित आंतरमहाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष विभागात शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने तर महिला गटात अभियांत्रिकी महाविद्यालयाने विजेतेपद पटकावले. शिवाजीनगर येथील मॉडर्न बॅडमिंटन संकुलात झालेल्या या स्पर्धेत अंतिम लढतीत अभियांत्रिकी महाविद्यालयाने विधी महाविद्यालय संघावर २-० अशी मात केली. त्यात नाव्या खन्नाने विधी महाविद्यालयाच्या सुजन सारस्वतचा २१-८, २१-१० असा पराभव केला आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विजयाचे खाते उघडले. त्यापाठोपाठ, दुहेरीत रितू त्रिपाठी व सेजल बागले या जोडीने सुजन सारस्वत व यामिनी मुदगल जोडीवर २१-७, २१-११ अशी मात केली आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. पुरुष विभागात शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने विधी महाविद्यालय संघावर ३-० अशी मात केली. त्यात पहिल्या एकेरीत लिहँग कोन्याकने विधी महाविद्यालयाच्या ध्रुव बलियनला हरवून शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या विजयाचे खाते उघडले. त्यापाठोपाठ दुहेरीत अभय किसारवार व किरण इंगोले जोडीने विधी महाविद्यालयाच्या मेहूल मालविया व कुमार कार्तिकसिंह जोडीवर २१-९, २१-६ अशी, तर मिहीर भामरेने मेहूल मालवियावर २१- १४, २१-१२ अशी मात केली आणि शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ 'आयएमईडी'चे संचालक डॉ. अजित मोरे आणि क्रीडा संचालक डॉ. नेताजी जाधव यांच्या हस्ते झाला. यावेळी डॉ. रामचंद्र महाडीक, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. अशोक जगताप हे उपस्थित होते.


## पीडीएफएच्या नव्या हंगामासाठीची नोंदणी सुरू

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटनेने (पीडीएफए) २०२४-२५ फुटबॉल हंगामासाठी नोंदणी सुरू करण्याची घोषणा केली आहे. संघ आणि खेळाडूंना सर्व डिव्हिजनना नव्या संघ नोंदणीसह (११ ते २५ सप्टेंबर २०२४) आणि नवीन खेळाडूंची नोंदणीसाठी (१० ऑक्टोबर २०२४ पर्यंत) सूचित करण्यात आले आहे. विद्यमान संघांनी त्यांचे टीम रोस्टर (याद्या) २५ सप्टेंबरपर्यंत सबमिट करणे आवश्यक आहे. मात्र खेळाडूंना ऑक्टोबरच्या अंतिम मुदतीपर्यंत संघात घेता येईल. या हंगामात एक महत्त्वाची आवश्यकता म्हणजे एआयएफएफच्या केंद्रीय नोंदणी प्रणालीचे (सीआरएस) पालन आवश्यक आहे. केवळ सीआरएसवर नोंदणी केलेले खेळाडूच या लीगमध्ये सहभागी होण्यास पात्र असतील. ज्यामुळे वेळेवर नोंदणीचे महत्त्व वाढेल, असे पीडीएफएने स्पष्ट केले आहे. पीडीएफए आगामी २०२५-२०२६ हंगामात एलिट डिव्हिजनचा समावेश करण्याची योजना आखत आहे. त्यामुळे अनेक नव्या संधी उपलब्ध होतील. शिवाय आव्हानांमध्येही भर पडेल. मानद सचिव प्रदीप परदेशी यांनी एका निवेदनाद्वारे, नोंदणीबाबत अंतिम मुदतींचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित केली. आम्ही सर्व संघ आणि खेळाडूंना त्यांची सीआरएस नोंदणी त्वरित पूर्ण करण्याचे आवाहन करतो.जे खेळाडू सीआरएसवर नोंदणी करण्यात अयशस्वी झाले त्यांना स्पर्धेत खेळण्याची परवानगी दिली जाणार नाही. आम्ही या मानकांचे पालन करण्यास वचनबद्ध आहोत. अधिक तपशीलवार माहितीसाठी, संघ आणि खेळाडूंनी पीडीएफएच्या संकेतस्थळावर किंवा असोसिएशनच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, अशी विनंती असोसिएशनतर्फे करण्यात आली आहे.

# अविनाश साबळेची भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या अविनाश साबळेने शुक्रवारी मध्यरात्री इतिहास घडवला. ३००० मीटर स्टीपलचेस ( अडथळ्यांची शर्यत) स्पर्धेतील राष्ट्रीय विक्रम धारक अविनाश साबळे हा डायमंड लीग फायनल खेळणारा भारताचा पहिला ट्रॅक ॲथलीट आहे. अविनाशने त्याच्या ३०व्या वाढदिवशी ब्रुसेल्समध्ये या विक्रमाला गवसणी घातली. जगातील अव्वल १२ खेळाडूंमध्ये झालेल्या या फायनलमध्ये अविनाशसमोर पॅरिस ऑलिम्पिक चॅम्पियन सौफियाने एल बक्काली (



मोरोक्को) आणि कांस्यपदक विजेता अब्राहम किबिवोट ( केनिया) यांचे आव्हान होते. त्याने पॅरिस डायमंड लीगमध्ये ८:०९.९१ सेकंदाच्या वेळेसह स्वतःचा राष्ट्रीय विक्रम मोडला होता आणि तीन गुण मिळवले. राष्ट्रीय विक्रम मोडण्याची ही दहावी वेळ होती. अवनीशने ऑगस्टमध्ये सिलेसिया डायमंड लीगमध्ये ९:२९.९६ सेकंद वेळेसह १४ वे स्थान मिळविले होते.

पण, डायमंड लीगमध्ये पात्र ठरलेल्या अव्वल १२ खेळाडूंपैकी दोघांनी माघार घेतल्याने अविनाशला फायनल खेळण्याची संधी मिळाली. मागच्या डायमंड लीगच्या फायनलसाठी अविनाश पात्र ठरला होता, परंतु त्याने माघार घेतली होती.

मोरोक्कोचा बक्काली, केनियाचा विलबरफोर्स कोनेस यांनी पहिल्या ४०० मीटर अंतरापर्यंत आघाडी घेतली होती. अविनाश १२व्या क्रमांकवर होता. १२०० मीटर अंतर कापल्यानंतर केनियाचा आमोस सेरम आणि अब्राहम किबिवोट यांच्यासह इथोपियाचा गेतनेट वेल अव्वल तिघांमध्ये आले. अविनाशही एक क्रम वर सरकला होता. २००० मीटरनंतर बोयूसेल व कोनेस या दोघांनी माघार घेतली आणि अविनाश दहाव्या क्रमांकावर आला. अविनाशची प्रगती होत होती, परंतु अव्वल तीनमध्ये स्थान मिळवण्यासाठी त्याचे प्रयत्न अपूरे ठरले.

केनियाचा सेरेम ८:०६.९० सेकंदासह अव्वल आला, तर मोरोक्कोचा बक्काली ( ८:०८.६० से.) आणि ट्युनिशियाचा मोहम्मद आमीन ( ८:०९.६८ से.) अनुक्रमे दुसरे व तिसरे आले. भारताच्या अविनाशला ८ मिनिटे १७.०९ सेकंदासह ९व्या क्रमांकावर समाधानी रहावे लागले. सेरेमने पॅरिस ऑलिम्पिक चॅम्पियनला हरवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

## दुसऱ्या टी-२० मध्ये इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा केला पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जात असलेल्या ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा ३ गडी राखून पराभव केला. यासह मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली आहे. ऑस्ट्रेलियाने पहिला सामना २८ धावांनी जिंकला होता.

कार्डिफच्या सोफिया गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या सामन्यात इंग्लंडचा कर्णधार फिल सॉल्टने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जेक फ्रेझर-मॅकगुर्कचे पहिले अर्धशतक आणि जोश इंग्लिशच्या ४२ धावांच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने ६ गडी गमावून १९३ धावा केल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लिश अष्टपैलू खेळाडू लियाम लिव्हिंगस्टोनने शानदार फलंदाजी केली. त्याच्या ८७ आणि जेकब बेथेलच्या ४४ धावांच्या जोरावर इंग्लंडने १९ व्या षटकात ७ गडी गमावत १९४ धावा करत विजय मिळवला. १ गडी गमावून ६७ धावा केल्या. येथे मॅथ्यू शॉर्ट आणि ट्रॅव्हिस हेड या दोन्ही सलामीवीरांनी पहिल्या विकेटसाठी २६ चेंडूत ५२ धावा जोडल्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या ५० धावा फक्त ४ षटकात पूर्ण केल्या. इंग्लंडचा कर्णधार फिल सॉल्टने शानदार सुरुवात करून दिली. त्याने २३ चेंडूत ३९ धावा केल्या.

### ग्रॅण्ड स्लॅम विजेता रोहन बोपण्णाचे

# टेनिस प्रिमियर लीगच्या सहाव्या हंगामात पदार्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टेनिस प्रिमियर लीगचा सहावा हंगाम आता अगदी जवळ आला आहे. जागतिक क्रमवारीतील माजी अव्वल मानांकित खेळाडू रोहन बोपण्णा या मालिकेत सहभागी होणार आहे. डिसेंबरमध्ये ही लीग मुंबईत पार पडणार आहे. बोपण्णा सध्या जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावर आहे.

भारतातील सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या टेनिसपटूंपैकी एक असलेला बोपण्णा प्रथमच टेनिस लीगमध्ये सहभागी होणार आहे. टेनिस खेळात क्रांती घडवून आणण्याचे लीगचे प्रमुख उद्दिष्ट आहे. आतापर्यंत टेनिस प्रिमियर लीगचे पाच हंगाम यशस्वी पूर्ण झाले असून, सहाव्या पर्वाची तीव्रता वाढू लागली आहे. भारताचा ४४ वर्षीय बोपण्णाने कारकिर्दीत दोन ग्रॅण्ड स्लॅम विजेतीपदे (२०२४ मध्ये ऑस्ट्रेलियन ओपन पुरुष दुहेरी आणि २०१७ मध्ये फ्रेंच ओपन मिश्र दुहेरी) मिळविली आहेत. तीन ऑलिम्पिक स्पर्धेतही त्याने भारताचे प्रतिनिधीत्व केले आहे. रिओ २०१६ ऑलिम्पिक स्पर्धेत त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते. बंगळुरुचा रहिवासी



असलेल्या बोपण्णाने वर्षाच्या सुरुवातीला जानेवारी महिन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान भूषविणारा सर्वात वयस्क खेळाडू म्हणून मान मिळविला होता. कारकिर्दीत आतापर्यंत त्याने २५ हून अधिक विजेतीपदे मिळविली आहेत. टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचणारा बोपण्णा लिएंडर पेस, महेश भूपती, सानिया मिर्झानंतर चौथा टेनिसपटू आहे. या चारही भारतीय टेनिसपटूंनी कारकिर्दीत एकतरी ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपद मिळविले आहे.

जवळपास दोन दशकाहून अधिक काळ एटीपी मालिकेचा भाग असलेला बोपण्णा आणि टेनिस प्रिमियर लीगच्या नव्या शैलीत खेळताना दिसणार आहे. सर्व फ्रँचाईजी उपांत्य फेरीत पात्र होण्यासाठी प्रत्येकी पाच सामने खेळणार आहेत. लीग क्रांतिकारक अशा २५ गुणांच्या पद्धतीत खेळविली जाणार आहे. दोन फ्रँचाईजींच्या सामन्यात पुरुष एकेरी, महिला एकेरी, मिश्र दुहेरी, पुरुष दुहेरी सामन्यांचा समावेश असेल. प्रत्येक सामन्यात १००० गुण असतील. प्रत्येक श्रेणीचे मूल्य २५ गुण असेल. प्रत्येक संघाला साखळी टप्प्यात ५०० गुण (१०० गुण बाय ५ सामने) गुण कमावता येणार आहेत. गुणतालिकेतील पहिले चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत.

#रा